१९९८-९९



# कमला



# श्रीमती शकुंतलादेवी हिंदुराव घाटगे अभ्यासिकेच्या उद्घाटन प्रसंगी टिपलेले विविध क्षण

**ज्ञानदारे उघडली**



अभ्यासिकेचे उद्घाटन करताना श्रीमती शकुंतलादेवी घाटगे, सोबत माजी कुलगुरु रा. कृ. कणबरकर



श्रीमती शकुंतलादेवी हिंदुराव घाटगे आपले मनोगत व्यक्त करताना



मा. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील कृतज्ञता व्यक्त करताना

निर्मातुं शिव सुंदरम्

ताराराणी विद्यापीठ

कोल्हापूर.

ताराराणी विद्यापीठाच्या

# कमला महाविद्यालयाचे



नि य त का लि क

# कमला

१९९८-९९

**अंक चौदावा**

# कमला

## १९९८-९९

◀ अध्यक्ष ▶

**प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार रंगराव पाटील**

◀ प्रमुख संपादिका ▶

**डॉ. सौ. सुमित्रा बाबासाहेब पोवार**

◀ विभागीय संपादक ▶

- मराठी विभाग .............................. डॉ. श्री. जे. बी. शिंदे
- हिंदी विभाग ................................ डॉ. सौ. सुमित्रा पोवार
- इंग्रजी विभाग................................ प्रा. जे. बी. पाटील
- जाहिरात विभाग ............................ श्री. ए. एल. नरके

  श्री. एस्. व्ही. बागल

  श्री. ए. एम्. साळोखे

  श्री. एन. व्ही. पोवार
- विद्यार्थिनी प्रतिनिधी ....................... कु. तेजस्विनी अकोळकर, बी. कॉम-२

  कु. चंदन जामदार, बी. कॉम-२

या अंकात प्रसिद्ध (व्यक्त) झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# रणरागिणीस अभिवादन



## युगस्त्री छत्रपती ताराराणी

दिल्ली झाली दीनवाणी
दिल्लीशाचे गेले पाणी
ताराबाई रामराणी
भद्रकाली कोपली

प्रत्येक स्त्रीच्या ओंजळीत, ज्ञान-दीप,
देण्याचा ध्यास घेतलेल्या 'विश्वनाथास' शतशः प्रणाम



कै. मा. काकाजी
तथा
डॉ. व्ही. टी. पाटील

# समर्थ वाटचाल



## प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील

एम.ए.पीएच.डी.



# संपादकीय...

## कमलाचे अंतरंग..

कमला १९९८-९९ चा चौदावा अंक वाचकांना सादर करताना आम्हास अतिशय अभिमान वाटत आहे व आनंद होत आहे.

'निर्मातु शिव सुंदरम्' हे ब्रीदवाक्य घेऊन कै. काकाजी तथा डॉ. व्ही. टी. पाटील यांनी सन १९४५ साली रणरागिणी ताराराणीच्या नावाने 'ताराराणी विद्यापीठ' स्थापन केले. भारतीय संस्कृतीचे प्रतीक असलेले 'कमल' त्यात पेटवलेली ज्ञानज्योत आणि अंधार नाहीसा करणाऱ्या ज्योतीतून झिरपणारा चांदण्यासारखा प्रकाश. हे कैवल्याचं चांदणं, ही ज्योत आणि या संस्कृतीचा भार पेलला आहे तो सृजनकर्त्या मातेने. मानवाला जन्म देणारी माता, त्यांच्या जीवनात ज्ञानाचं, सुख-समाधानाचं चांदणं पसरविणारी स्त्री मात्र दुर्दैवाने भारतीय समाजात शिक्षणापासून वंचित राहिली होती. स्त्रियांच्या या दयनीय अवस्थेविरुद्ध, प्रसंगी समाजाशी संघर्ष करून विविध प्रकारच्याअवहेलना झेलून त्यांच्या उत्थानाचे काम करणाऱ्यांमध्ये कै. काकाजी आघाडीवर होते.

कै. सौ. सरोजिनीदेवी तथा कमलादेवी काकाजींच्या या कार्यात बरोबरीने राहिल्या. कै. काकाजींनी स्थापन केलेल्या ताराराणी विद्यापीठरूपी तळ्यात आज अगणित कमळे बहरलीआहेत. 'कमला महाविद्यालय' हे या तलावातील अत्यंत रमणीय आणि कर्तृत्वाला वाव देणारी पुष्करिणी म्हणून शिक्षण क्षेत्रात ओळखू जाऊ लागले आहे.

निसर्गप्रेमी काका ज्या सदाबहार हिरव्या गर्द पानांनी बहरलेल्या वृक्षाखाली चिंतन करीत असत, आज तेथे काकाजींची समाधी आकार घेत आहे.

'ताराराणीचा परिसर, माझे येथेचि पंढरपूर' मानून काकाजींनी या विद्या प्रांगणाला मंदिराचे मांगल्य प्राप्त करून दिले. ज्ञानयोगी, कर्मयोगी काकाजींनी लावलेले इवलेसे रोपटे आज गगनावरी प्रकाशगतीने झेपावत आहे.

'निर्मातु शिवं सुंदरम्' चा वसा घेतलेले आम्ही, ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी मा. रंगरावदादा पाटील, माजी कुलगुरु रा. कृ. कणबरकर आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली यथाशक्ती या रोपट्याला खतपाणी देत आहोत. मा. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी -

''जैसे संकल्पेचि काढिले । जयाचे मनचि चैतन्य जाहले ।' अशा स्थितीत महाविद्यालयाच्या विकासाची घोडदौड कायम राखली आहे. महाविद्यालयाच्या १४ वर्षांच्या निर्माण आणि विकास प्रक्रियेकडे पहात असताना माझ्या मनात अनेक स्मृतींनी गर्दी केली आहे. महाविद्यालयाचा विकास आराखडा नक्कीच अभिनंदनीय आणि स्पृहणीय आहे. 'कमला' नियतकालिक या विकास टप्प्यावर साक्षीदार म्हणून उभे आहे.

काही दिवसांपूर्वी 'महाराष्ट्र टाईम्स' या अग्रणी वर्तमानपत्रातील एका अग्रलेखाने मी व्यथित झाले होते. महाविद्यालयामध्ये निर्माण होणाऱ्या नियतकालिकांवर, त्यावर होणाऱ्या खर्चावर आणि त्यांच्या घसरत चाललेल्या दर्जावर फारच कठोर प्रहार संपादकांनी केले होते. ही नियतकालिके म्हणजे केवळ अहवाल बनून राहिली आहेत असे संपादकांचं प्रतिपादन होते. 'कमला' नियतकालिकाच्या प्रवासावर एक दृष्टिक्षेप टाकला असता मला मात्र हे पटत नाही. विद्यार्थी जगताच्या विविध भाव आंदोलनांचे तरंग 'कमला' मध्ये स्पष्ट दिसतात. समाजातील विविध विषय आणि घटनांबद्दल

संवेदनक्षमतेने आमच्या विद्यार्थिनी परखडपणे लिहितात. पहिल्या टप्प्यावर लाजणारी कमलाची लेखिका पाहता पाहता धाडसी झाली आणि नव्या युगाच्या उंबरठ्यावर आज ती बिनधास्तपणे उभी आहे. हे परिवर्तन कशाचे द्योतक आहे ? मराठी, हिंदी, इंग्रजी केवळ या भाषातूनच त्यांच्या विचारांची अभिव्यक्ती होते असे नाही, तर 'कमला'च्या माध्यमातून त्यांचे विविध भावनाविष्कार, कलाविष्कार, त्यांची साहसी वृत्ती प्रकट करणारी विभिन्न छायाचित्रे निश्चितच अभिनंदनीय आहेत.

'कमला' नियतकालिकाच्या मराठी, हिंदी विभागातील साहित्याने आजवर शिवाजी विद्यापीठीय नियतकालिक स्पर्धेतील पहिल्या क्रमांकाची बरीच पारितोषिके मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. हे आम्ही अभिमानाने नमूद करू इच्छितो. यावर्षीही नेहमीप्रमाणे भारतीय व राज्य पातळीवरील महत्वांच्या घडामोडींची दखल, अमर्त्य सेन यांचे अर्थ विचार, कांदा-बटाटा भाव वाढ, कोल्हापूरचे थोर सुपुत्र भाई माधवरावजी बागल यांच्याविषयी साहित्य प्रकाशित केले आहेच, शिवाय साने गुरुजी यांच्याविषयी लेखही प्रकाशित करीत आहोत. आमच्या विद्यार्थिनींनी विज्ञान, शिक्षण, राजकारण, नीतीमूल्ये यांची जोपासना आपल्या लेखनाद्वारे करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. त्यांची काळाबरोबर आपली गती कायम ठेवण्याचा हा उपक्रम आम्ही 'कमला' मधून स्पष्ट करीत असतो.

आमच्या विद्यार्थिनींचे विविध विषयांना स्पर्श करणारे साहित्य आपल्याला त्यांच्या प्रगल्भतेची नक्कीच ओळख करून देईल. 'कमला' मध्ये लिहिता लिहिता अग्रणी असलेले दै. सकाळ, दै. पुढारी अशा आघाडीच्या दैनिकांमधून लेखनकार्य करीत असलेल्या शुभदा टक्कळकी, संगीता हुलस्वार, शीला बंडी या साहित्य संमेलनामध्ये व्यासपीठ गाजवत आहेत, हे नक्कीच प्रशंसनीय आहे.

## ऋणनिर्देश

'कमला'च्या पूर्णत्वास अनेकांची मदत झाली. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी दैनंदिन कामातून वेळोवेळी केलेले मार्गदर्शन, त्याबद्दल त्यांचे आभार मानणे अगत्याचे आहे. विभागीय संपादक डॉ. जे. बी. शिंदे (मराठी), श्री. जे. बी. पाटील (इंग्रजी), श्री. ए. एल. नरके, श्री. एन. व्ही. पोवार (जाहिरात), श्री. पी. एस्. जाधव या सर्वांनी नियतकालिकाचे विभाग सुंदर व परिपूर्ण करण्यासाठी जे परिश्रम घेतले त्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद !

सर्व लेखिका-कवयित्री यांनी दिलेल्या गुणात्मकदृष्ट्या उत्कृष्ट साहित्यामुळेच हा अंक सजला. त्याबद्दल सर्वांचे आभार ! राजहंस प्रिंटिंग प्रेसचे श्री. सी. गोसावी व अशोक कुलकर्णी व त्यांचे सहकारी यांनी नियतकालिकाचे काम निर्दोषपणे केलेबद्दल त्यांना धन्यवाद ! अंकास साजेसे, अर्थपूर्ण मुख्यपृष्ठ तयार करणारे नक्षत्र ॲडव्हर्टायझर्सचे श्री. विद्याधर जोशी हे सुद्धा धन्यवादास पात्र आहेत.

महाविद्यालयातील सर्व सहकारी प्राध्यापकांचे आभार ! कमला १९९८-९९ या नियतकालिकासाठी अनेक व्यक्ती व संस्थांनी आपल्या व्यवसायाच्या लहान मोठ्या जाहिराती देऊन आर्थिक सहाय्य केले. या सर्व जाहिरातदारांच्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

डॉ. सौ. सुमित्रा बाबासाहेब पोवार

प्रमुख संपादिका

# "माझे जीवन : एक यज्ञकुंड"



क्रांतिवीर रंगरावदादा पाटील

"ताराराणी विद्यापीठाचे उपाध्यक्ष, ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी मा. रंगरावदादा पाटील हे इंग्रजांना सळो की पळो करून सोडणारे देशभक्त म्हणून ओळखले जातात. भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त स्वातंत्र्य मिळविलेल्या सैनिकांचा जाज्वल्य इतिहास नवीन पिढीला समजावा म्हणून सांगली आकाशवाणीचे श्री. संजय पाटील यांनी घेतलेली त्यांची मुलाखत आम्ही येथे प्रकाशित करीत आहोत.

रयत शिक्षण संस्थेबरोबरच ताराराणी विद्यापीठाच्या 'कमला' महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासात त्यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाख मोलाचे आहे."

■ **प्रश्नकर्ता** : दादा, या भागातले आपण ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी आहात. सांगली, सातारा, कोल्हापूर या भागातील स्वातंत्र्य आंदोलनाचे आपण साक्षीदार आहात आणि स्वातंत्र्य चळवळीतले खंदे कार्यकर्तेही आहात. सदर चळवळ जाणून घेण्यासाठी आपली ही भेट आहे. तेव्हा आपण आम्हाला प्रथम आपल्या बालपणाविषयी सांगा !

■ **दादा** : माझा जन्म 'अंकलखोप' गावी माझ्या आजोळी झाला. आम्ही शाळेत असताना धुळाप्पा नवले वगैरे लोकांचा वावर भागात असल्याने राष्ट्रीय प्रवृत्तींचा आमच्यावर प्रभाव पडला. त्यानंतर 'शिगाव' गावी तेथील शाळेत राष्ट्रीय प्रवृत्तीचे गोविंद मल्हार कुऱ्हाडे नावाच्या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी आम्हाला पोहणे, मल्लखांब, सिंगल बार, डब्बल बार हे व्यायाम प्रकार शिकविले. मनावर देशभक्तीचे संस्कार केले. मी इयत्ता ४ थी मध्ये असताना त्यांनी विचारले, 'रंगराव तुमची घरची स्थिती चांगली आहे. तेव्हा लग्न करतांना एखाद्या गरीब घरच्या मुलीशी हुंडा न घेता लग्न कराल का ?' लग्न म्हणजे काय हे मला माहीत नसतानाही मी होय म्हणून उत्तर दिले आणि बालपणीचे वचन पूर्णही केले.

माझ्या बालपणात नाना पाटील, बर्डे मास्तर, राघु आण्णा लिमये यांच्या प्रभात फेऱ्या निघत असत. आम्ही नांगरे पाटील. पोलिस पाटीलकी आमचेकडे असे. माझे चुलते कोल्हापूरचे व्ही. टी. पाटील हे प्रजापरिषदेच्या विरोधी व संस्थानच्या बाजूला झुकलेले. त्यामुळे आम्ही प्रभात फेरीत दाखल झालो की घरी हमखास मार बसत असे. याचवेळी भाई माधवराव बागल हे भूमिगत अवस्थेत वाळवे तालुक्याच्या दक्षिण भागात सभा घेत फिरत होते. दा. न. शिखरे हे त्यांच्या बरोबर असत व दोघे प्रजापरिषदेची चळवळ जोमाने चालवीत होते. मी घरातून बाहेर पडलो आणि वाळवे तालुक्याच्या दक्षिण भागात त्यांना मदत करू लागलो. कोल्हापुरात आल्यावर राजाराम हायस्कूलमधील मराठी विषयाचे आर. डी. साटम नावाच्या शिक्षकांच्या सहवासात आलो. त्यांनी संपूर्ण एक वर्षभर आम्हाला कॉंग्रेसचा इतिहास कथन केला. आमच्या ४ थी 'ब' च्या वर्गातील एकूण ७५ विद्यार्थ्यांपैकी ७० विद्यार्थी १९४२ च्या चळवळीत होते. त्यावेळी आमचे हेडमास्तर एम. आर. देसाई हे होते.

■ **प्रश्नकर्ता** : म्हणजे त्यावेळचे शिक्षकांचे संस्कार देखील देशभक्तीपर होते तर...

■ **दादा** : हो तर ! पुढे मी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्था, सातारा येथे गेलो. त्याचवेळी १९३९ साली दुसरे महायुद्ध सुरु झाले. जर्मनीने पोलंडवर हल्ला केला. त्यावेळचे कलेक्टर ऑफिस आमचे हायस्कूलच्या पाठीमागेच होते. मी वक्तृत्व कलेत प्रवीण होतो. त्यामुळे कर्मवीरांचा मी लाडका विद्यार्थी होतो. विविध सभेत बोलण्यास ते आम्हाला संधी देत. त्यांच्या या संपर्काने आमच्यावर हळूहळू चांगले संस्कार होऊ लागले.

■ **प्रश्नकर्ता** : म्हणजे आपण तेथे होस्टेलला होता का ?

■ **दादा** : हो. हॉस्टेललाच होतो. श्रमदानाच्या संस्कारामुळे आमची सर्व कामे आम्हीच करीत असू. याच कालावधीत सयाजीराव गायकवाड हायस्कूलची कॅंप एरीयात स्थापना केली. मात्र युद्धाचा भडका जसा उडायला लागला तसे आम्हीही उघडपणे स्वातंत्र्य चळवळीत कार्यरत झालो. घरी येऊन पुन्हा तोच कार्यक्रम सुरु झाला. त्याचवेळी १९४० चा सत्याग्रह सुरू झाला. सेवादलामार्फत प्रभात फेऱ्या, आंदोलन तीव्र झाले.

■ **प्रश्नकर्ता** : दादा, आपण लहानपणीच या चळवळीत

पडला मग घरातून विरोध वगैरे काही ?

**■ दादा** : घरचा विरोध होताच. कारण घरी चुलत्यांकडे पोलिस पाटीलकी होती. त्यात मी पाच बहिर्णींच्यात एकटाच. मात्र व्ही. टी. पाटलांनी मला विरोध केला नाही. अंकलखोप येथील सत्याग्रहाबद्दल माझ्यावर ब्रिटिश सरकारने वॉरंट काढले. मी भूमिगत होऊन निवृत्ति काकांच्याकडे गेलो. त्याचवेळी इस्लामपूर येथे तहसिलदार कचेरीवर मोर्चा काढण्याचे पांडू मास्तरांनी ठरविले. त्यात मी सहभागी झालो. त्याच्या आधी तासगावात असाच मोर्चा काढला आणि आम्ही तिरंगा फडकाविला. त्यात वि. स. पागे वगैरे होते. पुढे इस्लामपूरच्या मोर्चाची सर्व जबाबदारी माझ्यावर सोपविली. वडूजच्या मोर्च्यावर पोलिसांनी गोळीबार केला. कवठेपिरान, दुधगाव, बागणी, नागाव, पोखर्णी, बावची या गावांची मुख्यत: जबाबदारी पांडु मास्तरांनी प्रचारासाठी माझ्याकडे दिली.

**■ प्रश्नकर्ता** : तरी प्रचाराचा भाग कशा प्रकारचा असायचा ?

**■ दादा** : प्रथम इंग्रजांनी केलेला अन्याय, अत्याचार सांगायचा मग गांधीजींचा इतिहास, चळवळीचे महत्त्व जाहीर सभामधून मांडत असू. मग मोर्च्याने जाऊन इंग्रजांना 'चले जाव' असे घोषणा देऊन सांगत असू. 'करू किंवा मरू' अशी देशभक्ती पर गीते मोठ्याने म्हणत मोर्चा निघत असे. इस्लामपूरच्या मोर्च्यात लोक जमण्यापूर्वीच पांडू मास्तर बेभान होऊन मामलेदार कचेरीवर चालून गेले आणि गोळीबार झाला. वाळवे तालुक्यातील येडे-निपाणीला लागून असलेल्या मल्लिकार्जुन डोंगरावर शेवटच्या श्रावण सोमवारी आम्ही सर्व तालुक्यातील मंडळी एकत्र जमलो आणि यामध्ये मोर्चा, आंदोलन याविषयी आमची महत्त्वाची बैठक झाली. याचवेळी पांडू मास्तर, वसंतदादा पाटलांना तेथे घेऊन आले. याचवेळी वसंतदादांची आणि माझी प्रथम भेट झाली आणि आम्ही आयुष्यभरचे मित्र झालो. आघाडीवर लढणान्या नेत्यांसमोर माझे भाषण झाले.

**■ प्रश्नकर्ता** : पांडु मास्तर, वसंतदादांसारख्या मोठ्यांचा तुम्हाला सहवास लाभला नाही का ?

**■ दादा** : हो, तर नाना पाटलांचा आणि माझा तर निकटचा परिचय होता. राघु आण्णा लिमये, बर्डे मास्तर, रामानंद भारती यांचा खूप सहवास लाभला. पुढे दुधोंडीला भूमिगत असताना रामानंद भारती यांच्या बरोबर गेलो. तेथे दुधोंडीला शाम जाधव, एस. बी. शिंदे व मी, शिवराम जाधवांच्या घरी राहिलो. त्यांच्या मळ्यात रामानंदजी राहात होते. त्यांनी आम्हाला कुंडलला जाण्याचा सल्ला दिला. आम्ही कुंडल गावी येऊन आमच्या कारवाया करीत असू व पुन: दुधोंडीला येत असू. यावेळी जी. डी. लाड, नाथा लाड यांची बांगीचा डाक बंगला पेटविण्याची योजना चालली होती. आम्ही सर्वांनी तो बंगला पेटविला. रेल्वेच्या प्लेट काढणे, तारा तोडणे हे उद्योग सुरु होतेच. जन-जागरण मोहीमही सुरु होतीच. दुधोंडी, कुंडल, विटा, ताकारी, भिलवडी आदि गावातही राम पवार वगैरे साथीदारांच्या मदतीने कारवाया सुरु होत्याच.

**■ प्रश्नकर्ता** : विशेष प्रसार-माध्यमे नसतानाही ताकारी, भिलवडी सारख्या मागास गावात ही चळवळ पोहोचविण्याचे रहस्य काय ?

**■ दादा** : त्याला कारण म्हणजे महात्मा गांधी ! त्यांचा वैयक्तिक सत्याग्रह, राष्ट्रीय लढा. त्यामुळे इंग्रजांबद्दल अप्रीती पसरण्यास मदत झाली. गांधीजींच्या आंदोलनात विशेषत: वैयक्तिक आंदोलनात निवडक सैनिक निवडल्याने इतर युवकांच्यातही वीरश्री संचारली आणि ते आंदोलनामधून आपला विरोध प्रकट करू लागले. विरोधी परिस्थितीने पेटलेली माणसे कशालाही जुमानत नाहीत आणि अशीच माणसं आपल्या जीवनात घेतलेला वसा पूर्ण करतात हा माझा अनुभव आहे. आता हेच पहा ना ! घरात विरोध असतानाही मी या स्वातंत्र्य संग्रामात उडी घेतली नाही का ?

**■ प्रश्नकर्ता** : हो, नक्कीच !

**■ दादा** : पुढे कुंडल येथे राम पवार, यशवंतराव चव्हाण यांची भेट झाली. कोल्हापूर, सांगली अशी मजल मारीत वसंतदादांना आमंत्रण दिले. समवयस्कच कांही तरी करू शकू असे मला वाटू लागले. वसंतदादा, दत्ता शिंदे, बाबूलाल शहा असा आमचा एक ग्रुप स्थापन केला. त्याची आठवण म्हणून 'विश्रामबाग स्टेशन' पेटवून मुहूर्त केला.

**■ प्रश्नकर्ता** : पेटवले म्हणजे नेमके काय केले ?

**■ दादा** : रात्री रॉकेल नेऊन, अचानक हल्ला करून स्टेशन मास्तरला ताब्यात घेत असू. त्याच्याकडून रेकॉर्ड घ्यायचं आणि रॉकेल ओतून पेटवून द्यायचं दुसरं काय ? आणि भडका उडाला की तिथून पळ काढायचा. अशा पद्धतीने आम्ही नांद्रे, धुळगाव, डाक बंगला, आरे, बेडग, सलगर आदि स्टेशने पेटविली. डिग्रजचे टपाल ऑफिस लुटले त्यावेळी मोटारीने टपाल जात होते. तासगावचेही टपाल लुटले आणि त्याच रात्री तासगावचा डाक बंगला पेटवून दिला. निमणीचा डाक बंगलाही आम्हीच पेटवला होता.

■ **प्रश्नकर्ता** : म्हणजे आपण एकंदर त्यावेळच्या प्रस्थापित इंग्रज सरकारला डिस्टर्ब करत होता तर ?

■ **दादा** : होय. भूमिगत कार्यकर्त्यांवर कारवाई करण्यास सामान्य जनतेवर अन्याय करण्यास पोलिसांना वेळ मिळू नये हा आमचा उद्देश होता. पोलिसांना इकडे-तिकडे पळवायचे, त्यांना व्यस्त ठेवून शासकीय यंत्रणा ठप्प करणे हा हेतु त्यामागे असायचा. इंग्रजांच्या मोटारगाड्या, रेल्वे आदि दळण-वळणाची व्यवस्था मोडकळीस आणत असू. इतकंच नव्हे तर प्रसंगी पूल उडवून देणे आदि कामेही आम्ही पार पाडली आहेत.

याच चळवळीत कोल्हापूरचे एक कायकर्ते डी. डी. बराले हे छोटे हातबाँब मोठ्या कौशल्याने बनवत असत. प्रसंगी त्यांचाही आम्ही वापर केला आहे. हातबाँब कसे तयार करायचे हे शिकविण्याकरिता त्यांनी आमच्याकडे एक माणूस पाठविला होता. बाटलीमध्ये दारु भरून हे बाँब आम्ही तयार करीत असू आणि ते उडतात की नाही याची ट्रायलही घेत असू. पद्माळ्यांच्या पद्मा मंदिरावर आम्ही हा बाँब फेकून पाहिला असताना तेथील भिंतीला गेलेला तडा आजही पहावयास मिळेल.

■ **प्रश्नकर्ता** : दादा, तरी साधारण यावेळी आपलं वय काय होतं ?

■ **दादा** : त्यावेळी मी २१/२२ वर्षांच्या असेन.

■ **प्रश्नकर्ता** : म्हणजे आपण अगदी ऐन तारुण्यातच होता की.

■ **दादा** : हो तर आणि त्यावेळी आम्हाला जिवाची अजिबात फिकीर नव्हती. शाळेतील गुरुजींनी आमच्यावर केलेले संस्कार दृढ स्वरूपाचे होते. ते आम्हाला नेहमी सांगत. माणूस जन्माला एकदाच येतो. तो सोबत कांही आणीत नाही. आणि मेल्यावरही सोबत काही घेऊन जात नाही. जीवन आणि मृत्यू यांच्यामध्ये प्रत्येक माणसाची ओळख म्हणजे त्याचे कर्तृत्व होय. जनहितासाठी हा देह खर्ची पाडणं म्हणजेच जीवन सार्थकी लागणे होय. ही शिकवणूक आमच्या मनात पक्की घर करून बसली होती.

■ **प्रश्नकर्ता** : आता असे संस्कारशील शिक्षक नाहीत, होय ना ?

■ **दादा** : त्यावेळचे सर्व शिक्षक राष्ट्रहिताने झपाटलेले होते. आणि हे त्यांच्या चालण्या-बोलण्यातून व्यक्त होत असे. म्हणूनच माझ्यासारखे अनेक विद्यार्थी स्वातंत्र्य संग्रामामध्ये ओढले गेले.

■ **प्रश्नकर्ता** : दादा मला आणखी एका गोष्टीचं फार मोठं कौतुक वाटतं आणि ते म्हणजे त्यावेळची ग्रामीण जनता जिवावर उदार होऊन, तुम्हाला लपवण्यात, जेवू घालण्यात मदत करी, हे मोठं धाडसच नाही का ?

■ **दादा** : एवढंच नव्हे तर ही ग्रामीण जनता पोलिसांच्या बातम्याही आम्हाला देई. आम्हाला पकडण्यासाठी गावात पोलिसांनी वेढा दिला, तर प्रसंगी धाडसाने आम्हाला लपवून ठेवत. प्रसंगी त्यांनी मारही खाल्ला आहे. पण पोलिसांना आमचा ठाव-ठिकाणा लागू दिला नाही. 'शिगाव' गावी अक्षयतृतीयेचे दिवशी माझ्या एका मित्राच्या बहिणीचे लग्न होते. आम्ही कांहीजण त्या लग्नात सामील झालो होतो. ही बातमी पोलिसांना मिळाली आणि त्यांनी सबंध गावाला वेढा घातला. त्यावेळी मला पकडून देणाऱ्यास बक्षीसही जाहीर झाले होते. साताराचा त्यावेळचा डी. एस्. पी. गिलबर्ट हा स्वत: सातशेहे पोलिस घेऊन जातीने हजर राहिला. रात्र होताच आम्ही आमच्या जवळच्या बंदुका लोड करून चोर वाटेने गावाबाहेर पडलो. पोलिसांना कळताच त्यांनी आमचा पाठलाग केला. पण आम्ही त्यांच्यावर अचानक गोळीबार सुरु केला. धनदाट अंधारामुळे त्यांना आमचा अंदाज आला नाही. आणि आम्ही तेथून पलायन करण्यात यशस्वी झालो.

मराठमोळ्या राकट जनतेचं हे वैशिष्ट्य की रात्री-अपरात्री आम्ही एखाद्याच्या घरात आसऱ्याला गेलो तर पहिला प्रश्न असे 'पोरांनो जेवलायसा का नाही ?' आग्रह करून वाढत असत. आमची चळवळ यशस्वी झाली ती अशा आया-बहिणी, माय-बापांच्यामुळेच. त्यांना देखील ही जाणीव होती की, गांधीबाबांनी इंग्रजांविरुद्ध पुकारलेल्या लढ्यामध्ये आम्ही काम करीत आहोत. त्यांच्या या अलोट प्रेमामागे त्यांची ही जाणीव काम करीत होती की, महात्मा गांधीच्या आदेशानुसारच आम्ही पोरं आपलं घरदार सोडून रानो-माळ भटकत आहोत. आम्हाला मदत करणं म्हणजे गांधीबाबांना मदत करणं असं ती समजत होती. सामान्य जनतेचं गांधीबाबाच्या वरचं त्याचं हे अलोट प्रेम, श्रद्धा यामुळेच या जनतेचं आम्हांला सहकार्य मिळत होत.

■ **प्रश्नकर्ता** : दादा, हे ऐकताना महात्मा गांधीचा मोठेपणा सहज लक्षात येतो. तुम्हाला एकूण किती वर्षाची शिक्षा झाली ?

■ **दादा** : मला पकडून देणाऱ्यास इंग्रजांनी बक्षीस जाहीर केल्यामुळे कांही नतद्रष्टांच्या तोंडाला पाणी सुटले आणि त्यांनी पोलिसांना गुप्त वार्ता दिली. आणि मी पकडला गेलो. शिगावहून मला येरवड्याला नेण्यात आले.

**■ प्रश्नकर्ता :** तुम्हाला नेमकं कुठं पकडलं ?

**■ दादा :** गावातच पकडलं. गोटखिंडीचे शंकर पाटील याला मारल्याबद्दलची आमच्यावर केस दाखल केली. त्यातून आम्ही निर्दोष सुटलो. तरीही आम्हाला स्थानबद्ध करून पुढे येरवड्याला पाठविण्यात आले. तेथून आम्हां सर्वांना नाशिक जेलमध्ये हलविण्यात आले. तेथील जेल इलेक्ट्रिकल करंट सोडलेल्या तारांनी सुसज्ज असा होता. आणि तेथेही एका स्वतंत्र कक्षात आम्हाला ठेवण्यात आले होते. तेथील पहिल्या कक्षात बंगालचे महान क्रांतिकारक 'निखील चक्रवर्ती' होते. दुसऱ्या कक्षात संगमनेरचे प्रसिद्ध वकील 'भास्कर दुर्वे' होते. तिसऱ्या कक्षात मी स्वत: तर चौथ्या कक्षामध्ये बिळाशीचे 'गणपतराव पाटील' होते. पागे, एस्. एम. जोशी आदि क्रांतिकारक 'अ' वर्गात होते आणि आम्ही सर्व 'ब' वर्गात होतो. १८ डिसेंबर १९४५ साली तेथून माझी सुटका झाली.

**■ प्रश्नकर्ता :** म्हणजे एकूण तुरुंगवास किती झाला ?

**■ दादा :** जवळजवळ १४ महिने तुरुंगवास झाला आणि दोन वर्षे मी भूमिगत अवस्थेत होतो. तुरुंगातील सुटेकनंतरही सळसळलेलं माझं रक्त मला गप्प बसू देईना आणि मी वडगांव गावी दारु मुक्ती आंदोलन सुरु केले. मलकापूरपासून सांगलीपर्यंत वारणेच्या दोन्ही तीरावरील दारुचे गुत्ते उधळून लावणे, दारु पिणाऱ्यांना ठोकणे, गाढवावरून त्यांची धिंड काढणे आदि कार्यक्रम सुरु केले. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे महात्मा ज्योतिबा फुल्यांच्या विचारांचा पगडा माझ्यावर असल्यामुळे आणि महात्मा गांधींनी आवाहन केल्याप्रमाणे मी सामुदायिक लग्ने लावून देण्याची पद्धत आरंभली. केवळ एकमेकांना हार घालून पति-पत्नींचा स्वीकार करायला लावणं अर्थात साधे पद्धतीने म्हणजेच गांधी पद्धतीने लग्ने लावली. मी स्वत: 'पौराहित्य' करीत होतो. पारंपारिक, खर्चिक पद्धतीला पूर्णत: फाटा दिला.

**■ प्रश्नकर्ता :** म्हणजे याचा अर्थ असा दादा की, आपलं कार्य केवळ स्वातंत्र्य मिळवण्यापुरतं मर्यादित नव्हतं तर त्याही पुढे जाऊन स्वतंत्र भारताचं प्रबोधनही करणं वगैरे...

**■ दादा :** हो. महात्मा ज्योतिबा फुल्यांचं चरित्र वाचून आम्ही भारावून गेलो होतो. एक स्त्री शिकली की सर्व कुटुंब शिकत आणि कुटुंबामुळे समाज शिक्षित होतो. या विचारापासूनच प्रेरणा घेऊन कर्मवीर भाऊराव पाटलांनी डोंगर कपाऱ्यात रयत शिक्षण संस्थेचं कार्य नेऊन पोहोचवलं. कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज तर आमचे प्रेरणा स्थान होते. विठ्ठल रामजी शिंदे, विदर्भातील पंजाबराव देशमुख अशा महान लोकांच्याकडून आम्हाला प्रेरणा मिळत होती.

**■ प्रश्नकर्ता :** दादा, ज्यादिवशी स्वातंत्र्य मिळालं त्यादिवशी आपण कुठे होता ?

**■ दादा :** त्यादिवशी मी सातारा येथे होतो. मी सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीचा ऑफिस सेक्रेटरी होतो. रामानंद भारती अध्यक्ष होते, वसंतदादा पाटील आणि किसनवीर हे सेक्रेटरी होते. आम्ही भावविभोर होऊन साताऱ्याच्या अजिंक्यताऱ्यावर पोहोचलो. कारण कोंडाणा जिंकल्यावर जशी विजयाची वार्ता गंजी पेटवून राजमाता जिजाबाईंना कळविली होती तशीच गंजी रात्री १२ वाजून १ मिनिटाने पेटवून आम्ही स्वातंत्र्याचा आनंद व्यक्त केला.

**■ प्रश्नकर्ता :** दादा, सध्या आपला दिनक्रम कसा आहे ?

**■ दादा :** सध्या मी विवंचनाविरहित आहे आणि या वयातही मी कुठल्याही संकटाची पर्वा करीत नाही. शाळा-महाविद्यालयातून व्याख्यानाद्वारे मी समाज प्रबोधन करीत असतो आणि माझे विचार परखडपणे मांडत असतो. आजच्या युवकांना कांही बौद्धिक देण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.

**■ प्रश्नकर्ता :** दादा, आपण मघाशी म्हणालात, तशी पूर्वी माणसं वेगळी होती आणि आता...

**■ दादा :** आज परिस्थिती अशी आहे की, कोणी-कोणाशी खरं बोलत नाही. आजची समाज व्यवस्था असत्यावर आधारीत आहे. अलीकडेच कोल्हापुरातील एका व्याख्यानामध्ये मी ही माझी खंत जाहीरपणे व्यक्त केली. आजच्या भारताचे 'सत्यमेव जयते' हे ब्रीद नसून 'सत्य एकमेव जळते' असे आहे. स्वार्थ आणि पैसा या भोवती दुनिया फिरते आहे. एका मराठी कवीने म्हटल्याप्रमाणे म्हणावेसे वाटते..

*'उध्दवा, अजब तुझे सरकार !*
*लहरी राजा, प्रजा आंधळी, अधांतरी दरबार,*
*लबाड जोडिती इमले माड्या,*
*गुणवंताना मात्र झोपड्या*
*पतिव्रतेच्या गळ्यात धोंडा, वेश्येला मणिहार !*
*अजब तुझे सरकार''*

शब्दांकन व संपादन

**डॉ. सौ. सुमित्रा बाबासाहेब पोवार**

# कमलाची घोडदौड...

## कमला महाविद्यालयाची स्थापना

१९८४ साली कमला महाविद्यालयाची स्थापना झाली. ज्यांच्या दातृत्वातून ताराराणी विद्यापीठ उदयास आले त्या कै. सौ. सरोजिनीदेवी पाटील तथा पूर्वाश्रमीच्या सौ. कमलादेवी यांचे नाव महाविद्यालयास देण्यात आले. कै. काकाजी तथा डॉ. व्ही. टी. पाटील व त्यांच्या सुविद्य पत्नी कै. सौ. काकीजी तथा सौ. सरोजिनीदेवी पाटील यांचे आशीर्वाद, कॉलेजचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील कुशल नेतृत्व व कठोर परिश्रम यामुळे कमला महाविद्यालयाने प्रगतीची उंच भरारी मारली आहे.

## कमला नियतकालिकाचे यश

सन १९९७-९८ यावर्षी शिवाजी विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत कमला १९९७-९८ नियतकालिकातील खालील लेखास पारितोषिके मिळाली -

| | | |
|---|---|---|
| लक्षात राहिलेले गणपतीपुळे (मराठी प्रवास वर्णन) | कु. रंजना पोवार, बी. ए. भाग-२ | प्रथम क्रमांक |
| दुर्दैवी मंगी (मराठी एकांकिका) | कु. गीता मस्कर, बी. ए. भाग-२ | प्रथम क्रमांक |
| सुहाना सफर (यात्रा वर्णन) | कु. मंगला कोकरे, बी. ए. भाग-३ | द्वितीय क्रमांक |

## शैक्षणिक झेप

आमच्या महाविद्यालयातील एकूण विद्यार्थिनी संख्या १५७३ पर्यंत वाढली आहे. संख्यात्मक वाढीबरोबर गुणात्मक प्रगती खालील परीक्षा निकालावरून स्पष्ट होते-

| | | |
|---|---|---|
| बारावी कला ८५ % | प्रथम वर्ष कला ९६ % | प्रथम वर्ष वाणिज्य ९८ % |
| बारावी वाणिज्य ९१ % | द्वितीय वर्ष कला ९७ % | द्वितीय वर्ष वाणिज्य ९५ % |
| बारावी विज्ञान ९१ % | तृतीय वर्ष कला ९५ % | तृतीय वर्ष वाणिज्य ८८ % |

पदवी विभागात ३२ विद्यार्थिनींनी प्रथम श्रेणी प्राप्त केली. त्यांची शाखावार संख्या

| | |
|---|---|
| हिंदी स्पेशल ११ | इंग्रजी स्पेशल ०३ |
| समाजशास्त्र ०३ | अर्थशास्त्र ०३ |

बी. कॉम. भाग-३, ॲडव्हान्स अकौंटन्सी ॲन्ड ऑडिटिंग या विषयात १२ विद्यार्थिनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या.

## यशोगाथा

कु. माधवी प्रतापराव माळी या विद्यार्थिनीने बी. ए. भाग-३ हिंदी स्पेशल या विषयात शिवाजी विद्यापीठामध्ये प्रथम क्रमांक पटकाविला आहे. तिने राष्ट्रभाषा प्रचारक मंडळाचे 'हिंदी पारितोषिक' प्राप्त केले.

कु. रीना रामचंद्र कांबळे हिने बी. ए. भाग-३ हिने समाजशास्त्र विषयात विशेष प्राविण्यासह शिवाजी विद्यापीठामध्ये प्रथम क्रमांकाचा बहुमान मिळविला आहे. तिने 'डॉ. विलास संगवे' समाजशास्त्र पारितोषिक प्राप्त केले.

## ग्रंथदान : श्रेष्ठ ज्ञानदान

पंडित जवाहरलाल नेहरूंनी म्हटले आहे, ''ग्रंथालये ही आधुनिक भारताची मंदिरे आहेत.' या मंदिररूपी ग्रंथालयाच्या विकासामध्ये 'जिंदाल ट्रस्ट' चा मोलाचा वाटा आहे. आमच्या ग्रंथालयास 'जिंदाल ट्रस्ट' ने यावर्षी ३५,००० रुपयाची पुस्तके देऊन आमच्या ग्रंथालयाची शोभा वाढविली आहे. यामुळे आमच्या कार्यास प्रोत्साहन मिळाले आहे.

## श्रीमती शकुंतलादेवी हिंदूराव घाटगे अभ्यासिका

अत्याधुनिक सोयींनीयुक्त अशी 'श्रीमती शकुंतलादेवी हिंदुराव घाटगे अभ्यासिका' यावर्षी पूर्णत्वास आली. चांगल्या कामास सज्जनांचा नेहमीच हातभार असतो. सदर अभ्यासिकेस मा. शकुंतलादेवी घाटगे यांनी पाच लाख रुपये देणगी दिली. त्यांच्या सहकार्याने -

'ज्ञान दिल्याने ज्ञान वाढते<br>त्या ज्ञानाचे मंदिर हे<br>सत्य शिवाहून सुंदर' हे ची प्रचीती आली.

## राष्ट्रीय छात्र सेना

मुंबई येथे झालेल्या नेमबाजी स्पर्धेसाठी ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन-सांगली, सातारा, सोलापूर, कोल्हापूर, सिंधुदूर्ग या पाच जिल्ह्यातून सार्जंट सीमा गावडेची एकमेव निवड झाली.

## महिला विकास दालने

महिलांना स्वयंपूर्ण व सबल करण्यासाठी आमच्या महाविद्यालयात प्रौढ व निरंतर शिक्षण विभागामार्फत अल्प मुदतीचे 'ज्युदो कराटे' व 'ड्रेस डिझायनिंग' हे अभ्यासक्रम चालविणेत आले.

## क्रीडा क्षेत्रातील उज्ज्वल यश

शिवाजी विद्यापीठ संघातून कु. वैशाली शिंदेची व्हॉलीबॉलमध्ये, कु. माधवी चोरगेची बास्केट बॉलमध्ये, तर कु. अश्विनी पाटीलची हॅन्डबॉलमध्ये निवड झाली. कु. वैशाली शिंदे व कु. कविता पाटीलची महाराष्ट्र आंतर विद्यापीठ अश्वमेध व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड झाली.

**-संपादिका**

# भावपूर्ण श्रद्धांजली

- कविवर्य नाटककार वि. वा. शिरवाडकर
- न्या. माधवराव एच्. जाधव - विश्वस्त सदस्य
- तात्यासो तेंडूलकर - उद्योगपती
- आमदार दे. भ. रत्नाप्पा कुंभार
- तलद महमूद - गायक
- कवी प्रदीप प्रख्यात - राष्ट्रकवी
- आमदार शंकर धोंडी पाटील
- शंकर खंडू पाटील - कथाकार
- फ्रँक सिनात्रा - अभिनेता
- बाबा पाटील - मराठी कथाकार
- प्रोतिमा बेदी - उडीसी नृत्यांगना
- डॉ. देबसिकदार - मनोविकार तज्ञ

# ।। मराठी विभाग ।।



बलसागर भारत होवो
विश्वात शोभुनी राहो ।। धृ ।।

हे कंकण करिं बांधियले
हे जीवन त्याला दिधलें
हा निश्चय आतां न ढळे
कार्यार्थी जीवही जावो ।। बल. ।।

बाहूंत वीर्य संचरले
चित्तांत तेज संचरले
देहांत धैर्य संस्फुरले
देशार्थ मरायाला हो ।। बल. ।।

- साने गुरुजी

## मुखपृष्ठा संबंधी

कमलाचे सन १९९८-९९ चे मुखपृष्ठ विशेष राष्ट्रीय घटना, प्रसंग व व्यक्ती यांची ओळख करून देणारे आहे. महाराष्ट्राचे आवडते साहित्यकार 'साने गुरुजी' यांची जन्मशताब्दी चालू वर्षी येते. तसेच कोल्हापूरचे सुपूत्र, थोर समाजवादी, समाज प्रबोधनवादी व जातिवंत चित्रकार 'माधवराव बागल' यांचीही जन्मशताब्दी चालू वर्षी आहे. म्हणून मुखपृष्ठावर त्यांचा आवर्जुन समावेश केला आहे.

एका थोर भारतपुत्राचा 'अमर्त्य सेन' यांचा गौरव जगभर झाला आहे. मुखपृष्ठावर त्यांचे होणारे दर्शन भारतीयांचा उत्साह वाढविणारे आहे. तसेच दोन राष्ट्रीय महत्त्वाच्या घटना मुखपृष्ठातून व्यक्त होत आहे. त्यातील एक आहे पोखरण येथे झालेली 'अणुचाचणी' व दुसरी आहे 'कोकण रेल्वे'. तंत्रज्ञानातील भारतीयांची अभिमानास्पद प्रगती दाखविण्यास ह्या दोन घटना पुरेशा आहेत.

- संपादिका

# गद्य विभाग


♦ सानेगुरुजी : एक आकलन (वैचारिक लेख) .................................. कु. वैशाली तानाजी निकम
♦ भाई माधवराव बागल यांचे समाज प्रबोधन (वैचारिक लेख) ................. कु. नूतन सतिश वायंगणकर
♦ म्हवन्यादा (व्यक्तिचित्र) ........................................................ कु. सरस्वती सुभाष शेवाळे
♦ प्लॅस्टिकच्या हद्दपारीला सज्ज व्हा ! ............................................ कु. अनुराधा रामचंद्र संभापूर
(विज्ञान विषयक लेख)
♦ भारत कधी कधी माझा देश आहे (पुस्तक परीक्षण) .......................... कु. पुष्पा लक्ष्मण लटके
♦ एक पूर्णविराम (लघुकथा) ........................................................ कु. युगंधरा विलासराव घाटगे
♦ सामान्यांचे अर्थशास्त्र (विज्ञानेतर लेख) ........................................ कु. रंजना कल्लाप्पा चौगुले
♦ पुणे तेथे काय उणे (प्रवास वर्णन) ............................................... कु. स्वप्नगंधा अ. गायकवाड
♦ शेतकऱ्यांच्या आत्महत्या-चिंता व चिंतन ........................................ कु. मनिषा विवेक गुरव
(सामाजिक समस्या लेख)
♦ जिद्द (लघुकथा) ................................................................... कु. शैलजा कृष्णाजी जाधव
♦ दुर्दैवी बाप, दुर्दैवी मुलगा (एकांकिका) ......................................... कु. वर्षा शिवाजी जाधव


# पद्य विभाग


♦ एकविसावे शतक ........................... कु. उज्ज्वला लक्ष्मण पाटील
♦ ऋणानुबंध .................................. कु. अश्विनी स्वामी माने
♦ ही समाजाची रीत .......................... कु. क्रांती शशिकांत माळी
♦ सावली...................................... कु. ज्योती भगवान काळे
♦ उपकार ..................................... कु. वर्षा शिवाजी जाधव
♦ का ? ........................................ कु. माधुरी आत्माराम बच्चे
♦ उद्रेक ....................................... कु. मनीषा भूपाल सूर्यवंशी
♦ वाट ......................................... कु. संगीता साळोखे
♦ जीवन ...................................... कु. माया श्रीनिवास पाटील
♦ भारत गौरव ................................ कु. देसाई
♦ व्यसन ...................................... कु. संगीता आयरे
♦ श्रावण...................................... कु. शीतल नानासाहेब भोरे
♦ जीवन ...................................... कु. पुष्पा लक्ष्मण लटके
♦ आई ......................................... कु. तेजस्विनी भा. राजेशिर्के
♦ जीवनाचे सार्थक ........................... कु. शैलजा कृष्णाजी जाधव
♦ आजचा देव ................................ कु. रूपाली मोहिते





**साने गुरुजी जन्मशताब्दी निमित्त खास लेख**

# साने गुरुजी : एक आकलन

**कु. वैशाली तानाजी निकम**, बी.ए. भाग ३

२४ डिसेंबर १९९८ ते २४ डिसेंबर १९९९ या साने गुरुजींच्या जन्मशताब्दी वर्षातच नव्हे; तर वर्षानुवर्षे ज्यांचं पुण्यस्मरण व्हावं असे साने गुरुजी म्हणजे एक असामान्य व्यक्तिमत्त्व. मेणाहून मऊ आणि वज्राहून कठोर असं कुणाचं वर्णन करायचं झालं तर सर्वप्रथम साने गुरुजींचं नाव घ्यावं लागेल. २४ डिसेंबर हा जन्मदिवस येशूची आठवण करून देणारा जसा होता, तसाच तो साने गुरुजींच्या जीवनप्रवासाची आणि जीवन प्रणालीची दिशा ठरवणारा आणि ओळख करून देणारा होता. साने गुरुजी म्हणजे साहित्यिक, कार्यकर्ता, शिक्षक आणि कुटुंबघटक अशी चतुर्विध भूमिका निष्ठेनं निभावणारं चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व. विश्वात विलीन होऊन साऱ्या विश्वाचा होऊ इच्छिणारा हा जीव कुठल्या एका ठिकाणच्या मातीतून घडला नसावा. 'आंतरभारती'चा ध्यास घेतलेले साने गुरुजी केवळ महाराष्ट्राचे नव्हते एवढेच काय एकट्या भारताचेही नव्हते, तर अवघ्या विश्वाचे होते.

रवीला मित्र मानून त्याच्याशी स्नेहभाव जागवत उदयाचली आलेला हा सूर्य साहित्यभास्कर ठरावा असं नियतीच्याच मनात होतं, नव्हे, नियतीशी तसा करार करूनच हा आदित्य साहित्य क्षितिजावर उदयमान झाला होता आणि समजू उमजू लागल्यापासून हा जीवनातील सकस आणि सरस अर्क हिरण्यगर्भ ओंजळीतून आणि सव्यसाची लेखणीतून तृषार्त जगाला भरभरून देऊ लागला होता. गद्य आणि पद्य अशी दोन्ही प्रकारची जोमदार, सात्त्विक, उत्तमोत्तम रचना करणाऱ्याला आणि भाषणात व संभाषणात सारखंच प्राविण्य संपादणाऱ्याला 'सव्यसाची' म्हटलं जातं. साने गुरुजींनी ही प्रशस्ती कुणाकडे मागितली नव्हती, तर स्वपराक्रमावर संपादन करून सार्थ ठरवली होती. त्यांनी गद्य आणि पद्य अशा दोन्हीही साहित्य विभागात जी कामगिरी केली ती कुणा ना कुणाकडून तरी पुरस्कार मिळावा या स्वार्थ लोलुपतेने केलेली नव्हती, तर लोकांना सुसंस्कार मिळावेत या उत्कट भावनेने व उन्मनी धारणेने जाणीवपूर्वक अखंड आणि अविश्रांत केली होती. या अर्थाने ते साहित्य नभातले सविता होते. खग-मंडलात स्वैर विहार करणारा हा स्वच्छंद पक्षी होता. नीती आणि भक्ती या दोन पंखांच्या बळावर गगनी झेपावणारा हा गरूडपक्षी पृथ्वीतलावरील जनजीवनाचं सुदृढपणे भरणपोषण व्हावं यासाठी सूर्यदेवाचा हा केवळ संदेशवाहक नव्हता, तर जनसामान्यांना सुसंस्कारित करून प्रकाशमान करू इच्छिणारा हा जणू दुसरा भानूच होता ! साने गुरुजी म्हणजे 'शब्दसृष्टीचे ईश्वर'च मानले पाहिजेत.

मराठी मुलखात 'गुरुजी' हे पद सर्वार्थाने जर कोणी यथार्थ केले असेल तर ते साने गुरुजींनीच. शिक्षणाकडं पाहण्याचा गुरुजींचा दृष्टिकोन परमपवित्र, उदात्त, मंगल होता. यालाच वेगळं रूप देताना त्यांनी म्हटलं...



*''करी मनोरंजन जो मुलांचे ।*
*जडेल नाते प्रभूशी तयाचे ।''*

अमळनेर येथील प्रताप हायस्कूलमध्ये १९२९ पासून हा शिक्षक केवळ क्रमिक पुस्तकातले धडे शिकवीत नव्हता, तर जीवनातले वस्तुपाठही देत होता. स्वातंत्र्य प्राप्तीचा ध्यास घेतलेला हा शिक्षक स्वातंत्र्याचे गोड स्वप्न या वस्तुपाठातून विद्यार्थ्यांपुढे रंगवीत होता. क्रमिक पुस्तकातीलच काय, पण आयुष्याच्या ग्रंथातील विषय शिकविताना त्या विषयाशी तादात्म्य पावणारा शिक्षकच विरळा ! अशी विद्यार्थ्यांची साने गुरुजींविषयी धारणा होती. जिव्हाळ्याच्या विषयावर बोलताना त्यांच्या भाषेला चांगलीच धार चढे. गुरुजींचे शिक्षण-विचार असे मूलभूत स्वरूपाचे मौलिक आहेत. लिहिणे, वाचणे, घोकणे आणि परीक्षा देणे, एवढ्या संकुचित अर्थाचे शिक्षण गुरुजींना कधीच अभिप्रेत नव्हते. जीवन फुलविणाऱ्या, खुलविणाऱ्या व आनंदमय करणाऱ्या साऱ्या प्रवृत्ती, कला आणि श्रम यांचाही त्यांच्या शिक्षण-विचारात समावेश होता. उघडच्या सृष्टीत मुलांनी फुलपाखरासारखे स्वच्छंदपणे बागडावे, लहरावे आणि झाडे-झुडपे, लताफुले, पशुपक्षी, नदीनाले, डोंगरदरी, शेतमळे, समुद्र-आकाश या सर्व सृष्टीशी त्यांचा परिचय व्हावा आणि 'मैत्र' जुळावे. निसर्गाशी मुलांना 'हृदयसंवाद' साधता यावा. गुजगोष्टी करता याव्यात अशी त्यांची शिक्षणदृष्टी होती ! बालांची ही 'आनंदप्रवृत्ती' त्यांनी नेमकी हेरलेली होती. म्हणूनच गुरुजींनी मुलांची गोष्ट मुलांना लिहून नि सांगून भेटविली होती.

*'सुश्लोक वामनाचा ।*
*आर्या मयूरपंतांची ।*
*ओवी ज्ञानेशांची ।*
*अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची ॥'*

हे समजायला धनाची नव्हे, मनाची श्रीमंती लागते.

गुरुजींच्या या अनेक पैलूंपैकी आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांचं ''आदर्श कुटुंब'' जीवन. हे कुटुंब जीवन त्यांच्या व्यक्तिगत जीवनापुरतं सीमित नव्हतं, तर 'विश्वकुटुंबकम्' या धारणेनं भारावलेलं व व्यापलेलं होतं. कोकणातल्या पालगडला जन्मलेला मुलगा खानदेशच्या मातीवर अपरिमित प्रेम करतो आणि पुण्याची माती सुगंधित करतो ते सर्व साने गुरुजींच्या वत्सलतेच्या बळावर. गुरुजींनी कुणाचा द्वेष केला नाही. केलं ते प्रेमंच आणि हे प्रेमही इतकं अमाप ... भरभरून. प्रेम करण्यासाठीच तर येशूच्या जन्मदिनी २४ डिसेंबरला हा जन्मला. प्रेम करण्यासाठीच हा जगला. कधी मृत्यूची कल्पना मनाला शिवली तर गुरुजी सर्वांना कळवळून सांगत, 'जगलो तर तुमचा, मेलो तर विश्वात विलीन होऊन विश्वाचा' असं हे जीवन, असं हे रसायन. कुठल्या मातीतून हे वारं आलं, कुठल्या मातीवर हे रसरशीत झालं ... अगम्य विश्वात विलीन होऊन साऱ्या विश्वाचा होऊ इच्छिणारा हा जीव कुठल्या एका ठिकाणच्या मातीतून घडला नसावा. संत विनोबांनी साने गुरुजींचा 'अमृतपुत्र' म्हणून जो गौरव केला होता ते एका संताने दुसऱ्या संताला दिलेलं प्रशस्तिपत्र होतं. झीज सोसल्याविना आयुष्याचं सोनं होत नाही. हेच या महापुरुषानं आपल्या उक्तीतून आणि कृतीतून जगाला सांगितलं होतं.

अशा ह्या विविधांगी दर्शन घडवणाऱ्या साहित्यिकाचा प्रवास वयाच्या ५१व्या वर्षी ११ जून १९५० ला संपला. शंभर वर्षे शेळी होऊन जगण्यापेक्षा एक दिवस वाघाप्रमाणे जगण्यात औचित्य आणि स्वारस्य मानून हा आगळावेगळा जीवनप्रवासी अर्ध्या वाटेवरूनच पश्चिमेकडील क्षितिजावर पायउतार होऊन पलीकडच्या अनामिक, अदृश्य जगात निघून गेला.

◆◆◆

*With Best Compliments from*

**Vijay Chemical Centre**

***Laboratory Equipments, Instruments, Glasswares & Chemicals.***

*S-6, "Royal Courts" 1114, A/1, E Ward,*
*Panch Bunglow, Shahupuri, Kolhapur 416 001.*
*Phone : (O) 529361 (R) 652195*





### भाई माधवराव बागल जन्मशताब्दीनिमित्त खास लेख

# भाई माधवराव बागल यांचे समाज प्रबोधन

**कु. नूतन सतिश वायंगणकर**, एस्. वाय. बी. कॉम.

माधवराव बागल यांचा जन्म २८ मे १८९६ ला झाला. माधवराव बागल हे नाव सर्वांच्याच परिचयाचे आहे. कोल्हापूरचे ते थोर सुपुत्र होते. माधवरावांनी आपल्या प्रभावी, प्रखर व तळमळीच्या ध्येयनिष्ठेने संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न सतत जिवंत ठेवला. महाराष्ट्रीय जनतेत अभूतपूर्व जागृती निर्माण केली. त्यांनी कमालीच्या निष्ठेने, त्यागाने, निर्भयतेने व प्रतिभेच्या अव्याहत प्रवाहाने अनेकांना स्फूर्ति दिली. आघाडी टिकविण्यासाठी जिवाचे रान केले. अशा थोर भाई माधवराव बागल यांच्याविषयी लिहावे तेवढे थोडेच. भाई माधवराव म्हणजे एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व. थोर समाजसेवक, जाणकार लेखक व मुरलेले चित्रकार होते. ते राजकारणी होते पण मतपेटीच्या आहारी गेलेले राज्यकर्ते नव्हते. असे एक ना अनेक गुण त्यांच्यात होते. त्यांचा ओढा धनवान आणि लब्ध प्रतिष्ठित पुढाऱ्यांपेक्षा गरिबांसाठी धडपडणाऱ्या कार्यकर्त्यांकडेच जास्त होता.

त्यांचा दोन अडीच तपांचा काळ राजकारणात आणि राजकीय झगड्यात गेला. त्यांची प्रेरक शक्ती महात्मा फुले होते. 'महात्मा फुल्यांच्या पावलांवर पाऊल टाकून आपणही त्यांचा जनकल्याणाचा मार्ग स्वीकारला पाहिजे' असे ते लोकांना सांगत. 'पक्षातला माणूस पक्ष बंधनात जखडला जातो. त्याला स्वत:चे असे स्वातंत्र्य उरत नाही. स्वत:च्या सद्सद्विवेकबुद्धीस स्मरून त्याला वागता येत नाही' - असे माधवरावांचे मत होते. म्हणून ते कुठल्याही पक्षात नव्हते. त्यांनी अपक्ष राहूनच समाजकार्य केले. पक्षाचा शिक्का मारून घेण्यापेक्षा सत्यशोधक म्हणवून घेणं त्यांना अभिमानाचं वाटायचं. अशा या महान व्यक्तीच्या समाज प्रबोधनाबद्दल थोडक्यात माहिती सांगण्याचा खटाटोप मी या लेखात केला आहे.

माझ्या माहितीप्रमाणे ३०-३५ वर्षांपूर्वी महाराष्ट्रात असंतोष धुमसत होता. संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला पाहिजे अशी अनेक वर्षांपासून भाई माधवराव व त्यांचे सहकारी यांची इच्छा होती. इतर भाषिक राज्ये निर्माण झाली, मात्र महाराष्ट्रावर तेवढे द्विभाषिक लादले गेले हे भाईंना पटले नाही. त्यांनी त्याविरुद्ध लढा पुकारला. १९५१ मध्ये ते संयुक्त महाराष्ट्र परिषद, अमरावतीचे अध्यक्ष झाले. नंतर त्यांनी स्वत: संयुक्त महाराष्ट्र एकीकरण परिषदेची १९५५ साली बेळगाव येथे स्थापना केली. तसेच संयुक्त महाराष्ट्र परिषद चळवळीत कोल्हापूर, मुंबई येथे पुढाकार घेतला. या कार्यात त्यांनी स्वत:ला वाहून घेतले. त्यासाठी त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला. आणि अखेर भाईंचे हे स्वप्न साकार झालेच.

भाई त्यांच्या वडिलांप्रमाणेच सत्यशोधक होते. त्यांनी सत्यशोधक हीरकमहोत्सवी ग्रंथाचे संपादन स्वत:



केले. 'सत्यशोधक हा स्वत: कोणत्याही संप्रदायात बसू शकत नाही. तो सत्यशोधकच राहतो' असे ते म्हणत. राष्ट्र सेवादलाची स्थापना भाईंनीच केली. महाराष्ट्रातील जातिभेद नष्ट करून समतेचे वातावरण निर्माण करण्यात माधवरावांचा मोलाचा वाटा आहे. 'सत्यशोधकांनी खेड्यात मूळ धरून असलेली अस्पृश्यता नष्ट केली पाहिजे' असे ते म्हणत. कोल्हापूरला असलेल्या जगदंबा मंदिरात प्रवेश करण्यास अस्पृश्यांना मनाई होती. पण माधवरावांनी स्वत: पुढाकार घेऊन अस्पृश्यांसमवेत मंदिरात प्रवेश केला. तसेच नृसिंहवाडी येथील पादुका स्पर्शाचा हक्क अस्पृश्यांना मिळवून दिला व त्यांच्याबरोबर घाटावर भोजन केले. ब्रह्मपुरी येथील दुतोंडी मारुती देवालय स्वत:च्या नेतृत्वाखाली खुले केले. लिंगायत वर व महार वधू असे अनेक आंतरजातीय विवाह त्यांनी पुढाकाराने घडवून आणले. अनेक महार, चांभार, मांगवाड्यात तेथील लोकांबरोबर त्यांनी सहभोजने केली. स्वत:चे घरी महार मुलगा ठेवून त्याला वाढविले, शिकविले आणि लोकांसमोर एक आदर्श ठेवला.

१९४१ साली त्यांनी मजूर चळवळ पुकारली. त्यासाठी त्यांनी शाहू मिल मजूर, सिने थिएटर कामगार, शिंपी, औषध नोकर, प्रेस कामगार, व्यापारी नोकर, शाहूपुरी हमाल, राष्ट्रीय विडी कामगार, मेकॅनिक्स, म्युनिसिपल कामगार या सर्व संस्थांचे 'कोल्हापूर संस्थान राष्ट्रीय कामगार संघ' या नावाखाली एकीकरण केले आणि पुढाकार घेऊन त्यांना त्यांचा हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न केला.आपल्या देशाचा आधारस्तंभ शेतकरी. या शेतकऱ्यांसाठीही त्यांनी महान कार्य केले. 'बेकारी व त्यावर उपाय' हे पुस्तक त्यांनी शेतकरी व मजुरास अर्पून पुस्तकाच्या सुरुवातीस म्हटलेच आहे की, 'ज्यांच्या कष्टावर मी जगलो व ज्यांच्या मदतीमुळेच मला ही वाङ्मय सेवा करणे शक्य झाले त्यांची सेवा करणे माझे कर्तव्यच आहे.' १९५८ मध्ये ते शेतकरी कामगार पक्षाचे सभासद होते. १९४० साली शेतकऱ्यांच्या हक्कासाठी त्यांनी प्रचंड मोर्चे काढले. त्यांच्या शक्तीची जाणीव राजसत्तेला होती. त्यांना अनेक प्रलोभने देण्यात आली. पण अशा प्रलोभनांना भुलणारे ते नव्हते. १९३१ साली करवीर तालुक्यात एक राजकीय परिषद झाली होती. त्या परिषदेत बागल यांनी सावकारीचे व्याज कमी करण्याची एक उपसूचना मांडली. 'जबरदस्त व्याजामुळे गोरगरीब आणि शेतकरी नडले जातात' असा मुद्दा त्यांनी प्रभावीपणे मांडला. धान्यभाव वाढल्यांमुळे गरीब लोकांना अन्न खाणे मुश्किल झाले होते म्हणून माधवरावांनी धान्य भाववाढ विरोधी सत्याग्रह पुकारला. त्याबद्दल त्यांना शिक्षाही झाली.

थोर नेत्यांची स्मारके उभारण्यात भाईंचा मोलाचा वाटा आहे. कोल्हापुरात वरुणतीर्थ येथील गांधी स्मारक, म. फुले, आंबेडकर पुतळा, तसेच छ. शाहू पुतळा, गंगावेस उद्यान ही सर्व स्मारके उभारण्यात त्यांनी स्वत: पैसे जमवून मदत केली. पूर्वीच्या कोल्हापूर संस्थानातील २२ हुतात्म्यांनी जबाबदार राज्यपद्धतीसाठी प्रजापरिषदेने केलेल्या लढ्यात बलिदान केले. बागल यांना हा प्रश्न स्वत:च्या जिव्हाळ्याचा वाटत आला होता. गारगोटी मामलेदार कचेरीसमोर बागल मंत्री मंडळाचा पायाही घातला होता. कोल्हापुरात स्मारक स्तंभ उभारला जावा म्हणून त्यांनी खूप प्रयत्न केले. हुतात्म्यांच्या नावाची बाग तयार करण्याची योजना जे. पी. नाईक यांनी माधवरावांच्याच सांगण्यावरून आखली होती. पण भाई माधवरावांची ही मनीषा कित्येक वर्षांनी पूर्ण झाली. जेव्हा बागल मंत्री मंडळाची स्थापना झाली तेव्हा त्यांनी हुतात्म्यांच्या कुटुंबियांना दरमहा ४० रुपयाप्रमाणे २० वर्षे मानधन देण्याचा ठराव पास केला.

भाई कोल्हापूरचे थोर सुपुत्र होते. कोल्हापूर त्यांची मातृभूमी. या मातृभूमीचे पांग त्यांनी शेवटपर्यंत फेडले. तिची मनोभावे सेवा केली. कोल्हापूर संस्थानच्या लोकशाहीत त्यांनी भाग घेतला. खरं तर राजकीय चळवळीत पडण्यापूर्वी त्यांनी खादी प्रचाराला सुरुवात केली. ते खादीचे उपासक होते. त्यांचा पोषाख जरी रुबाबदार होता तरी तो खादीचाच होता. त्यांनी करवीर इलाख्यात खादी संघाची स्थापना केली. संपूर्ण महाराष्ट्रात त्यांनी खादीचा प्रचार केला. लोकांना खादीविषयी



आपली श्रद्धा पटवून देताना त्यांनी इस्लामपूरला एका सभेत स्वत:चे सातशे-आठशे रुपयाचे किमती कपडे जाळून टाकले. ते खादीला 'महात्माजींची कामधेनू' म्हणत. त्या नावाचे त्यांचे पुस्तकही आहे.

त्यांनी वेळ प्रसंगी मित्राचीही कधी गय केली नाही. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्यावरही त्यांनी द्विभाषिक म्हणून टीका केली. त्यांनी अपक्ष राहूनच योग्य वाटेल त्या पक्षास सहाय्य केले. लढा आला की भाई कधीही स्वस्थ बसत नसत.

ते काँग्रेस पक्षाचे नव्हते पण त्यांनी पक्षाला सतत पाठिंबा दिला. कारण या पक्षात माधवरावांसारखे थोर विचारांचे समाजसेवक होते. कोल्हापुरात काँग्रेसला अनुकूल असे वातावरण तयार करण्यात माधवरावांचा वाटा फार मोठा आहे. त्यांनी कोल्हापूर जनतेची फार सेवा केली. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण तर त्यांना "कोल्हापुरातील राष्ट्रीय असंतोषाचे जनक" म्हणत. माधवरावांनी संस्थानी आमदानीत जनतेच्या मूलभूत हक्कासाठी प्रचंड असे आंदोलन केले. त्यासाठी खडतर हालअपेष्टा सहन केल्या. कठीणतर अशा प्रसंगाला तोंड दिले. अनेकवेळा तुरुंगवास पत्करला. एवढ्या महान त्यागाचा किंचितही मोबदला त्यांनी घेतला नाही. भाईंनी जनतेला काँग्रेस प्रवेशाची हाक देताच कोल्हापुरातील हजारो लोकांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. काँग्रेसमधील अनिष्ट प्रवृत्तींवर त्यांनीच प्रहार केला.

माधवराव हे स्वभावाने व गुणांनी कलावंत होते. ते उत्कृष्ट चित्रकार होते. निसर्गाच्या सान्निध्यात चित्र काढताना ते सर्व विसरून जात. आयुष्यभर कर्तृत्वाच्या कुंचल्याने त्यांनी हरिजनांच्या उद्धाराची, संस्थानी प्रजेच्या हरतऱ्हेच्या हक्कांची आणि संस्थानात आवश्यक असलेल्या राज्यपद्धतीची, शेतकरी आणि मजूर यांच्या उन्नतीची चित्रे रंगवली. कोल्हापुरात जे. जे. स्कूल ऑफ आर्ट स्कूल उभारण्यासाठी माधवरावांनी खटपट केली होती. कोल्हापुरातील आर्किटेक्चर स्कूल व कलानिकेतन या संस्थांना व ते चालवणाऱ्यांना उत्तेजन सरकारने द्यावे असा लेख त्यांनी पुढारीत लिहिला होता. आर्ट एक्झिबिशनबद्दल सरकारला अनेक चांगल्या सूचना केल्या होत्या. कलेबरोबरच इतर शैक्षणिक क्षेत्रातही त्यांचे मोलाचे योगदान आहे. १९६० साली माधवराव जेव्हा महाराष्ट्र सरकारच्या तिसऱ्या वर्षाच्या पंचवार्षिक योजना सल्लागार समितीवर सभासद होते तेव्हा शिवाजी विद्यापीठाबाबतची योजना निवेदनाच्या स्वरूपात यशवंतराव चव्हाण यांच्यापुढे मांडली ती त्यांनीच. शिवाजी विद्यापीठ व्हावे अशी माधवराव व त्यांचे सहकारी यांची अनेक वर्षांची महत्त्वाकांक्षा होती. शिवाजी विद्यापीठ हे अनेक विषयांना चालना देणारे असावे. ज्ञान देणारे, नवी पिढी निर्माण करणारे, अनेक शाखांचा समावेश करणारे असे असावे असे आपले विचार बागल यांनी समितीत मांडले. अशाप्रकारे शिवाजी विद्यापीठ आदर्श बनवण्यात बागल यांचा मोलाचा वाटा आहे.

लढा आला की भाई कधीही स्वस्थ बसत नसत. हा साहसी समाजसेवक वरून कठोर दिसत असला तरी मनाने फार प्रेमळ होता. घरी पत्नी अंथरुणाला खिळली असतानाही ते बेळगावच्या सत्याग्रहात उतरले. १९५५ सालच्या बेळगावच्या लढ्यातील ते पहिले सत्याग्रही होते. स्वत: निर्मळ राहून, रागद्वेष झाडून द्वेषरहित बुद्धीने ते विरोधी बाजूशी लढले. दक्षिण महाराष्ट्रात समाजवादी विचारसरणीचा प्रचार करणाऱ्यातही बागल पहिले होते. राजकीय चळवळीत पडल्यापासून मरेपर्यंत ते बहुजन समाज कल्याणाच्या उद्दिष्टांना चिकटून राहिले, पक्षनिष्ठेशी नाही. 'संस्था कोणतीही असो तेथे राष्ट्रीय वृत्तीची जोपासना झाली पाहिजे' असे विचार त्यांनी १९६० सालच्या कोल्हापुरात राष्ट्रीय तालीम संघ मेळाव्यात मांडले.

असे हे भाई माधवराव बागल. या थोर समाजसेवक, लेखक व चित्रकाराचे समाज प्रबोधनाचे कार्य या एका लेखात लिहून संपणारे नाही. हा थोर सुपुत्र कोल्हापूरला लाभला हे कोल्हापूर जनतेचे भाग्यच !

या महान व्यक्तिमत्त्वासाठी मला इतकंच म्हणावसं वाटतं, "झाले बहू, होतील बहू परंतु या सम हाच."

◆◆◆



व्यक्तिरेखा

# म्हवन्यादा

**कु. सरस्वती सुभाष शेवाळे**, बी.ए. भाग २

जीवन कशाला म्हणायचे ? आपले जीवन आपल्या दृष्टीतून तयार होत असते. विधात्यानं सर्वच गोष्टी सुंदर बनविल्या आहेत. फक्त आपली बघण्याची दृष्टी, आपले विचार सुंदर असले पाहिजेत.

प्र. के. अत्रे म्हणतात, ''जीवन अमूल्य आहे. म्हणूनच जग सुंदर आहे. जीवनातील क्षण न् क्षण आपण हसत जगलो तरच आपले जीवन सार्थक होईल.'' मानवी जीवन हे असंख्य नागमोडी वळणांनी, प्रश्नांनी भरलेली जणू स्वयंभू वाटच आहे. या वाटेची सुरुवात जन्मापासून ते मृत्यूच्या शेवटच्या थांब्यापर्यंत आहे. या वाटचालीमध्ये अनेक वेगवेगळ्या परिस्थितीत आपल्याला अनेक व्यक्तिमत्त्वांचा सहवास लाभतो. त्यातील काही व्यक्तिरेखा वाऱ्यासारख्या कधी हळूवारपणे कधी जोराची धडक देऊन, तर कधी मनात खोलवर रुजत जातात. या मनात खोलवर रुजणाऱ्या व्यक्तिरेखा त्या वाटसरूला बरंच काही सांगून जातात. त्यांचा ठसा कायमस्वरूपी स्मृतिपटलावर उमटला जातो. अशीच एक मला भेटलेली व्यक्ती म्हणजे आमचा मोहनदादा अर्थात् म्हवन्यादा !

हा म्हवन्यादा म्हणजे, आमच्या गावची शान होता. गावचं काहीही काम असो, म्हवन्यादा सदैव तयार ! अगदी लहान मुलांपासून ते नव्वदीच्या म्हाताऱ्यापर्यंत सर्वांचा उजवा हातच ! माझ्या जन्माआधीपासूनचं हे हसरं, खेळकर, उमदं व्यक्तिमत्त्व आमच्या घरच्यांच्या सान्निध्यात आलं. आमच्या गल्लीत त्यावेळी कोणाचं लहान बाळ नव्हतं आणि म्हणूनच म्हवन्यादाला एक लाडकी बहीण हवी होती म्हणे. तेव्हा त्याला इतका आनंद झाला की त्याने गावभर साखर वाटली. मला आनंदाने तो आपल्या अंगाखांद्यावरून खेळवायचा. माझ्यासाठी तो कुत्रा, मांजर, पोपट, हत्ती, घोडा व्हायचा. असा हा म्हवन्यादा !

वडिलांनी नोकरीसाठी गाव सोडल्यानंतर आमचे गावाकडे येणं-जाणं बंदच झालं. मीही पुढे शहरी वातावरणात रमले. म्हवन्यादा थोडासा स्मृतिपटलावरून बाजूस सरकला. तोही विसरला असेल. 'आपुला गावंच बरा !' म्हणत वडिलांनी शहराकडून गावाकडे आपला मोर्चा वळवला. आम्ही पुनश्च आमच्या जन्मगावी परतलो. गावचे एस्. टी. स्टँड आले, आम्ही खाली उतरतो न उतरतो तोच समोरून एक व्यक्ती धावतच आमच्याकडे आली. जवळ येताच त्यांनी हात जोडून 'राम राम' केला, आणि आमचं सामान उचलून ते आमच्यापुढे चालू लागले. डोक्यावर फाटका टॉवेल मुंडाशाप्रमाणे बांधलेला, अंगात मळकट अशी बंडी, आणि धोतर नेसलेली सडपातळ अशी ही व्यक्ती कोण असावी याचा विचार मी करीत होते. एवढ्यात त्यांची नजर माझ्याकडे गेली.



'अरे राण्याक्का ! कशी हायीस ?'' काहीतरी विचारायचं म्हणून त्यानं आपलेपणानं विचारलं.

''बरी आहे.'' मीही न राहून बोलून गेले.

घरी पोहचल्यावर त्यांनी सामान ठेवले आणि आईबाबांना नमस्कार करून निघून गेले. मला आश्चर्य वाटले, हा एक अनोळखी इसम. मला राण्याक्का काय म्हणतो, आणि मीही अगदी जुनी ओळख असल्याप्रमाणे यांना होकारात्मक उत्तर देते काय - मला काहीच कळेनासे झाले, मी बावरले. माझा गोंधळ बाबांनी ओळखला अन् म्हणाले, 'अगं वेडे, हा तुझा म्हवन्यादा नव्हे का ? भाऊबीजेला ओवाळणी म्हणून तुला पेपरमिंटच्या गोळ्या देणारा, गावभर खांद्यावरून तुझी मिरवणूक काढणारा हाच तो मोहन ! तुझा म्हवन्यादा !' बाबांनी मला भूतकाळातील आठवणी सांगून समजाविले. मी उगाचंच त्यांच्यासमोर आठवल्यासारखे करून हां, हां म्हटले अन् रात्री उशिरापर्यंत म्हवन्यादाला आठवीत राहिले, पण छे ! दुसरे दिवशी आजीने रक्षाबंधनाचा फोटो दाखविला आणि माझी बोबडी वळण्याची वेळ आली. मनात विचार आला, किती मायेनं, आपुलकीनं जोडलेलं आपलं बहीण-भावाचं नातं ! पण शहरी वातावरणात गेल्यावर आपण कसं काय विसरलो, भरकटलो गेलो. माझी मलाच लाज वाटली.

गावात येऊन १५-२० दिवस झाले. आता म्हवन्यादाची, माझी चांगली गट्टी जमली. तो दररोज आपल्या लाडक्या राण्याक्काला गावातल्या गमती-जमती सांगायचा. लोकांच्या नकला करून त्यांना कसे चिडविले, कशा खोड्या काढल्या आणि मागाहून शिव्याही कशा मनसोक्त खाल्ल्या याचं वर्णन अगदी हुबेहूब करायचा. तो सगळ्या गावचा म्हवन्यादा होता. गावकऱ्यांच्या आनंदप्रसंगी तो उत्साहाने, पुढाकाराने कामे करायचा. दुःखप्रसंगी सांत्वन करी, धीर देई. हे सर्व पाहून माझ्या मनात विचार येई, हा सगळ्यांचे सुख-दुःख आपले मानतो याच्या वैयक्तिक जीवनाचा प्लेबॅक काय ? पण त्याच वेळी माझ्या मनात दुसरा विचार आला हा कोण ? तो काय माझा सख्खा भाऊ आहे थोडाच ! शी, किती निष्ठूर आणि स्वार्थी आहे हे मन !! सरड्याच्या रंगाप्रमाणे माझं मन बदलू पहात होतं.

गाव आणि शहर याचं मिश्रण सांगत होतं, २१ व्या शतकाकडे वाटचाल करीत असताना, माणसातील माणुसकी हरवून जगणारी माणसं, स्वार्थी माणसं मी थोडी-बहुत पाहिली आहेत. घड्याळाचे काटे मोजत जगणारी, दुसऱ्याच्या सुख-दुःखाचा अजिबात विचार न करणारी माणसं, आणि याच जगातील म्हवन्यादासारखे घरदार सोडून समाजासाठी, गावासाठी झटणारे, निस्वार्थी, भोळे-भाबडे, निखळ व्यक्तिमत्त्व ! अरेरे, उद्धवा खरंच अजब तुझे सरकार !!

गावातील गौरी-गणपतीच्या वेळी देखाव्याची सजावट करण्यासाठी म्हवन्यादा पुढे पुढे असायचा. आम्ही मुली-स्त्रिया आमच्या सोप्यात झिम्मा- फुगडी खेळायचो. रात्री १२ वाजता कोणाच्या तरी अंगात गंगा-गौरी यायच्या. मग त्या दोघी डुलत-डुलत अंगारा द्यायच्या. दुसरे दिवशी त्या स्त्रिया म्हवन्यादाला दिसल्या की, हुबेहूब तसा अभिनय करून त्यांच्या आवाजात टिंगल करीत म्हणायचा, ''म्हण, ह्यांच्या अंगात देव येतुया. अगं, राण्याक्का देव-बीव कोण बी शिरत न्हाई ह्यांच्या अंगात, उगचंच डुलत्यात आपलं पुंगीम्होरं साप डोलल्यागत, पैकंवाल्या बायांम्होर !'' गणपतीच्या देखाव्यासमोर रात्री उशिरापर्यंत तरुण मुलं सिनेमातील गाणी लावून डान्स करीत. त्यांचा म्हवन्यादाला राग येत असे, तो म्हणायचा, ''अरं, ह्या कसला डान्स करताईसा, लेझीम धरा, आख्ख्या गावातून जंगी मिरवणूक काढूया.'' म्हवन्यादा अडाणी, अशिक्षित पण सुशिक्षितांपेक्षाही सुसंस्कृत आहे, असे मला वाटते. म्हवन्यादा तसा गावठी, अंगूठा छाप ! म्हशींच्या पाठीवर बसून रानोमाळ हुंदडण्यात त्याला मौज वाटे. निसर्गाच्या सान्निध्यात राहून तास न् तास एखाद्या शास्त्रज्ञाप्रमाणे काहीतरी शोधण्याचा तो प्रयत्न करी. त्यामुळे प्रत्येक झाडाशी, फुलाशी, दगड-गोट्याशी याचं एक आगळं-वेगळं नातं जडलं होतं. गावातील अनेक लोकांना शेतीच्या भांगलण-कुळपण, मशागत इत्यादिबाबत ज्ञानी माणसासारखं अगदी फुक्कट सल्ला देत असे. कुणाचं



औषध-पाणी बघणं, शहरातून मशिन्स आणून गवतकापणी करणं अशी एक ना दोन. या कामातच त्याचा दिवस जाई. त्यामुळे त्याच्या उदरनिर्वाहाचा प्रश्नच येत नसे. समाजसेवा अगदी गाडगेबाबांसारखी ! कोणतेही काम म्हवन्यादासाठी तुच्छ नव्हतेच. जणू तो कामाचा पुजारीच आहे. पण म्हवन्यादाला लोक कामापुरता जवळ करीत, इतरवेळी त्याची चेष्टा-मस्करी करीत. मला त्यांचा खूप राग येई. पण मी काय करणार ? मी पडले स्त्रीजातीची ! स्त्रियांसाठी ३५% जागा राखीव ठेवली खरी परंतु स्त्री-पुरुष समानता अजून समाजात न रुजल्यामुळे ही भीती ! असो.

म्हवन्यादा स्वत: अशिक्षित असला तरी, शेजारच्या तात्या-मावशीला म्हणे, ''अगं मावशे-तात्या, देवळात रातचं शाळा भरतीया. तीतं जावा, जरा शिका कायी-बायी, म्या बी शिकावं म्हणतूया राण्याक्काकडं ! पण तुमी समद्या गावाला घिवून जावा बरं बिगी-बिगी.'' त्यावेळेपासून म्हवन्यादा माझ्याकडे शिकायला येऊ लागला. पण... मी शिकविलेलं समजून उमजून जी काही अक्षरं तो पाटीवर काढी, ती अक्षरं त्याच्याच डोळ्यातून येणाऱ्या अश्रूंच्या पुरात पुसून जात, आणि दु:ख अनावर होऊन तो पळून जायचा. हा त्याचा नित्यक्रम झाला. बऱ्याच वेळा मी त्यामागचं कारण जाणून घेण्याचा प्रयत्न केला. पण त्या भल्या माणसाने स्वत:चं काळीज जळतं असताना तोंडातून ब्र काढला नाही. मी माझ्या आजीजवळ खुलासा केला आणि माझ्याही डोळ्यात अश्रू आले. रांगडं, खेडूत व्यक्तिमत्त्व किती हळवं, माणुसकी जपणारं असतं हे मला उमगलं. म्हवन्यादा अ, आ, ई शिकताना 'आई' हा शब्द मी उच्चारला की त्याची करुण-कहाणी त्याला रडवत असे. साऱ्या गावाला हसवणारा, त्यांच्या सुख-दु:खात सामील होणारा म्हवन्यादा मनातून किती दु:खी, कष्टी होता हे मला आता समजले होते.

म्हवन्यादा लहान असतानाच त्याचे वडील वारले. एक भाऊ, एक बहीण आणि स्वत: म्हवन्यादा आईसोबत ५ एकर बागायत शेती असलेल्या आमच्या गावात रहायला आला होता. पण स्वातंत्र्याची ५० वर्षे उलटली तरी दीन-दलितांची, स्वातंत्र्याची पहाट न उगवणाऱ्या या देशात सावकारीने घात केला. अन् ५ एकर बागायत शेती कसला तरी कायदा लावून सावकाराने तिच्यावर कब्जा केला. त्याचवेळेस शाळेतल्या खाऊमधील भेसळीने म्हवन्यादाची भाऊ-बहीण मृत्यू पावली. दु:खाचा डोंगर म्हवन्यादाच्या कुटुंबावर कोसळला. उराशी म्हवन्यादाला घेऊन त्याची आई रोज एकाच्या शेतात काम करून उदरनिर्वाह करू लागली. तिच्या मनमिळावू स्वभावाने व मोठ्या लोकांच्या मदतीने तिने आपली जमीन परत मिळविली. म्हवन्यादाला मोठा माणूस बनविण्यासाठी त्याच्या आईने मोठ्या जिद्दीने शाळेत घातले. पण निष्ठूर नियतीच्या मनात काय वेगळेच होते. म्हवन्यादाची आई तापाच्या साथीत म्हवन्यादाला गावाच्या स्वाधीन करून निघून गेली. म्हवन्यादा एकाकी पडला. वेडापिसा झाला. त्याने आईच्या शब्दाखातर शाळेत जाण्याचा प्रयत्न केला. पण आईची आठवण त्याला सहन होईना म्हणून शाळा सोडून दिली. पण शिक्षणाविषयीची ओढ आपल्या नि:स्सीम त्यागातून सार्थ केली. आपली शेती, माझ्या आजोबांच्या सहाय्याने गावच्या सावकाराला विकली कारण, गावातील शाळेची इमारत पैशाअभावी बांधावयाची राहून गेली होती. त्यासाठी गावकरी पै-पै जमवीत होते. अशावेळेस म्हवन्यादाची मदत मोलाची ठरली. त्यावेळेस माझ्या आजोबांना त्याने सांगितले, ''रावूआबा, म्या काय करू ही श्याती-भाती बघून. माझी आय न्हाय तर काय बी न्हाय. म्या एकला जीव पर ही जिमीन ऱ्हावू दे माझ्यासाठी !'' केवढं हे औदार्य !! 'सारे विश्वचि माझे घर' म्हणायचा म्हवन्यादा ! ही म्हवन्यादाची कहाणी ऐकल्यापासून माझा तो अधिकच प्रिय दादा झाला होता.

दिवसामागून दिवस निघून जात होते. माझे लग्न होऊन मी सासरी आले. आयुष्याच्या नव्या दालनामध्ये माझा प्रवेश झाला. माहेरच्या जगतातून सासरी-घरी आले. पण म्हवन्यादा माझ्या मनात खोलवर रुजून राहिला होता. लग्नावेळेस माझ्यापेक्षा कितीतरी मोठा



असणारा म्हवन्यादा लहान मुलासारखा ढसाढसा रडला. त्याची लाडकी राण्याक्का त्याला सोडून दूर चालली होती, त्याचे सुख-दु:ख पहाणारी ! मी पण कित्येक दिवस त्या दु:खावेगामध्ये होते. माझ्या लाडक्या म्हवन्यादाबद्दल किती लिहू ?

कधी सानेगुरुजींप्रमाणे आईच्या दु:खावेगाने हळवा झालेला, तर कधी गाडगेबाबांसारखा समाजसेवा करणारा, कधी एखाद्या निष्णात तत्त्ववेत्त्यासारखा बोलणारा, उमदा, हसरा, खेळकर वृत्तीचा म्हवन्यादा, स्वत: दु:खी असूनही दुसऱ्याला सुखी करण्याचा, पाहण्याचा, विशाल हृदय लाभलेला, अशा या म्हवन्यादाला कोण विसरू शकेल ? काय तुम्ही विसरू शकाल ?

◆◆◆

## कविता साने गुरुजींची

### संदेश

येथून तेथून सारा पेटूं दे देश पेटूं दे देश ॥ धृ. ॥
कोटी कोटी आता उठूं दे किसान
निर्भयपणे अपुली उंच करा मान
मुक्तकंठे गावो स्वातंत्र्याचे गान
नष्ट करूं आतां आपुले सारे क्लेश ॥ धृ. ॥
कमवतां तुम्ही, गमवतां कसे
सिंह असून तुम्ही बनलात रे ससे
तेजें उठा आता, पडा ना असें
माणसें बना आतां, बनुं नका मेष ॥ धृ. ॥
रात्रंदिवस तुम्ही करितसां काम
जीवनात तुमच्या उरला नाहीं राम
घाम गळे तुमचा हरामाला दाम
येवो आतां तुम्हां थोडा तरी त्वेष ॥ धृ. ॥
मोर्चे काढा आता निघूं दे फौजा
लुटारूंच्या आता थांबवू या मौजा
चालूं देणार नाहीं कोणाच्या गमजा
कोटि किसानांचा फणा करी शेष ॥ धृ. ॥

*हार्दिक शुभेच्छा !*

# व्हरायटी फूड शॉप

'येवलेज'ची उत्पादने

सामोसा, कचोरी,
सर्व प्रकारची नमकीन दुधाची मिठाई
व बंगाली मिठाई

# 'येवले'ज दुग्ध पदार्थ

चक्का, श्रीखंड, बासुंदी,
पनीर इत्यादी

*'येवले'ज म्हणजे १०० % क्वॉलिटी*



(विज्ञानविषयक लेख)

# प्लॅस्टिकच्या हद्दपारीला सज्ज व्हा !

**कु. अनुराधा रामचंद्र संभापूर**, बी.ए. भाग ३

सर्व समाजामध्ये, सर्व देशभर आणि सर्व जगभर पसरलेला कॅन्सरसारखा पदार्थ, की जो सर्वव्यापी झालेला दिसतो तो घातक पदार्थ म्हणजेच प्लॅस्टिक होय. सकाळी उठल्याबरोबर प्लॅस्टिक कव्हरमध्ये झाकलेल्या ट्युबमधील पेस्ट व सोबत टुथब्रश हे सर्वांच्या हातवळणी पडत आहे. घरोघरी, खेडोपाडी, शहरात, शेतात, कारखान्यात, दुकानात, भाजीमंडईत, भांडीदुकानात, बेकरीत इ. सर्व व्यवहारात प्लॅस्टिकचा वापर अतिवेगाने होत आहे. प्लॅस्टिकच्या दोऱ्या, बादल्या, चपला, लॅम्प, कॅसेट, कव्हर, ध्वनिफिती, कळशा, मग, टब, पाण्याच्या टाक्या, कुंड्या इ. सर्व असंख्य वस्तू ह्या प्लॅस्टिकपासून बनवल्या जात आहेत. पूर्वी मातीची, कागदाची, झाडांची पाने - साली, दोर इत्यादीचा वापर होत होता. आज प्लॅस्टिक पिशव्या, प्लॅस्टिक पेले, चहासाठी कप प्लॅस्टिकचे, प्लॅस्टिक ताटल्या, प्लॅस्टिक डिश, यांच्या वापरास सीमाच राहिली नाही. गेल्या २५ ते ४० वर्षात सर्व जग हे प्लॅस्टिकमय होऊन गेले आहे. पाईप, यंत्रे, पत्रे, गाड्यांचे काही भाग, यामध्येही वापर झाल्यास नवल असे काही नाही.

तागाचे पोते, काचेच्या बाटल्या, खोके, डबे याऐवजी प्लॅस्टिकच्या वेष्टनात बांधून म्हणजेच पॅकिंग करून वाहतूक व विक्री होत आहे. एका अंदाजानुसार आज जे प्लॅस्टिक कप व पेले एका दिवसात वापरले जातात त्याची लाईन लावली तर सबंध पृथ्वीला एक वेढा घालू शकतात इतकी त्याची संख्या व लांबी होईल. विविध प्रकारच्या प्लॅस्टिकची निर्मिती व वेष्टन व बांधणी साहित्य म्हणून वापरले जाते याला आपण प्रगतीचे लक्षण मानतो. पण आज जगभर अंदाजे १ ते १॥ कोटी लोक रेल्वेने प्रवास करतात. त्यांचे त्याच प्रमाणात पडणारे एका वेळेचे चहाचे कप यामुळे ती एक महाभयंकर समस्या बनली आहे. वास्तविक पहाता असंख्य लोकांना काम देऊन मातीच्या शिकोऱ्यातून चहा दिल्यास आरोग्यदायी ठरेल व बेरोजगारांनाही कामही मिळते.

प्लॅस्टिक हे कित्येक वर्षे तसेच रहाते. ते कुजतही नाही. सर्व वस्तूंचे विघटन होते पण त्याचे होत नाही. म्हणजेच दीर्घकाळ वातावरणात टिकून राहिल्याने पर्यावरणास त्याचा फार मोठा धोका आहे. म्हणून प्लॅस्टिक कचऱ्याची विल्हेवाट लावणे हे जगापुढे मोठे आव्हान आहे. त्यामुळे कचरा व्यवस्थापनापुढे मोठा प्रश्न पडला आहे. अगोदरच वाढते औद्योगिकरण, अनियोजित शहरीकरण यामुळे गलिच्छ वस्त्या, झोपडपट्टीसारख्या समस्यांबरोबर कचरा व घाण, टाकाऊ पदार्थांची कायमस्वरूपी व्यवस्था ही एक समस्या बनली आहे. त्यात प्लॅस्टिक या महाभयानक पदार्थाची भर पडून गंभीर प्रश्न तयार झाला आहे.

स्टायरोफोम कधीही कुजत नाही. प्लॅस्टिक जग, डायफर पाचशे ते सहाशे वर्षे, ॲल्युमिनियम कॅन, डबा कुजण्यासाठी दोनशे ते पाचशे वर्षे लागतात असे अनुमान



आहे. कापूस पाच महिन्यात, कागद एका महिन्यात कुजतो. यावरून प्लॅस्टिकची महाभयानकता लक्षात येईल. नैसर्गिक साधनसामग्रीचा पॅकिंगसाठी तुटवडा दिवसेंदिवस भासत आहे. त्यामुळे गेल्या ३५ ते ४० वर्षात या प्लॅस्टिकचा वापर अधिक होत आहे. धातू व काचेच्या आकारमानाने व वजनाने अत्यंत कमी व हलके, वापरावयास सोपे व पुनर्वापर होऊ शकणारा हा पदार्थ आहे. 'वापरा आणि फेका' या प्रवृत्तींना मानव प्रतिष्ठा देत आहे त्यामुळे पर्यावरणीय दुष्परिणामाकडे आपण दुर्लक्ष करीत आहोत हे त्याच्या लक्षातच येत नाही. अमेरिकेत दरडोई दरवर्षी वापर ६२ किलो, तर भारतात हे प्रमाण केवळ दीड किलो असा युक्तिवाद उत्पादन करणारे व्यवस्थापक करतात. पण याचा वापर अनाठायी व घातक आहे हे आपल्या लक्षात येत नाही. मुंबईत दर दिवशी २० ते २५ लाख पिशव्या वापल्या जातात. जगात दरवर्षी दहा ते बारा कोटी टन प्लॅस्टिक वापरले जाते. अमेरिकेत प्लॅस्टिक कचरा फेकण्यास पर्यावरणीय संघटनांनी विरोध केल्यामुळे १९९३ मध्ये ते साडेचार ते पाच कोटी टन भारतात आयात केले. याच्या पुनर्वापरासाठी तामीळनाडूत पेप्सी कंपनीने कारखाना काढला. यावरून असे लक्षात येईल की पाश्चात्य राष्ट्रे प्रदूषणाची कशी शिताफीने तिसऱ्या जगात निर्यात करून आपला बचाव करण्याचा प्रयत्न करीत आहेत. ही प्रदूषणकारी उत्पादन करण्याची खेदजनक बाब आहे. जमीन, पाणी व वातावरणात कित्येक वर्षे प्लॅस्टिक रहात असल्यामुळे भयानक दुष्परिणाम मानवास सोसावे लागणार आहेत आणि आपले आरोग्य व पर्यावरणास तो गंभीर धोका आहे.

या धोकादायक समस्येबाबत काही राष्ट्रे प्लॅस्टिकविरोधी चळवळी संघटित करून आवाज उठवीत आहेत. आपल्या देशात हिमाचल सरकारने यासाठी प्लॅस्टिक वापरास कायद्याने बंदी घातली आहे. पाणी, दूध, तेल, खाद्य पदार्थ - जे प्लॅस्टिकच्या पिशव्यातून डब्यातून पुरविले जातात ते आरोग्यास किती घातक आहे. हे आपण रोज वर्तमानपत्रात, बातम्यातून समजत आहे पण लक्षात कोण घेतो ?

रंगीत प्लॅस्टिकचा अन्नपदार्थांवर परिणाम होऊन अन्न विषारी, प्रदूषित होते आणि शरीरावर त्याचा फार घातक परिणाम होऊन आरोग्य धोक्यात येते असे अनुमान म्हैसूरच्या अन्नसंशोधन केंद्राने काढले आहे. अमेरिकेतील पर्यावरण संरक्षण यंत्रणेचे संशोधन असे, की प्लॅस्टिक हे शिसे (लीड) आणि कॅडमियमच्या धोकाग्रस्त असलेला पदार्थ आहे. कॅडमियममुळे कर्करोग होतो. मूत्राशयाचे आजार वाढतात. तर शिस्यामुळे मुलांच्या मज्जाव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होतो. प्लॅस्टिकच्या टाकीतील पाणी विशिष्ट दिवसानंतर प्रदूषित होते. फेरवापर करून तयार केलेल्या वस्तू सुद्धा धोकादायक आहेत. प्लॅस्टिक निर्मितीसाठी वापरली जाणारी बहुसंख्य रसायने ही फार विषारी असतात. अमेरिकेत झालेल्या संशोधनानुसार जीवास अत्यंत बाधक व घातक रसायने आहेत. त्यातली पाच ते सहा प्लॅस्टिकच्या उत्पादनात वापरली जातात. यावरून त्याचे धोके व परिणाम किती घातक असतील याची कल्पना येईल.

आपण जे प्लॅस्टिक पिशवीतून कचरा, अन्नपदार्थ फेकून देतो ते जनावरांच्या पोटात गेल्याने दरदिवशी ३०० जनावरे राजस्थानात मृत्यू पडतात, असे अभ्यासात आढळून आले आहे. तसेच नदी, नाले, समुद्र यातून प्लॅस्टिक विखुरल्याने रोज हजारो मासे, समुद्रप्राणी मरून पडतात याचाही आपण विचार केला पाहिजे. प्लॅस्टिकमुळे जमिनीच्या मृदसंपदेवर प्रतिकूल परिणाम होतो. एक इंच मातीचा थर तयार होण्यासाठी हजारो वर्षे लागतात. पण या जमिनीत प्लॅस्टिक पडल्यामुळे हवेचे तापमान वाढते. हवा व पाणी निचरा होण्यास बाधा येते. डेनमार्क, इटलीतील काही शहरे व समूहाने प्लॅस्टिक वापरास बंदी घातली आहे.

भारतीय संस्कृती ही संवर्धन व संरक्षण करणारी आहे. नैसर्गिक साधनसामग्रीचा योग्य वापर करून परत त्याचे जतन व संवर्धन केले पाहिजे. प्रदूषण व हानी टाळण्याचे महत्त्व आपल्याला ऋषीमुनींनी सतत प्रतिपादन केले



आहे. वस्तू आणि सेवा याचा जास्तीत जास्त सामूहिक पद्धतीने वापर व विनियोग करण्याची आपली जीवनपद्धती आहे. हे लक्षात घेऊनच प्लॅस्टिकसारख्या घातक पदार्थांचा वापर कटाक्षाने टाळलाच पाहिजे, आणि म्हणूनच कोणत्याही समस्यांवर मात करण्यासाठी त्याची सुरुवात आपण स्वत:पासूनच केली पाहिजे. बाजारात जाताना बरोबर कापडी पिशवी घेऊन जायची सवय ठेवली पाहिजे. प्लॅस्टिक वेष्टनातील कोणताही पदार्थ वापरण्यास किंवा खाण्यास आपण स्वत: विरोध केला पाहिजे. प्लॅस्टिकच्या वस्तू व त्यांचा वापर घरा-घरातून टाळून प्लॅस्टिक उच्चाटन व निर्मूलनाची मोहीम हाती घेऊन मानव समाजावर या महाघातक पदार्थाचे होणारे दुष्परिणाम थांबविण्याची प्रतिज्ञा आपण आजच केली पाहिजे. "वापरा व फेका" ही बाजारू मनोवृत्ती आपण गाडली पाहिजे. शाळा-महाविद्यालये, दवाखाने, अन्य संस्था, मंदिर, मशीद, गुरुद्वार, तसेच लग्नकार्य व समारंभात, विमान, बस, रेल्वे, कार्यालये इत्यादि ठिकाणी प्लॅस्टिक न वापरण्याचा निर्धार आपण केला तरच हा धोका थांबविता येईल. आजच जाणीव जागृती आणि कृती केली नाही तर फार मोठे संकट ओढवेल. हिमाचल प्रदेश, हरियाणा, केरळ सारख्या राज्याबरोबर इतर सर्व राज्यांनी प्लॅस्टिक वापरास कायदेशीर बंदी घातली पाहिजे. म्हणजे केंद्रसरकारने तशी ठोस पावले उचलली पाहिजेत.

सबब आपल्या घरातून, वस्तीतून, शहरातून प्लॅस्टिकच्या हद्दपारीसाठी आपण सज्ज झाले पाहिजे. प्लॅस्टिक असो की अन्य रसायने, पेट्रोलियम पदार्थ, मोटारगाड्या, वातानुकूलित यंत्रे आणि एकंदरित यांत्रिकीकरण हे सर्व प्रश्न जीवनशैलीशी निगडित आहेत. ज्या पाश्चात्य औद्योगिक व आर्थिक उत्पादन उपभोग व्यवस्थेचे आपण अट्टाहासाने अंधानुकरण करीत आहोत ती व्यवस्था मौलिक साधनसंपदेचा विनाश करणारी, प्रदूषणकारी व अमानवी आहे. याविषयी गंभीर इशारा देशोदेशीचे सूज्ञ लोक मानवसमाजाला देत आहेत.

थोडक्यात हा सर्व प्रश्न आपली जीवनदृष्टी काय आहे यावर अवलंबून आहे. विकास, विज्ञान प्रगतीच्या प्रचलित संकल्पना व समीकरणे आमूलाग्रपणे बदलणे हे २१व्या शतकाच्या उंबरठ्यावर आपल्या समोरीला मुख्य आव्हान आहे.

तात्पर्य - प्लॅस्टिक हे बकासुरी उपभोगवादी आर्थिक संरचनेचे प्रतीक असून, त्याचे धोके लक्षात घेऊन उच्चाटन करणे गरजेचे आहे.

◆◆◆

*With Best Compliments from*

**Impression**

**EXCLUSIVE LADIES WEAR**

**EXCLUSIVE IN CHUDIDAR, SHARARA, CHOLI, SKIRTS, TOPS, LADIES JEANS & IMETATION JEWELLERY**

**AFRIN MANZIL, SHOP NO. 3 & 4, RAJARAMPURI, 9TH LANE, KOLHAPUR. PHONE : 528521**

टीप : ही जाहिरात सोबत घेऊन येणाऱ्या व्यक्तीस १५ % टक्के सूट देण्यात येईल.



रामदास फुटाणे - पुस्तक परीक्षण



# भारत कधी कधी माझा देश आहे

**कु. पुष्पा लक्ष्मण लटके**, बी.ए. भाग २

रामदास फुटाणे हे महाराष्ट्रातील एक विडंबनकार कवी या नात्याने रसिक वाचकांना परिचित आहेत. मराठी साहित्याच्या इतिहासात आचार्य प्र. के. अत्रे यांच्या 'झेंडूची फुले' ह्या विडंबनपर कविता संग्रहानंतर रामदास फुटाणे यांच्या विडंबनपर कवितांची निर्मिती होईपर्यंतचा कालावधी निर्मितीहीन अवस्थेतच राहिला. वास्तविक ही गोष्ट काही शोभादायक खासच नव्हती. मराठीतील प्रसिद्ध समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांनी आचार्य अत्र्यांच्या काव्यसंग्रहाचे वर्णन करताना 'झेंडूची फुले' हा मराठी साहित्यातील एक चमत्कार होता असे म्हटले आहे.

रामदास फुटाणे यांची ही कविता विडंबनपर आहे. मात्र ती आचार्य अत्रे यांच्या कवितेच्या दोन पावले पुढे गेलेली दिसते. कारण आचार्य अत्रे यांनी ज्या विषयाला लक्ष्य बनविले त्या विषयाहून फुटाणे यांनी लक्ष्य बनविलेले विषय अधिक महत्त्वाचे, जनसामान्यांच्या जीवनाशी प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्षपणे जोडलेले म्हणूनच सनातन आणि राजकारण, देशाचा भविष्यकाळ अशा जिव्हाळ्याच्या विषयाशी संबंधित असल्याचे दिसून येते.

अशाप्रकारे मराठी साहित्याच्या एका विशिष्ट साहित्यप्रकारात आपले नाव न पुसता येईल इतक्या ठसठशीतपणे नमूद करणारे कवी म्हणून रामदास फुटाणे यांचे नाव घ्यावे लागेल. अशा ह्या कवीचा 'भारत कधी कधी माझा देश आहे' हा काव्यसंग्रह एका विनोदाच्या वळणाने पुढे जात जात प्रबोधनाच्या दिशेकडे वळताना दिसून येतो.

कवी रामदास फुटाणे यांना जे दोष दिसतात ते त्यांना दुखवतात, खुपतात त्यामुळे त्यांचे कवीमन अस्वस्थ होते आणि ह्या दुःखाला वाचा फोडावी म्हणून ते लिहितात, हे लिहिणे परिणामकारक होते ते त्यातील व्यंग, उपहास आणि विनोदामुळे. पण कवीला लोकरंजन करण्याची हौस नसून, लोकांचे प्रबोधन व्हावे, आहे त्या स्थितीगतीमध्ये बदल - योग्य अशा प्रकारचा घडावा असा वाटते. म्हणून तो सातत्याने कविता सृजनरूपी कार्य करण्यास उद्युक्त होतो.

कवी फुटाणे हे सामाजिक वातावरण राजकीय घडामोडींनी दूषित होताना पाहतात म्हणूनच देशाच्या भावी भीषण चित्राने ते घाबरून जाऊन लोकशक्तीला जागे करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्यांच्या कवितेला घरगुती विषय, अत्यंत खासगी स्वरूपाचे विचार जवळजवळ वर्ज्यच आहेत. त्यांना कुणी कवी म्हणोत अगर न म्हणोत पण देश, समाज आणि सामाजिक संस्थांमधील दोष यांचा, त्यांच्याइतका गंभीरपणे विचार केलेला विद्यमान तथाकथित मराठी कवींमध्ये अन्य कुणी दिसत नाही. वास्तविक हे दुर्दैवाचे आहे. मात्र रामदास फुटाणे यांनी आपली प्रतिभा फक्त



देश-कल्याणासाठीच राबविली आहे असे त्यांच्या चिंतनशील कवितांवरून दिसते. त्यांनी आपल्या 'चांगभलं' ह्या कवितासंग्रहाच्या 'प्याला उचलताना' मध्ये जे शब्द उच्चारले आहेत ते त्यांच्या अंत:करणाच्या कळवळण्याची जात स्पष्ट करणारे आहेत. ते म्हणतात,

**'अंत:करण व्याकुळ होतं, उपाय अपुरे आहेत**
**प्रश्न अथांग सागरासारखे, कुठं कुठं शिवायचं ?**
**सारं आभाळच फाटलं आहे.**
**जोपर्यंत धर्मापेक्षा देश मोठा असं सर्वांना वाटत नाही**
**हिंदूंना आणि मुसलमानांना सुद्धा**
**तोपर्यंत आपण फक्त एवढंच म्हणायचं,**
**चांऽगभलं ऽऽ !'**

तुकारामांच्या वृत्तीशी कविवर्य फुटाणे यांचे सख्य जुळावे, तुकोबा म्हणतात,

**बुडती हे जन न देखवे डोळा**
**म्हणूनी कळवळा येत असे**

आज राजकारणात जे चालले आहे त्यामुळे आपण स्वातंत्र्य गमावून पुन्हा गुलाम होऊ अशी भीती कविवर्यांनी भारत कधी कधी माझा देश आहे ह्या कवितेत व्यक्त केली आहे.

**भारत कधी कधी माझा देश आहे**
**आम्ही सारे भारतीय**
**अलग अलग आहोत**
**माझा देश माझा खाऊ आहे**
**खाऊन खाऊन तो संपणार आहे**
**प्रांताप्रांताची जुंपणार आहे**
**जुंपल्यानंतर फाटतील**
**एकमेकांना लुटतील**
**पुन्हा नवे परकीय**
**साम्राज्यवादी येतील**

फुटाणे यांचे हे भाकीत हा आजच्या जनमानसाचा उत्स्फूर्त उद्‌गार आहे हे आपणास नवे नाही आणि ते खोटे तर मुळीच नाही. देशाला राजकीय शिस्त नसल्यामुळे आज बहुद्देशीय कंपन्यांनी भारताची बाजारपेठ काबीज करण्याचा सपाटा चालू केला असून, आपल्याला आर्थिक गुलामगिरी लौकरच भोगावी लागणार आहे अशी दुश्चिन्हे दिसत आहेत. मग फुटाणे हे द्रष्टे कवी नाहीत काय ?

प्रत्येक भारतीय हा भारतीय राजकारणाचा आत्मा आहे पण हा स्वार्थाने बरबटलेला व आत्मतेज लुप्त झालेला स्वकेंद्री बनत चालला आहे. फुटाणे म्हणतात,

**तोपर्यंत मित्रांनो,**
**मला माझ्याच स्वप्नांची तहान आहे**
**या देशापेक्षा मीच महान आहे**
**मी माझ्यासाठी जगतो**
**मी माझ्याचसाठी मरतो**

आणि जर आत्मा हरवलेली माणसे राजकारणाला, राजकारण्यांना जन्म देत असतील तर त्यांच्याकडून भविष्यकाळच्या सुखाची अपेक्षा कशी करता येईल ? कवी फुटाणे आपली चिंता वारंवार वेगवेगळ्या शब्दात व्यक्त करतात,

**आज ना उद्या, कधी तरी**
**पंजाब, काश्मीर, आसाम जाईल**
**भारतीय परकीय होऊन**
**गुलामीची रोटी खाईल !**
**उद्या या देशाचे नाव**
**भारत नसेल**

या उद्‌गारांवरून फुटाणे यांच्या अंत:करणात जी खळबळ माजली असेल तिची कल्पना करणे अवघड नाही.

'जयजयकार' ही कविता ही आत्मग्लानी प्रकट करणारी एक कविता आमच्या देशाच्या राजकारणाचे भयानक वास्तव प्रकट करते. कवीने जयजयकार का केला ते वाचा म्हणजे आपल्याला भयंकर वास्तवाचे स्वरूप कळेल.

**डोकं जेव्हा गरगरतं**
**'स्वीच ऑफ' करावा**
**जयजयकार करण्याचा**
**मार्ग फक्त पत्करावा.**



ह्या कवितेने एकूण पक्षीय व वर्गीय राजकारणाचा पंचनामा करून आमच्या देशाचे खरे राज्यकर्ते म्हणजे आम्ही नागरिक किती लाचार, अज्ञानी, गचाळ व मूर्ख आहो ते व्यक्त करून नेमके दुखण्यावर बोट ठेवले आहे. ते म्हणतात,

**निवडणूक लढविणाऱ्या**
**उमेदवारांचा जयजयकार**
**पैसे घेऊन मत देणाऱ्या**
**मतदारांचाही जयजयकार**

वास्तविक हा जयजयकार धिक्कारापेक्षाही अतिशय उपहासपूर्ण आहे. हे सांगण्याची गरज नाही. आमच्या देशाचा मतदार हा अडाणी आहे. त्याला कसलाही विवेक नाही आणि हे सर्व अत्यंत भयानक आहे.

एका कवितेत कवीने विचारलेला प्रश्न राजकीय वास्तवाची भयानकता व्यक्त करतो.

**नाही जगण्यात मोद**
**नाही मरणाची खंत**
**देश यमाचेच घर**
**तरी कशी मी जिवंत**

राजकारण्यांची सापाशी (मग तो नागपंचमीचा पूजेचा का असेना) तुलना करून आपले राजकीय विद्रुप चित्र दाखविले आहे.

**पुढारी आणि सरकारी नोकर**
**मतदारांना ताप असतात**
**निवडणूक जवळ आली की**
**नागपंचमीचे साप असतात**

आमचे लोकप्रतिनिधी हे नागसापापेक्षाही अधिक विषारी आहेत हे सत्य अगदी मोजक्या शब्दात कवीने कसे व्यक्त केले आहे ते पाहण्यासारखे आहे.

**महाराष्ट्रात सर्वत्र, पाऊस पडला**
**तेव्हा एक पुढारी, सरकारी नोकराजवळ रडला**
**''दुष्काळाचा त्रास गेला पण,**
**आपल्या तोंडचा घास गेला.''**

भारताची राजकीय स्थिती निश्चितपणे चिंताजनक आहेच, पण त्यात अनपेक्षित असे काही नाही. वास्तविक लोकशाही पद्धतीची राज्यरचना स्वीकारताना आपणास असे भान असणे आवश्यक होते की, ५० ते ५५ % निरक्षर, ३५ ते ४०% अर्धशिक्षित, आणि १० ते १५% लबाड शिक्षित अशी एकूण समाजाची स्थिती असेल तर लोकशाही नावाचा केवळ लोकविचाराधिष्ठित राज्यप्रकार आपणास मानवणार नाही. पण हे भान सुटले आणि आपले दुर्दैव ओढवले. कवी फुटाणे यांनी ह्या भयंकर सामाजिक स्थितीची गंभीरपणे चिकित्सा करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुले त्यांची कविता हे समाजसुधारकांचे बायबल ठरणारी आहे.

**भारत कधी कधी माझा देश आहे**
**आम्ही सारे भारतीय**
**अलग अलग आहोत**
**माझ्या जातीचा माणूस**
**हाच माझा भाऊ आहे**

ह्या ओळी वाचताना भारतीय समाजाचे वास्तव रूप आपल्या समोर येते. जात, पात, धर्म, संस्कृती, भिन्न विचारधारा यांचा गलबला ह्या देशात इतका आहे आणि ह्या सर्वांना एकत्र बांधणाऱ्या तत्त्वाचा अभाव असल्यामुळे येथे स्वार्थ बोकाळणे अत्यंत स्वाभाविक आहे. येथील भारतीय म्हणतो,

**माझा देश माझा खाऊ आहे**
**खाऊन खाऊन तो संपणार आहे**

ही भारतमातेची लेकरेच तिचा घात करण्यास टपली आहेत. हे आज घडणाऱ्या अनेक घटना आणि प्रसंगातून स्पष्ट होत चालले आहेच.

संप्रदायनिष्ठा आणि राष्ट्रभक्ती ह्या दोन तलवारी एका म्यानात राहू शकत नाहीत. 'पुणे' कवितेमध्ये फुटाणे यांनी आपल्या संप्रदायनिष्ठेवर प्रकाश टाकला आहे. ते लिहितात,

**ज्ञानी सत्तेचे भाट झाले,**
**लक्ष्मीच्या आक्रमणापुढे**
**सरस्वतीचे दास हरले**



**उत्सव किंवा दंगलीसाठी**
**गणपतीपुरतेच पुणे राहिले**

कवीच्या मनातील नेमका विचार ह्या कवितेतून व्यक्त झाला आहे. वास्तविक समाजाची धुरा शिक्षितांच्या खांद्यावर असते पण हे शिक्षितच जेव्हा सत्ता आणि मत्ता यांचे गुलाम होतात तेव्हा फक्त उरतात उत्सव, जत्रा, उरुस आणि गोंधळ किंवा दंगली. भारतीय समाज ह्याच घातक वळणाने वाटचाल करीत आहे. तो कोणत्या मुक्कामावर पोहोचणार आहे ते सांगण्याची गरज नाही.

'व्यथा' ह्या कवितेत पैशामुळे मस्तवाल झालेली माणसे सगळ्या देशाची व्यवस्था कशी बिघडवत आहेत ते सांगून कवीने भारतीय समाजाची दुरावस्था स्पष्ट केली आहे. ते लिहितात,

**नंबर दोनची घरे आज**
**सर्वच लखलखीत आहेत**
**प्रत्येक पक्षाचे नेते**
**व्यापाऱ्यांच्या पालखीत आहेत !**

समाजव्यवस्था एवढी बिघडलेली आहे की, आज फक्त पैसा हेच एकमेव जीवनमूल्य होऊन राहिले आहे. शिवाय तो गैरमार्गाने (नंबर दोन) मिळवायचा आणि राज्यकर्त्यांना विकत घ्यायचे असे आता नियम होत आहेत. त्यामुळे भारतीय प्रशासन हे लक्ष्मीच्या तंत्राने, व्यापाऱ्यांच्या, उद्योगपतींच्या तंत्राने चालत आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही. खासदार, आमदार हे श्रीमंतांच्या रखेलीसारखे आहेत असे फुटाणे उगीच म्हणत नाहीत.

'जयजयकार' कवितेत 'आम्ही आता आरशात पाहून आमच्याच श्रीमुखात मारावी' अशी भाषा उद्विग्नतेपोटी कवी करतो. 'फिनिक्स' कवितेत देशाचे वर्णन करताना,

**नाही जगण्यात मोद**
**नाही मरणाची खंत**
**देश यमाचेच घर**
**तरी कशी मी जिवंत ?**

आश्चर्य वाटते ते आपल्या जगण्याचे. देशभर मृत्यूचे थैमान विविध प्रकारे चालू आहे. कुणाचेही जीवन सुरक्षित नाही हे आजचे भयाण वास्तव आहे.

नंबर दोनच्या पैशाचे आकर्षण शिक्षणखात्यापर्यंत पोचले आहे. 'गरज' ह्या कवितेत कवी म्हणतात,

**पैशाची शाळेला गरज आहे**
**शाळेची पोराला गरज आहे**
**पोराची बापाला गरज आहे**
**गरजेला पैशाची तहान आहे**
**आपला देश महान आहे**

समाज असा बिघडत कोठपर्यंत जाणार आहे ? खरे तर रसातळाला हेच उत्तर येथे बरोबर आहे.

'प्राध्यापकांनी पेपर फाडले, मंत्र्यांनी मार्क्स खोडले, जेलरने कैदी सोडले' हे सर्व आता क्षम्य मानले जाते. विद्यापीठे व साहित्यसंमेलने ह्यांच्याकडून समाजाला खूपच अपेक्षा असतात पण दुर्दैवाने तेथे भ्रष्टाचार आणि आनागोंदीपणा माजलेला दिसतो आहे. कवी म्हणतात,

**संमेलनाच्या रणांगणावर**
**बुद्धिवंतांचे युद्ध आहे**
**विद्यापीठातील भ्रष्टाचार पाहून**
**कुलगुरुसुद्धा लाजले आहेत**

कवी ह्या वातावरणाला जबाबदार असणाऱ्यांना नवे अतिरेकी मानतात.

अशाप्रकारे रामदास फुटाणे यांनी कवितेचे समर्थ माध्यम वापरून देशाची एकूण स्थिती आपणापुढे प्रामाणिकपणे, कोणताही पूर्वग्रह मनी न बाळगता ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. ते व्यंजनाशक्तीचे कवी म्हणून ओळखायला हरकत नाही. यांच्या काव्यात सूक्ष्म निरीक्षण आहे आणि त्यांच्या मनात समाजप्रबोधनाची ओढ आहे असे कवीच आता देशाला, समाजाला तारू शकतील असा विश्वास येथे प्रकट करावा वाटतो.

◆◆◆

# 'अटकेपार झेंडा'

## वर्गात सर्वप्रथम



**कु. क्षमा कुलकर्णी**
तृतीय वर्ष वाणिज्य



**कु. रीना कांबळे**
विद्यापीठात सर्वप्रथम
तृतीय वर्ष कला-समाजशास्त्र



**कु. वैशाली सामंत**
तृतीय वर्ष कला



**कु. विनश्री पाटील**
तृतीय वर्ष वाणिज्य



**कु. पुष्पा लटके**
प्रथम वर्ष कला



**कु. तेजस्विनी अकोळकर**
प्रथम वर्ष वाणिज्य



**कु. सोनल किरुळकर**
बारावी वाणिज्य



**कु. अर्चना पाटील**
बारावी कला



**कु. दिपाली पाटील**
बारावी विज्ञान



**कु. सुप्रिया इंगवले**
अकरावी वाणिज्य



**कु. मनिषा पाटील**
अकरावी कला



**कु. धनश्री पाटील**
अकरावी विज्ञान

# 'झेप घेतली आकाशी'

**प्रथम श्रेणी प्राप्त**

**कला - हिंदी**



**कु. माधवी माळी**
विद्यापीठात सर्वप्रथम
तृतीय वर्ष कला - हिंदी



कु. शैलजा शिंदे



कु. सारिका पोवार



कु. शितल पाटील



कु. मनिषा पाटील



कु. जयश्री नवलगुंदे



कु. मनिषा भोसले



कु. सुषमा आचरेकर



कु. अश्विनी खुर्द



कु. वर्षा जंगम



कु. रत्नमाला कांबळे

# 'झेप घेतली आकाशी'



कु. अपर्णा संकपाळ
इंग्रजी



कु. वैशाली नाईक
इंग्रजी



कु. कमल पाटील
इंग्रजी



कु. सत्यशिला दळवी
अर्थशास्त्र



कु. सविता देशपांडे
अर्थशास्त्र



कु. अंबिका चौगुले
अर्थशास्त्र



कु. अर्चना गायकवाड
समाजशास्त्र

**प्रथम श्रेणी प्राप्त**



कु शोभाताई एकल
समाजशास्त्र

# 'जाहले गगन ठेंगणे'

## आंतरमहाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेतील यशस्वी



कु. रंजना पोवार
प्रवास-वर्णन, (लक्षात राहिलेले गणपतीपुळे-प्रथम पुरस्कार)



कु. मंगला कोकरे
यात्रा-वर्णन
सुहाना सफर-द्वतीय क्रमांक



कु. गीता मस्कर
एकांकिका
दुर्दैवी मंगी-प्रथम पुरस्कार

# ‘झेप घेतली आकाशी’



कु. मनिषा चौगुले

## प्रथम श्रेणी प्राप्त

### तृतीय वर्ष वाणिज्य



कु. आदिती जोशी



कु. वैशाली जाधव



कु. छाया कदम



कु. रेवती पाटील



कु. मनिषा भोसले



कु. अफ्रोजा जमादार



कु. शितल पवार



कु. लता कोगे



कु. किर्ती भडाळे



कु. विद्या कांबळे
बारावी-कला
मागासवर्गीय सर्वप्रथम



## ‘अभिनंदन’



कु. राज्यश्री कांबळे
बारावी-विज्ञान
मागासवर्गीय सर्वप्रथम

# ‘ध्वज ज्यांच्या हाती’

# स्टुडन्टस कौन्सिल



**कु. तेजस्विनी अकोळकर**
जनरल सेक्रेटरी
द्वितीय वर्ष वाणिज्य



**कु. वैशाली शिंदे**
प्राचार्य नियुक्त प्रतिनिधी
तृतीय वर्ष वाणिज्य



**कु. सुषमा गुळगौंड**
प्राचार्य नियुक्त प्रतिनिधी
तृतीय वर्ष वाणिज्य



**कु. अर्चना बेनाडे**
क्रीडा विभाग प्रतिनिधी
तृतीय वर्ष कला



**कु. चंदन जामदार**
सांस्कृतिक विभाग प्रतिनिधी
द्वितीय वर्ष वाणिज्य



**कु. उज्वला पाटील**
राष्ट्रीय सेवा योजना प्रतिनिधी
द्वितीय वर्ष कला



**कॅडेट तेजस्विनी पोवार**
राष्ट्रीय छात्रसेना प्रतिनिधी
प्रथम वर्ष कला



**कु. वैशाली सामंत**
तृतीय वर्ष कला
वर्ग प्रतिनिधी



**कु. विनश्री पाटील**
तृतीय वर्ष कला
वर्ग प्रतिनिधी



**कु. पुष्पा लटके**
द्वितीय वर्ष कला
वर्ग प्रतिनिधी



**कु. सुनिता गिरुले**
अकरावी कला
वर्ग प्रतिनिधी

## ‘ध्वज ज्यांच्या हाती’

**स्टुडन्टस कौन्सिल**



**कु. सोनल किरुळकर**
प्रथम वर्ष वाणिज्य, वर्ग प्रतिनिधी



**कु. सविता गायकवाड**
प्रथम वर्ष कला, वर्ग प्रतिनिधी



**कु. मनिषा पाटील**
बारावी कला, वर्ग प्रतिनिधी



**कु. स्नेहा मुडशिंगीकर**
बारावी कला, वर्ग प्रतिनिधी



**कु. सुप्रिया इंगवले**
बारावी वाणिज्य, वर्ग प्रतिनिधी



**कु. धनश्री पाटील**
बारावी विज्ञान, वर्ग प्रतिनिधी



**कु. अरुणा वाळवेकर**
अकरावी कला, वर्ग प्रतिनिधी



**कु. विजयता सोमय्या**
अकरावी वाणिज्य, वर्ग प्रतिनिधी



**कु. अर्चना अस्वले**
अकरावी विज्ञान, वर्ग प्रतिनिधी

## ‘श्रेष्ठता सिद्ध जाहली’

### राष्ट्रीय शिष्यवृत्ती प्राप्त



**कु. अश्विनी पाटील**
अकरावी कला
राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती



**कु. अस्मिता कुलकर्णी**
बारावी विज्ञान
राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती



**कु. प्रीती शिंदे**
तृतीय वर्ष वाणिज्य, महा.शासन
खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती

# वेचक क्षण – वेधक क्षण



सत्यशोध प्रबोध परीक्षा प्रमाणपत्र
वितरण करताना
प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील



साने गुरुजी जन्मशताब्दी
वर्षानिमित्त
प्रा. चंद्रकांत पाटगांवकर
यांचे व्याख्यान



मुक्त विद्यापीठाच्या संगणक
प्रशिक्षण कोर्सची माहिती देताना
प्रा. डी. यू. पवार

# वेचक क्षण – वेधक क्षण



जम्मू-काश्मिरहून नागपूर येथे तात्पुरते स्थाईक झालेल्या भारतीयांना रु. २१०० /- आर्थिक मदत स्विकारताना श्री. विजय भट्ट



कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांच्या चतुर्थ स्मृतिदिनानिमित्त स्त्रीवाद व मराठी साहित्य विषयावर डॉ. आनंद पाटील व्याख्यान देताना



पुष्परचना स्पर्धेतील विजेत्या पुष्परचना



(लघुकथा)

# एक पूर्णविराम

**कु. युगंधरा विलासराव घाटगे**, ११वी सायन्स

ह्या कातरवेळी माझं मन कसं सुनं सुनं होतं. ते वाऱ्याच्या गर्तेत गुंतलं होतं. एखाद्या कचऱ्याप्रमाणे. झालेल्या सर्व गोष्टींचा चुकलेल्या गणिताप्रमाणे ताळमेळ घालत उंचच उंच आकाशात नजर लावताना, ती नजर खाली पडण्याची भीती वाटत होती. सगळे पक्षी कसे आपल्या पिलांच्या ओढीने आपल्या चिमुकल्या घराकडे परतले होते. मी कुठे जाऊ असा माझा मलाच प्रश्न पडला होता. ''घर देता का, कोणी घर, दुखऱ्या जिवाला आसरा, मुलाने बाहेर काढलेल्या माणसाला घर.'' आयुष्यभर झंझावाती वादळाप्रमाणे लढणाऱ्या माणसाला विसावा मिळेल का ? पडक्या वाड्यातील वासे, खांब ज्याप्रमाणे उखडून नेतात त्याप्रमाणे माझ्या मनातील आशेचे खांब आज सगळ्यांनी उखडून नेलेले आहेत. ''जग ही एक नाट्यभूमी आहे, आपण सर्वजण त्यावरचे कलाकार आहोत आणि परमेश्वर त्याचा निर्माता आहे.'' पण मी या नाट्यभूमीवरचा एक अपयशी कलाकार आहे.

मी एक शेतकरी, शेतकरी कुटुंबातला मुलगा. त्यामुळे मी शिकलो पोट मारायला, सगळ्यांना समजावून घ्यायला. आम्ही पाच भावंडे जास्वंदीच्या पाच पाकळ्याप्रमाणे. एक बहीण, तीन भाऊ आणि मी सगळ्यात मोठा. वडिलांना हातभार म्हणून मी शाळा शिकत शिकत वडिलांना मदत करीत होतो. पण अवघ्या सोळाव्या वर्षी माझ्यावर दुःखाने प्रहार केला. माझ्या आई-वडिलांच्या देहान्तामुळे सगळ्या घराची जबाबदारी पडली त्यामुळे माझ्या जातिवंत मनाला शिक्षण सोडणे भाग पडले. जीवनाच्या रहाटगाडग्यात मला फिरण्याशिवाय गत्यंतर नव्हते. जीवनात आलेला दिवस ढकलण्याची मनाला विवंचना लागलेली होती. कर्तव्यानं मला जखडलं होतं म्हणूनच सगळं काही करीत होतो. सगळे शिकले. शहाणे झाले. पंख फुटले. अहंपणाचा वारा मनात दाटू लागला, ते सगळे आपला वाटा घेऊन बाजूला झाले. बहिणीच्या लग्नात मी कर्जबाजारी झालो होतो.

शिक्षणाने माणसाच्या विचाराच्या कक्षा रुंदावतात. ते विचारी होतात. पण माझ्या भावांचे मन शिक्षणामुळे कमकुवत झाले होते.

सर्वोदय ह्या नावाप्रमाणेच सगळ्यांच्या कार्यवेळी उगम पावून त्यांना संकटातून मुक्त करण्याचा मला छंदच जडला होता. आणि या सर्व संकटातून सर्वकुशलतेने मला माझ्या पत्नीने सोडवले होते. ती माझी जीवनसंगिनी होती आणि या अर्थपंक्तीप्रमाणे तिने आपले कार्य फारच कुशलतेने पार पाडले होते. मनातला कोलाहल दाबून भवितव्याच्या विवंचनेत आपल्या दोन बछड्यांसाठी मी गाढवाप्रमाणे राबत होतो.

माझा संघर्ष वादळाबरोबर होता. माझा संघर्ष समुद्रातल्या वादळाबरोबर होता आणि या संघर्षात ज्याप्रमाणे समुद्राच्या खाऱ्या पाण्याला नदीचे गोडे पाणी मिळते त्याप्रमाणे माझी पत्नी मला साथ देत होती. आणि अचानक ...



त्यादिवशी लिलावात माझे नाव आले. गावात दवंडी पिटवली जात होती. मन या प्रहारांनी घायाळ होत होते. आज माझे पूर्वजांचे घर या लिलावात जाणार होते. 'राम आणि श्यामचा' लिलाव म्हणजे काय ? या प्रश्नाने घायाळ होत होतो. मी माझ्या मुलांच्या नजरेत आज अपयशी बनलो होतो. घरातून बाहेर पडणे मुश्किल झाले होते. समाजाच्या बोचऱ्या नजरा घायाळ करत होत्या. भावांनी दूर केलं होतं. मी स्वत:शीच भांडत होतो आणि पत्नी माझी समजूत घालत होती. ''माजघरातील दिवा ज्याप्रमाणे स्वत: जळून इतरांना प्रकाश देतो त्याप्रमाणे तुम्ही आहात पण त्याला सत्पुण्य लाभते त्याप्रमाणे तुम्हालाही लाभेल. आपण गुलाबाच्या फुलाची अपेक्षा करतो पण त्याबरोबर काटे हे येणारच. आपण स्वच्छ सुंदर प्रकाशाची अपेक्षा करतो, सूर्योदयाचा केव्हातरी सूर्यास्त होणार असतो. पण तो सूर्य पुन्हा दुसरे दिवशी येण्याच्या अपेक्षेने बुडतो. कळीचे फुलात रूपांतर होणारच. पराभवानंतर विजय पण येणारच आहे. पण आपण असे हरून बसलो तर तो शक्य आहे का ? जे कधी आपले होते आणि आता ते पुन्हा कोणाचे तरी होणार आहे हे अटळ सत्य आहे. हे गीतेचे सार आहे. ते गेले म्हणून का, आपण शोक करायचा असतो ? ते पुन्हा मिळवण्याची जिद्द बाळगायची असते. हरलेलं पुन्हा जिद्दीनं जिंकणाऱ्यालाच विजयी म्हणतात.

आज लिलाव होता माझ्या घराचा. आज लिलाव माझ्या हृदयाचा होता. माझ्या अब्रूची लक्तरे चव्हाट्यावर मांडली जात होती. माझ्या प्रत्येक गोष्टीचा लिलाव होत होता. माझ्या आई-वडिलांशी निगडित असलेल्या प्रत्येक गोष्टीचा, माझ्या आठवणींचा आज लिलाव चालला होता. बघ्यांची गर्दी जमली होती. आज माझा पराभव झाला आहे एवढे फक्त मला कळत होते.

माझ्या पत्नीने (जीवनातल्या कठीण प्रसंगातील माझी सारथी) अनेक अडचणीतून मला सावरले होते आणि ती मला वडाच्या झाडाच्या अखंड सावलीप्रमाणे भासली होती. अखंड शीतलतेने. छाया, अगदी तिच्या नावाप्रमाणेच ! ती माझी भासमान सावली होती.

आणि शेवटी माझ्या घराचा लिलाव झाला होता. मी माझं चंद्रमौळी घर माझ्या शेतात थाटलं होतं.

आज शेताने म्हणजे या धरतीमातेने मला आसरा दिला होता आणि आज मी तो आईच्या वात्सल्यतेने स्वीकारला होता. आम्ही त्या झोपडीत अनेक स्वप्ने रंगवली होती. एखाद्या कुशल चित्रकाराप्रमाणे हातात कल्पनेचा कुंचला घेऊन भविष्याची चित्रे रंगवली होती व साकारली होती. त्यादिवशी एका लहान मुलाला ज्याप्रमाणे सांगावे त्याप्रमाणे तिने मला सांगितले -

**'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन्'**

कर्म करत जा. फळाची अपेक्षा करू नको. कोणतेही एक सत्य दुसऱ्याला विरोध करू शकत नाही. कोणत्याही दिव्यातून तेवणारा प्रकाश चांगलाच असतो. कोणत्याही बागेत उमललेला का असेना गुलाब सुंदर असतो, तारा पूर्वेकडून चमकत असू दे अगर पश्चिमेकडून त्याचे चमकणे सारखेच असते ! पूर्वग्रहापासून मुक्त व्हा म्हणजे तुम्ही सत्याच्या सूर्यावर प्रेम कराल. मग तो क्षितिजाच्या कोणत्याही बिंदूपासून उगवो.'' असे कोणीतरी म्हटले आहे आणि ते मला सर्वानुभवावरून पटते.

माझ्या जीवनातला गतकाल पाठीमागे पडला होता. आज राम आणि शामच्या शिक्षणासाठी मला माझी मातृभूमी गहाण ठेवावी लागत होती पण आज मला भावनांपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ वाटत होते.

''लक्ष्मणा, लंकानगरी सोन्याची असली तरी सुद्धा ती मला तितकी प्रिय नाही जितकी अयोध्या मला प्रिय आहे. मला कोणी देवेंद्राचे स्वर्गाचे राज्य देऊ केले तरी मी म्हणेन माता आणि मायभूमी स्वर्गापेक्षाही श्रेष्ठ आहेत.'' राघवेंद्रांचे हे म्हणणे अगदी सार्थ आहे.

रामाला सुवर्णालंकित लंकेपेक्षा आपली मायभूमी प्रिय वाटली. मलासुद्धा माझी धरणीमाता तितकीच प्रिय आहे. पण मला पुन्हा एकदा कर्तव्यानं जखडलं होतं. म्हणून मी माझी जमीन गहाण टाकली होती.

आता माझा एक मुलगा डॉक्टर झाला होता व एक मुलगा इंजिनियर. माझ्या दोन्ही मुलांची लग्ने झाली. सुना घरी



आल्या. कुंतीने दिलेला आशीर्वाद माझ्या पत्नीने नातसुनांना दिला होता. तिच्या आशीर्वादाचा शेवट कळाला नव्हता. ती म्हणाली होती, ''मुली, तू भाग्यवंत मुलाला जन्म दे. अगं, माझी मुलं विद्वान आहेत, शूरही आहेत. तरीही ती काळाच्या वनात खितपत पडली होती.''

माझ्या काही महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे म्हणून आज डॉक्टरांच्याकडून मला कळाले होते की मला कुष्ठरोग झाला आहे. पण मी ज्यांच्याकडून सहानुभूतीची अपेक्षा केली त्यांच्याकडून त्याची पूर्तता झाली नाही. त्यांनी मला आज दूर केले. घरातून बाहेर काढले होते. कारण मला कुष्ठरोग झाला होता. पण कुष्ठरोगामुळे माणसाच्या आठवणींना सुद्धा कुष्ठरोग होतो काय ? त्याने केलेल्या त्यागाला महत्त्व नसते का ? मी मघाशीच तुम्हाला म्हटले होते, शिक्षणामुळे माणसाच्या मनात अहंपणाचा लवलेश दाटतो तो माझ्याही मुलात आला. त्यांना पंख फुटले. शिक्षणामुळे ज्ञानाच्या कक्षा रूंदावतात. विचार करण्याची क्षमता येते. भावनांची कदर करण्याची जाणीव येते. जीवनाचं तत्त्व शिकविणारी माझी पत्नी पण आज मला सोडून गेली कारण मला कुष्ठरोग झाला होता.

माझ्या जीवनाचा अगदी निकटवर्ती साथीदार अनंताच्या न संपणाऱ्या प्रवासाला निघून गेला आहे. मी मात्र केवळ एकटाच. पहिल्यापासून सगळ्यांना आपले मानून स्वत:त गुंतलो. काही काही दु:खंच अशी असतात की, ती ज्याची त्यालाच सहन करावी लागतात. तीन तपांची वाटचाल मी तिचा हात हातात धरून केली होती. आज तिनं मला दूर केलं होतं. पतीच्या जीवनाची अर्धी बाजू सावरण्याची पवित्र शपथ तिने सप्तपदीच्या मंगलवेळी अग्निनारायणाला साक्ष ठेऊन घेतलेली असते. म्हणूनच तिला अर्धांगी म्हटलं जातं पण आज ती तिच्या कर्तव्यापासून बाजूला झाली होती. आज तिनं मला कुष्ठरोग झाला म्हणून लांच्छन लावलं होतं.

**''आज फुलले न विखरून गेले**
**जीवन म्हणजे एक सुंदर फूल आहे**
**मग कोणीही अशी अपेक्षा का करावी**
**की त्याचा सुगंध सर्वदा दरवळावा''**

पण या जीवनरूपी फुलाचा मला सुगंधच मिळाला नाही. वात्सल्याचा वसंत नेहमीच स्त्रीहृदयात बहरलेला असतो. पण तो कोठे गेला होता कोणास ठाऊक. तिच्या हृदयातील प्रेमबहार कोमजून गेला होता. मी आत्महत्या करणार होतो. मला हे अपमानित जीवन नको होते. पण मी मरणाला घाबरत होतो. आज मला महाभारतातील धर्मराजाचा आणि यक्षाचा तो अनुवाद आठवत होता. धर्मराजाला यक्षाने प्रश्न केला की, ''या जगात मोठे असे आश्चर्य कोणते ?'' या प्रश्नाला त्या अजातशत्रु धर्मराजाने उत्तर दिले, ''लोक मरताहेत हे पाहत असून आपल्याला देखील मरावयाचे आहे ही गोष्ट मनुष्य विसरतो यापेक्षा दुसरे आश्चर्य कोणतेच नाही.'' आज माझी अवस्था याप्रमाणे झाली होती. पण मी आज आत्महत्येचा निर्धार केला होता. प्रत्येक मनुष्य आयुष्याच्या शेवटी थोडासा शहाणा होतो पण तो दुसऱ्याला लागलेल्या ठेचांना नाही, तर स्वत:ला झालेल्या जखमांनी मी सुद्धा शहाणा झालो होतो. जगण्यासाठी माणसाला थोडासा स्वार्थ लागतो. तो स्वार्थ माझ्याजवळ नव्हता. पण मी आज आत्महत्या करणार एका जीवनाच्या अल्पविरामाला पूर्णविराम देणार आहे. तुम्ही म्हणाल हा भित्रा आहे. हा पळून चालला आहे. पण कुठल्या ना कुठल्या स्वरूपात या गोष्टीची पुनरावृत्ती होईल. माझ्यासारखाच कोणता तरी दुसरा कुष्ठरोगी मुलांनी बाहेर काढले, बायकोने दूर केलेल्या व मायेपासून वंचित झालेला असा तो, तो म्हणेल, ''घर देता, कोणी घर, दुखऱ्या जीवाला घर. मायेपासून दूर केलेल्या माणसाला माया'' असे तुमच्याकडे मागेल. पण हा समाज इतका निष्ठुर आहे की तो त्याला घर देणार नाही.

◆◆◆





# सामान्यांचे अर्थशास्त्र

कु. रंजना कल्लाप्पा चौगुले, बी. ए. भाग २

प्रा. अमर्त्य सेन यांना अर्थशास्त्र विषयातील नोबेल पुरस्कार जाहीर झाल्यामुळे केवळ त्यांचाच नव्हे, तर भारताचाही जगात फार मोठा सन्मान झाला आहे.

अमर्त्य सेन यांना हे अलौकिकत्व अशा वेळेस प्राप्त होत आहे की, जेव्हा फक्त बाजारपेठीय भांडवली आणि मुख्यत: पाश्चिमात्य अर्थतज्ज्ञांनाच हा सन्मान मिळण्याची प्रथाच जणू निर्माण झाली होती. अमर्त्य सेन हे लौकिक अर्थाने अर्थतज्ञ नाहीतच, ते तत्त्वज्ञ आहेत. अर्थशास्त्राला तत्त्वज्ञानाचा, नीतिशास्त्राचा, सामाजिकतेचा, आणि माणुसकीचा आत्मा नसेल तर ते केवळ उत्पादन आणि वितरण, किंमत आणि मूल्य, भांडवल आणि बाजारपेठ अशा अत्यंत संकुचित चौकटीत खुरटले जाते. असे त्यांचे मत आहे.

**दुष्काळ - दारिद्र्याचा ठसा**

अमर्त्य सेन यांच्या कोणत्या प्रेरणा होत्या की, ज्यामुळे त्यांच्या चिंतनाला हे वैश्विक मानवतेचे परिमाण प्राप्त झाले ? एखादाच अनुभव माणसाचा अखेरपर्यंत पाठलाग करीत राहतो. तसाच अनुभव सेन यांना वयाच्या अवघ्या १०व्या वर्षीच आला. तो १९४३ सालचा बंगालचा महाभीषण दुष्काळ ! या दुष्काळाच्या हलाखीतून बंगाल पूर्ण बाहेर पडत नाही तोच कलकत्ता शहराला हिंदू-मुस्लीम दंग्यांच्या वणव्याने वेढले. अमर्त्य सेन हे सुस्थित बंगाली कुटुंबातले. त्यांचे वडील आशुतोष सेन हे ढाक्का विद्यापीठात रसायनशास्त्राचे प्राध्यापक. अमर्त्य सेन यांचा जन्मच शांतिनिकेतनमधला. त्यामुळे त्यांच्यावरचा संस्कार हा स्वातंत्र्य चळवळीचा, साम्राज्यवाद विरोधाचा, गांधीवादाचा आणि बंगाली मार्क्सवादाचा. तर एके दिवशी कलकत्त्यातील घराजवळील बागेत अमर्त्य सेन खेळताना एक मुस्लीम रक्तबंबाळ मनुष्य कण्हत-विव्हळत अमर्त्यच्या समोर येऊन कोसळला. त्याला पाणी अमर्त्यने दिले व विचारले की इतके वातावरण भडकलेले असताना तू हिंदू वस्तीत कशाला आलास ? तो मुस्लीम मजूर म्हणाला, ''दुष्काळापासूनच त्यांचे कुटुंब उपासमारीत जगत आहेत. आज इकडे काम मिळेल या आशेने बायको-मुलांचा विरोध पत्करून आपण घराबाहेर पडलो आणि या हल्ल्यात सापडलो. अमर्त्यची आई आणि घरातील बाकी माणसांनी त्याची शुश्रूषा केली. पण तो काही तासानंतर मरण पावला. या अनुभवाने त्यांच्या हृदयावर जी जखम केली ती अजूनही ओली आहे.

बंगालमधील दुष्काळाच्या वेळी वडिलांच्या सांगण्यावरूनच नव्हे, तर गरिबांविषयीच्या कणवेने अमर्त्य सेन यांनी लहानपणी आपल्या घरातल्या सर्व धान्य सिगारेटच्या पत्र्याचा डबा भरून लोकांना वाटले होते. कदाचित याच प्रसंगामुळे सेन यांनी अर्थशास्त्राचा अभ्यास करताना 'दुष्काळ' या विषयाचे अध्ययन केले असावे. त्यातूनच त्यांनी दुष्काळ हे केवळ नैसर्गिक आपत्तीतून येणारे संकट नाही, तर आर्थिक व राजकीय यांच्या भूमिकेतून येणारा प्रलय आहे. असा सिद्धांत सेन यांनी मांडला आणि तो जगाला मान्य करावा लागला.

आणि हीच १९४३ सालच्या भीषण दुष्काळामध्ये मोठी



दुष्ट कृती केली गेली की, जिची नोंद इतिहासामध्येही केली गेली. पीक आले नाही म्हणून हा दुष्काळ नव्हता, तर ब्रिटनमध्ये दुसऱ्या महायुद्धातील सैन्याला अन्नपुरवठा करण्यासाठी बंगालमधील अन्नधान्य ब्रिटनकडे वळविण्यात आले होते. आणि त्यामुळेच बंगालमधील लक्षावधी लोक अन्न-अन्न करीत मृत्युमुखी पडले होते. **जाणतेपणी त्यावेळचे ब्रिटनचे पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांनी घडवून आणलेली ही कृती होय.** या भीषण दुर्घटनेने त्यांच्या मनावर खोलवर जखम केली.

अर्थशास्त्राचा अभ्यास सुरू केल्यावर आपल्याला या अनुभवातच वेगळा आशय दिसू लागला, असे ते सांगतात. 'माणसाच्या मूलभूत समस्यांना अर्थशास्त्र उत्तरे शोधू शकत नसेल, त्याच्या जीवनाचा अर्थ फक्त संख्याशास्त्र व काळ, काम, वेगाच्या गणितातच सांगण्याचा प्रयत्न करीत असेल, तर ते जीवन मूल्यहीन शास्त्र होईल. असे मला वाटू लागले. याचा अर्थ असा नव्हे की, संख्याशास्त्रासारख्या सर्व शाखा, उत्पादन तंत्र व वितरण व्यवस्था, बाजारपेठेचे गुंतागुंतीचे व्यवहार, भांडवलसंचय व विकासासंबंधीचे झालेले चिंतन हे अभ्यासू नये. ते अभ्यासण्याची गरज आहेत. परंतु त्यावर भर दिला तर अर्थशास्त्रालाच काही अर्थ उरत नाही' - असे सेन म्हणतात.

त्यांचे शालेय मित्र सुखमोय चक्रवर्ती यांच्या सल्ल्यावरून त्यांनी अर्थशास्त्र ही शाखा उच्च शिक्षणासाठी निवडली. अर्थशास्त्राबरोबर ग्रीक व संस्कृत यांचा अभ्यास चालूच ठेवला. सेन यांचा अध्यापन क्षेत्रातील प्रवास प्रदीर्घ आहे. जादवपूर, दिल्ली विद्यापीठात अर्थशास्त्र शिकविल्यानंतर सेन पुढे हॉर्वर्ड, ऑक्सफर्ड, लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, लॅमोन्ट विद्यापीठ, प्रिस्टन आणि ट्रिनिटी अशा अनेक ठिकाणी अध्यापनासाठी व संशोधनासाठी गेले. प्रत्येक ठिकाणी त्यांनी त्याचा प्रभावी ठसा उमटवला. जर त्यांनी प्रस्थापित भांडवली-बाजारपेठीय पद्धतीने चिंतन संशोधन केले असते, तर त्यांचा याहूनही कितीतरी अधिक पटीने गौरव झाला असता. परंतु अशा लौकिक यशाची आकांक्षा त्यांनी बाळगली नाही. जेव्हा साम्यवादी अर्थशास्त्राचा दबदबा होता, तेव्हा कार्ल मार्क्सच्या विचारांचा आदर राखूनही त्यांनी कम्युनिस्ट अर्थ व्यवस्थापनातील त्रुटी दाखविल्या होत्या. त्यांनी आपल्या मूळ प्रेरणा, मूल्ये आणि तत्त्वज्ञानाशी कधीही प्रतारणा केली नाही. आज त्यांनी केलेल्या या तपश्चर्येचा गौरव होत आहे. त्यांना जरी अर्थशास्त्रातील हा बहुमान मिळाला असला, तरी प्रत्यक्षात त्यांच्या तत्त्वप्रणालीचाच आणि पर्यायाने भारताताच हा फार मोठा सन्मान आहे !

**तत्त्वज्ञानी - अर्थशास्त्रज्ञ**

अमर्त्य सेन यांचे विचार प्रामुख्याने भारतीय वास्तवातूनच आकारलेले आहेत. त्यांनी आपल्या व्यावसायिक कारकिर्दीची सुरुवात विकसनशील देशांसमोरील समस्यांच्या अभ्यासाने केली. बचतीचा पर्यास्त दर, योग्य उत्पादन तंत्राची निवड यासारख्या उपयोजित प्रश्नांचा त्यांनी सुरुवातीला विचार केला. पण नंतरच्या काळात मात्र कल्याणाचे अर्थशास्त्र या विषयाला केंद्रबिंदू मानले.

पारंपारिक कल्याणकारी अर्थशास्त्रातील साचेबंदपणा कमी करून सामाजिक हिताचा विचार करताना केवळ वस्तूचा विचार न करता व्यक्तींच्या क्षमतेचा, एवढेच काय त्यांच्या स्वातंत्र्याचा समावेश करण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली. नोबेल पारितोषिक मिळवणाऱ्या रॉबर्ट सोलो यांनी ''अर्थशास्त्राची सदसद्विवेकबुद्धी जपणारा'' असे सेन यांचे वर्णन केले आहे. यावरून मानवी कल्याणाला केंद्रस्थानी मानण्याच्या त्यांच्या आग्रहाला इतर सहकारी अर्थशास्त्रांकडून मान्यता मिळत नाही. हे स्पष्ट होईल. मात्र सेन यांनी ''अर्थशास्त्राच्या स्वरूपात जे बदल सुचविले ते सुधारणात्मक स्वरूपाचे आहेत. रूढ अर्थशास्त्राच्या मर्यादा दाखवून देताना सेन यांनी आपले म्हणणे रूढ अर्थशास्त्राच्या चौकटीतच मांडले. नवसनातन अर्थशास्त्र निरूपयोगाचे आहे, अशी टोकाची भूमिका न घेता, नवसनातन अर्थशास्त्राच्याच पद्धतीचा वापर करून त्यात काय बदल करता येतील हे त्यांनी



यशस्वीपणाने दाखविले. त्यांना मिळालेले पारितोषिक हे त्यांच्या यशाचे गमक मानता येते.

सेन यांनी सव्वा दोनशे शोधनिबंध, वीस पुस्तके लिहिली किंवा त्यांना केंब्रिजच्या या प्रख्यात ट्रिनिटी कॉलेजने 'मास्टर' हा किताब दिला म्हणून नोबेल पुरस्कार मिळालेला नाही. अर्थशास्त्रात अमर्त्य सेन यांनी काही नवे सिद्धांत मांडले आणि त्या सिद्धांतांना जगन्मान्यता मिळाली आहे. म्हणून अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली. सेन यांच्या १९८० सालातील काही पुस्तकांमुळे जगाचे लक्ष अमर्त्य सेन यांच्याकडे गेले. 'पॉव्हर्टी अँड फेमिन्स' (दारिद्र्य आणि दुष्काळ) हा अमर्त्य सेन यांचा ग्रंथ विशेष गाजला होता. दुष्काळासंबंधी आलेले परंपरागत सिद्धांत सेन यांनी या ग्रंथात खोडून तर काढलेच, पण आपले स्वत:चे सिद्धांत मांडले. ''धान्याचे एकूण साठे अचानक घटले किंवा नष्ट झाले म्हणजे दुष्काळ पडला असे आजवर मानले जात होते. 'दारिद्र्य आणि दुष्काळ' या ग्रंथात सेन यांनी प्रारंभीच जगातील दुष्काळांचे दाखले देत धान्याचे साठे घटले म्हणजेच दुष्काळ पडतो असे नव्हे. जगात आतापर्यंत धान्याचे पुरेसे साठे उपलब्ध असतानाही दुष्काळ पडलेले आहेत. सर्वसामान्य माणसाला धान्याची उपलब्धता न होण्यावर दुष्काळ अवलंबून असतो. बाजारात भरपूर धान्य आहे पण ते लोकांना उपलब्ध होऊ शकत नसेल तर साठे आहेत म्हणून दुष्काळ नाही असे म्हणता येणार नाही''. यावर अमर्त्य सेन यांनी भर दिला. अमर्त्य सेन म्हणतात, ''खरे म्हणजे मी काही नवा सिद्धांत मांडलेला नाही. आजवर ज्या सिद्धांतांचा विचार झाला नाही, ज्यांच्याकडे दुर्लक्ष झाले होते असे विचार फक्त मी समोर आणले.''
महाराष्ट्रात दामाजीपंतांनी धान्याची कोठारे लोकांसाठी उपलब्ध केल्याची घटना प्रख्यात आहे. अमर्त्य सेन काय म्हणतात ते लोकांना सोपे करून सांगावयाचे झाले तर दामाजीपंतांचे उदाहरण देता येईल. तेव्हा भीषण दुष्काळ पडला होता. अवर्षणामुळेच दुष्काळ पडतो असे नाही. गोदामात धान्य होते पण ते लोकांना उपलब्ध नव्हते. दामाजीपंतांनी धान्य भरलेली कोठारे खुली केली. त्यावेळी भरपूर धान्य होते तरीही दुष्काळ होता. सेन यांचा भर आहे की धान्याचे साठे नाहीत अशी परिस्थिती येते तेव्हाच दुष्काळ पडला असे मानता येणार नाही. धान्याचे साठे असतानाही दुष्काळ पडतात. पडलेले आहेत. सेन यांचा सिद्धांत काय आहे हे सोपे करून सांगण्याचा आमचा प्रयत्न आहे.

दारिद्र्य आणि मानवी विकास यांचे मोजमाप केवळ उत्पन्नावर अवलंबून असता कामा नये. विकासाचे मोजमाप करण्यासाठी उत्पन्नाचा आधार ही फूटपट्टी नाही. शिक्षण त्याचप्रमाणे व्यक्तिगत आरोग्य आदि बाबीही दारिद्र्याचा विचार करताना लक्षात घेतल्या पाहिजेत. असे नमूद करून सेन यांनी भारताने स्वीकारलेल्या नव्या आर्थिक धोरणांचे मर्यादित स्वरूपात स्वागत केले आहे. पण नव्या आर्थिक धोरणात गरिबांचे जीवनमान उंचावण्याचे, त्याचे दारिद्र्य नष्ट करण्याचे सामर्थ्य नाही. ही सामाजिक संधी नव्या आर्थिक धोरणात नाही अशी टीका सेन यांनी नव्या आर्थिक धोरणावर केली. म्हणूनच त्यांना ''सामान्यांचा असा मान्य अर्थशास्त्रज्ञ'' असे म्हटले जाते. जागतिक पातळीवरून अर्थशास्त्रीय सिद्धांत मांडतानाही भारताच्या भूमीतील प्रश्न आणि येथील सामाजिक, आर्थिक, राजकीय वातावरण यांचा त्यांना विसर पडला नाही. संसारात गृहिणी ही केवळ नवऱ्याची पत्नी व मुलांची आई नाही, तर पुरुषाइतकीच स्त्री हा महत्त्वाचा घटक आहे. पण स्त्रीविषयक भारतीय माणसाची भूमिका गुलामाकडे पहावी तशी आहे. विकासाच्या कामात स्त्री हा महत्त्वाचा घटक आहे याचे भान ठेवले नाही तर भारताच्या विकासावर मर्यादा पडतील. भारताचा विकास कुंठित होईल यावर भर देणारे विपुल असे अर्थशास्त्रीय लिखाण सेन यांनी केले आहे. तसेच आजच्या भारताच्या दुरावस्थेबद्दल बोलताना ते सतत आग्रहीपणे मांडत आलेले आहेत की सरकारने शिक्षण, आरोग्य, सामाजिक सुरक्षितता व जमिनीच्या फेरवाटपाच्या प्रश्नात अधिक लक्ष द्यायला हवे होते. तसेच विविध जनसंघटनांनी देखील प्रामुख्याने याचाच आग्रह धरीत सरकारला कृती करायला भाग पाडायला हवे होते. कारण आज ज्या



आर्थिक, सामाजिक प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे त्याचे मूळ या प्रश्नात आहे. सेन बाजारपेठीय अर्थशास्त्र आणि सहकारी हस्तक्षेप यापेक्षा तिसऱ्या मार्गाचा अवलंब केला गेला पाहिजे असा आग्रह धरीत आहेत. ज्यात सामाजिक संधीसह बाजारपेठेतील सुधारांचा अवलंब केला जावा. पंचायत, जनसंघटना, गैरसरकारी संघटना आणि तत्सम संस्थांना यात प्रशासकीय भूमिका असावी असे त्यांचे मत होते.

**जमिनीचे फेरवाटप**

चीनमध्ये जमिनीच्या एकत्रीकरणामुळे जमिनदारी जरूर नष्ट झाली आहे. पण भारतात एकाएकी अशी सुधारणा आणून चालणार नाही, तर त्यासाठी पूर्वअट म्हणून आवश्यक ते सामाजिक बदल सुद्धा घडवून आणले गेले पाहिजेत. भारतातील ५०% पेक्षा अधिक ग्रामीण लोक भूमिहीन आहेत, तर १/३ शेतकरी आहेत.

**वैश्विकीकरण**

वैश्विकीकरण ख़ूप चांगले सिद्ध होऊ शकते. पण देश जर या दिशेने वेगाने प्रगती करीत असताना सामाजिक संधीच्या उपलब्धेकडे निरक्षरता, आरोग्य याकडे दुर्लक्ष करीत असेल तर त्यामुळे गंभीर प्रश्न निर्माण होऊन त्यात त्याचा शेवट होईल आणि हेच ब्राझीलचे झाले आहे. सेन यांच्या मते भारताच्या बाबतीत देखील हीच भीती वाटते.

**लिंगभेद**

सेन यांनी केलेल्या संशोधनाच्या आधारे दक्षिण आशियाई राष्ट्रातून लाखो महिला पुरुषांच्या मानाने भरपेट खाऊ शकत नाहीत किंवा आरोग्याची देखभाल करू शकत नाहीत आणि म्हणूनच मृत्यूमुखी पडतात. भारतासारख्या देशात आजही उत्तरप्रदेशात दर १०० पुरुषांसाठी ८८ स्त्रिया आहेत हे कशाचे द्योतक म्हणायचे ?

**शिक्षण**

सेन यांनी हे दाखवून दिले आहे की, चांगले शिक्षण हे देशाच्या आर्थिक विकासाची गुरुकिल्ली होय. यातून जनशिक्षणासाठी आर्थिक संसाधने गोळा केली जाऊ शकतात. तसेच ती एका चांगल्या गोष्टीची सुरुवात होऊ शकते. भारतात आजही ४८% पुरुष, तर ६१% महिला निरक्षर आहेत.

**न्यायोचित भारतीय समाज**

न्यायोचित भारतीय समाजाच्या स्थापनेसाठी सेन यांनी सुचविलेल्या उपायात राजकारण्यांना विशेष रस नाहीच. सेन यांच्या मते प्राथमिक आरोग्यावर फार मोठी कार्यक्षम गुंतवणूक करायला हवी. ज्याला अपेक्षित फळ खूपच उशिरा मिळेल, जो काळ दोन निवडणुकांमधील कालावधीपेक्षा कितीतरी जास्त असेल.

सर्वंकष जीवनाचा, व्यक्तीचाच नव्हे, तर समाजकल्याणाचा, माणसाच्या सांस्कृतिक, इतकेच नव्हे तर आध्यात्मिक विकासाचाही विचार त्या तत्त्वज्ञ-अर्थतज्ज्ञांनी केला होता. सेन यांच्या मते कार्ल मार्क्स हेही त्याच परंपरेतले. अलीकडच्या काळात सेन यांच्या मते केनेथ ॲरो हे असेच तत्त्वचिंतक होते. आपण याच परंपरेतले आहोत, असे सेन आवर्जून आणि अभिमानाने सांगतात. माणसाचे भावविश्व, त्याची (म्हणजे सध्याच्या जगातील बहुसंख्य माणसांची) असहायता, त्याचे दारिद्र्य आणि कुचंबणा, त्याचे एकाकीपण हे सर्व नीट समजून, त्याच्या प्रश्नांना या इहलोकात व याच जन्मी उत्तर शोधता येत नसेल आणि त्यानुसार सामाजिक व्यवहार करता येत नसेल, तर ते अर्थशास्त्र हे पूर्णत: व्यर्थशास्त्र आहे असे त्यांचे मत आहे. जेव्हा निखळ भांडवली-बाजारपेठीय अर्थशास्त्राचा प्रभाव ब्रिटनमध्ये मागरिट थॅचर यांच्या व अमेरिकेत रोनाल्ड रेगन यांच्या कारकीर्दीत वाढू लागला तेव्हाच अमर्त्य सेन यांनी त्याच्या विरोधात नीतिमूल्याचे परिणाम त्यांच्या मांडणीला दिले. किंबहुना म्हणूनच गेली १० वर्षे त्यांचा नोबेल पुरस्कार 'हुकत' होता, असेही म्हणता येईल.

**तत्त्वज्ञ - अर्थपंडित**

अर्थशास्त्राला तत्त्वज्ञानाच्या उंचीवर नेणारे आणि त्याचवेळी दारिद्र्य, दुष्काळ आणि मानवी यातना या अंधकारमय विश्वाला अभ्यासाद्वारे अर्थशास्त्राचे द्वार सताड उघडणारे प्रा. अमर्त्य सेन यांना यंदाचे अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक मिळाले आहे.



अर्थशास्त्राचे नोबल पारितोषिक मिळविणारे पहिले भारतीय, पहिले आशियाई आणि विकसनशील देशांचे पहिले अर्थपंडित या दृष्टीने हा सन्मान आहे.

नोबेल पारितोषिक विजेचे ख्यातनाम अर्थपंडित पॉल सॅम्युअलसन यांनी यासंबंधी मार्मिकपणे म्हटले आहे, ''अर्थशास्त्र हे आज स्वार्थी उजव्या बाजूने जात असताना, प्रा. सेन हे डाव्या बाजूने जात आहेत.'' प्रा. सेन हे डाव्या विचारसरणीचे असले तरी दारिद्र्याचा आणि दुष्काळाचा अभ्यास व विश्लेषण त्यांनी वस्तुनिष्ठ व स्वतंत्रपणे केला आहे. अर्थशास्त्रीय सिद्धांताच्या व संशोधनाच्या मळलेल्या, रूळलेल्या वाटेने वाटचाल करण्याऐवजी त्यांनी सामान्यांच्या समस्या व त्याविषयीची आस्था या आपल्या नव्या पण खडतर वाटेचे पांथस्थ होऊन या विषयाच्या विश्लेषणाने त्याला अर्थशास्त्रात यथोचित महत्त्व मिळवून देण्याबरोबर स्वत:चे स्वतंत्र स्थान निर्माण केले.

सामाजिक निवडीचा सिद्धांत मांडून त्यांनी अर्थशास्त्राला नैतिकतेचे परिमाण दिले. समाजात साधनसंपत्तीचे वाटप किती व कसे होते यापेक्षा कमी सुदैवी लोकांना त्यात काही मिळते का याकडे त्यांनी लक्ष वेधले. त्याद्वारे आर्थिक कल्याणाच्या उपयोगिकतेच्या संकल्पनेलाच त्यांनी आव्हान दिले. न्याय समाजाच्या संकल्पनेचे आग्रही प्रतिपादन व पुरस्कार त्यांनी केला. या न्याय्य समाजाच्या संकल्पनेचा समाजातील किमान सुदैवी लोकांच्या जास्तीत जास्त कल्याणावर भर असतो. या न्याय्य समाजाच्या अधिक विचारातून प्रा. सेन हे दारिद्र्याविषयी सखोल अभ्यास करण्यास प्रवृत्त झाले. दारिद्र्याचे मोजमाप पुरेसे नाही, तर या दारिद्र्याची खोली मोजणे अधिक आवश्यक आहे. म्हणजे दारिद्र्यरेषेखाली किती लोक आहेत ते काढायला हवे. यास सेन-निर्देशांक म्हणतात. दारिद्र्य हे केवळ उत्पन्न या स्वरूपात लक्षात घेऊन चालणार नाही, तर आरोग्य-शिक्षण-रोजगार आदि जीवनमान उंचावण्यासाठी आवश्यक असलेल्या सुखसोयी, संधींपासून हे गोरगरीब किती वंचित आहेत याकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. आपल्याकडे विकासाचे नियोजन आहे पण गोरगरिबांच्या विकासाचे नियोजन नाही असे दिवंगत ख्यातनाम अर्थतज्ज्ञ प्रा. वि. म. दांडेकर जे म्हणत त्यातील मर्म हेच होते.

प्रा. सेन यांचा आर्थिक सुधारणांना विरोध नाही. मात्र, या आर्थिक सुधारणेला वंचित, शोषित गरिबांच्या सर्वांगीण विकासाचा मानवी चेहरा हवा. अन्यथा विषमता फक्त वाढत जाईल. प्रा. सेन हे भुकेचे प्राध्यापक आहेत - अशी टवाळी लोक त्यांच्यावर टीका करीत असतात. भरल्या पोटी केवळ 'आहे रे वर्गाचा सदैव विचार करणारे असेच म्हणतील, दरिद्री नारायणाच्या भुकेची वेदना प्रा. सेन यांच्यासारख्या सहृदय व संवेदनाक्षम 'वेदान्ती'च जाणू शकतो. जगातील ४०% देशांमध्ये मंदीचे संकट निर्माण झाले असून, आशियाई देशांमधील आर्थिक पेचप्रसंगाने दारिद्र्य व बेकारीची समस्या अक्राळविक्राळपणे उभी राहिल्यामुळे प्रा. सेन यांच्या दारिद्र्याविषयीच्या अभ्यासाच्या योगदानाचे महत्त्व नोबेल पारितोषिकाच्या निवडसमितीला अखंड पटले असावे.

◆◆◆

*हार्दिक शुभेच्छा !*

# मे. न्यू प्रकाश इंजिनिअरिंग वर्क्स

**स्पेशालिस्ट : सर्व प्रकारचे ट्रक्स, कारचे हौसिंग, पायलट बेअरिंग, क्राऊन केज बॉडी, फ्रंट ॲक्सल व फोर्क बेंड.**

१४३०, सी, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

फोन : ६४२११३

एम्. आर. सुतार (पाहुणे मेस्त्री)



# पुणे तेथे काय उणे

**(प्रवासवर्णन)**

**कु. स्वप्नगंधा अविनाश गायकवाड, बी. ए. भाग १**

माझे बाबा घरी सारखे 'पेशवाई'च्या नावाने ओरडायचे. आमच्या गल्लीतल्या कुलकर्णी काकांना सारखे चिडवायचे. ते घरी यायचे भले आणि हे त्यांना चिडवायचे भले. दोघे तसे अगदी जिवश्चकंठश्चपैकी मित्र. पण त्यांनी काही बेत ऐकवला की बाबांचं वाक्य ठरलेलं, 'अप्पा, अरे विसर ते आता पेशवाईतले दिवस. तू आता गांधीयुगात आहेस. ध्यानात आहे ना ?'

पण कुलकर्णी काका भारी समंजस. ते हसायचे. म्हणायचे, 'अरे, त्या राघोबादादाला काय मी नारायणरावाचा खून कर म्हणून आग्रह केला होता ? का दुसऱ्या बाजीरावाला ख्यालीखुशालीत रहा म्हटलं होतं ? अरे, जगात दोन चांगली, तर दोनशे बेकार माणसं असतातंच.'

मी मग काकांना बरं वाटावं म्हणून एकदा म्हटलं, ''काका, बाबा काही मला पुणं दाखवणार नाहीत. तुम्हीच दाखवा. हो. आमचे बाबा फारच कट्टर आहेत. ते शक्य असतं तर पुण्याच्या बाहेरून मुंबईला गेले असते.'

काका त्यावर सातमजली निष्पाप हास्य करीत म्हणाले, 'तू बाबाच्या वळणावर गेली नाहीस ते एक बरं झालं, नाहीतर हा वाघ जन्मभर मलाच ओरबाडत बसला असता. आता तुला दिवाळीची सुटी लागली की आपण तिघे - तू, तुझी काकू आणि मी आपल्या गाडीने पुण्याला जाऊ. आठ दिवस मजेत काढू. ठीक आहे.'

आणि आम्ही एके दिवशी पुण्याला निघालो. नॅशनल हायवेला गाडी लागली तसे काका न बोलता गाडी चालवू लागले. त्यांच्यापुढे एक मोटरसायकलस्वार संभापूरजवळ साईड न देता जोरात चालला होता. काकांनी हॉर्न वाजविल्यावर त्यांच्याकडे रागीट नजरेने पहात आणखी वेगाने चालवीत एकदम उजवीकडे हात वगैरे न दाखविता वळला. काकांनी ब्रेक लावले. आम्ही खूप घाबरलो. म्हटले आता इथेच कारभार आटोपणार. पुन्हा सर्व ठाकठीक होऊन गाडी मार्गाला लागली. काकूंना किती राग आला होता. 'काय माणूस आहे हा ?' काकू.

'अगं चालायचंच, रस्ता म्हटला की सर्व प्रकारचे लोक भेटणार. हा तर बरा. वेगात असलेल्या मोटारसायकली मुठी न पकडता काही 'हौशी कलाकार' चालवतात. त्यांचा तो जीवाशी खेळ पाहून आम्हीच थरथरू लागतो. म्हणूनच ना काका पुष्कळ असे लोक रस्त्यात अपघातात सापडून मरतात ?'

'होय, शिवाय हा नॅशनल हायवे क्र.-४ पहा ना. त्याची रुंदी बघ. दोन वाहनेही सुरक्षित प्रवास करू शकत नाहीत. आपला देश खरा मागासलेलाच आहे. का सरकारने रस्ते मोठे करू नयेत ? नुसते 'अपघात क्षेत्र' म्हणून ही जबाबदारी संपत नाही. वर्षाला किती माणसे मरतात ? त्यात पुन्हा भाविकांचीच संख्या अधिक असते.'

'मग काका मी म्हणते देव नसेलच !'



'ए बाई, तसं काही म्हणू नये. गप्प बैस. पुणे येईपर्यंत तरी असं काही बोलू नकोस.'

मी ओळखलं. काकू खूप घाबरतात प्रवासाला. म्हणून तर त्या देवाचं नाव घेत, स्मरण करीत बसल्या होत्या. मला त्यांची दया आली आणि प्रवास धोक्याच्या बनविणाऱ्या सरकारचा खूप राग आला. 'मी पंतप्रधान झाले तर' हा निबंध लिहिताना आता मी असं लिहायचं ठरविलं, की मी पंतप्रधान झाले तर अमेरिकेतील इंजिनियर्सना बोलावून प्रत्येक हायवे आठपदरी करीन.

पण काका बोलू लागले आणि माझी विचारसाखळी तुटली. 'ए चिमणे, तू देव मानतेस का ? वेडे, देव ही एक कविकल्पना आहे, आता पहा हे भाविक तिरुपती बालाजी, साईबाबा यांचं यथासांग दर्शन घेऊन वाटेत अपघातग्रस्त होतात. यावरून देव अस्तित्वात नाही हे सिद्ध होत नाही ?'

'अहो, तुम्ही काही न बोलता गाडी चालवा बरं' काकू.

'अगं मी देवावर विश्वास ठेवत नाही म्हणूनच माझ्याकडून अपघात होणार नाही. तू निवांत रहा.'

पण कसचं काय ? घाटाच्या प्रारंभी त्या पुन्हा नामस्मरण करू लागल्याच. शेवटी एकदाचे आम्ही पुण्यात दाखल झालो आणि काकूंनी २५० कि. मी. अंतराचा ताण सुस्काऱ्यातून व्यक्त केला.

पहिल्यांदा पुणे विश्वविद्यालय पाहिले. लांबलांबवर इमारती आणि मध्ये जंगल वाढलेलं. त्या जंगलांची अवकळा बघवत नव्हती. काही युनिव्हर्सिटी प्रोफेसर्सही काकांनी दाखविले. ही त्या जंगलासारखी दाढ्यामिशा वाढवलेली. अव्यवस्थितपणा, भोंगळपणा दोन्हीकडे सारखाच. मी निष्कर्ष काढला की ह्यांना दाढी काढता येत नाही तर हे विद्यापीठ परिसर कसा व्यवस्थित ठेवणार ? आणि कपडे तर काय, वाहवा ! भिकाऱ्यासारखे. गुडघ्यापर्यंतचे खादीचे नेहरू शर्टस् आणि भोंगळ विजारी. खांद्याला शबनम पिशवी. ह्यांना युनिव्हर्सिटी प्रोफेसर म्हणावे की वेडे पीर ? मी काकांना म्हटले,

'काका, हे विद्वान असे का वागतात हो ?'

'अगं ही माणसं ढोंगी आहेत. आपण विद्वान आहोत, कलंदर आहोत असं भासवायचं. त्यासाठी हे एवढं नाटक करतात.'

'ते जाऊ द्या. पण मला एखादं लेक्चर ऐकवा ना ?'

'ते जरा कठीण आहे. पण बघू चल.'

काकांनी मराठी विभागात नेलं. तिथं त्यांच्या ओळखीचे कुणी होते. त्यांनी क्लासरूममध्ये घेतलं. उद्‌बोधन वर्ग होता म्हणे तो. बऱ्याच वयस्करांना एक तरुण प्राध्यापक सांगत होते.

'ह्या पुणे विद्यापीठात जवळजवळ पाचशे प्राध्यापकांच्या जागा आहेत पण त्यात ब्राह्मणेतर वर्गाचे फक्त १४० लोकच आहेत. राहिलेल्या ३६० जागा उच्च वर्णियांच्याच आहेत.'

हे ऐकल्यावर माझे बाबा ह्या विद्यापीठाची डिग्री मी घेणार नाही असे का म्हणत होते ते कळले. नाहीतरी माझे बाबा खानदानी मराठी कुटुंबातले. म्हणून तर त्यांनी शिवाजी विद्यापीठाचीच पदवी घेतली.

पुणे विद्यापीठाच्या प्रवेशद्वाराजवळ थांबून बोध चिन्हाचा विचार केला. शनिवारवाडा बोधचिन्हात दिसला. शनिवारवाड्याचा इतिहास हा 'दगलबाजांचा इतिहास' आहे. मुजोर नोकरांचे निवासस्थान म्हणजे शनिवारवाडा. साताऱ्च्या छत्रपतींना 'स्वामी' हे संबोधन रणजीत देसाईंनी दिले. कोणा पेशव्याने नव्हे, मग त्या शनिवारवाड्याचे बोधचिन्ह विश्वविद्यालयाला देऊन पुणेकरांनी काय साधले ? कुठे शिक्षणक्षेत्र आणि कुठे हे मुजोरक्षेत्र. कशाचा कशाशी मेळ बसेना.

दुसरे दिवशी काकांनी शनिवारवाडा दाखविण्यासाठी नेले. पण वाटेत त्यांचे एक मित्र भेटले. आम्ही शनिवारवाड्यावर पोचलो तेव्हा तो बंद झाला होता.

'आत काही पाहण्यासारखं आहे का हो ?' मी समोर पहिल्या बाजीरावाचा पुतळा पहात काकांना विचारले.



'आत काय असतं, दालनं म्हणजे मोठ्या रूमस्. त्या सुद्धा आम्हा लोकांना नीट ठेवता येत नाहीत.'

खरं तर ही वास्तू म्हणजे राष्ट्रीय स्मारक, पण परिसर पहा ना कसा गचाळ आहे. जणू हे वडापाववालेच शनिवारवाड्यावर हल्ला करताहेत.' काका तापले होते.

'काका, हे बाजीराव पेशवे ना ?' मी.

'हां, राऊ सिरियल पाहिलीस ना ? तिचा नायक. बाजीराव पेशवा.'

'खूप पराक्रमी होते ना ? काकू सहज बोलल्या.

'होय, खूप पराक्रमी. मस्तानीसह सर्व क्षेत्रात पराक्रमी. आणि आमच्या साहित्यकारांनी त्यांच्या इष्कबाजीचंच कौतुक फार केले. आमच्यासारख्यांनी असा पराक्रम केला असता तर चाललं असतं काय ?'

काकू खाली मान घालून गप्प उभ्या राहिल्या.

मी पुन्हा त्या फेरीवाल्यांनी, खाली माना करून दम्याची उबळ जिरवीत बसलेल्या पेन्शनरांनी आणि जिन्स वापरणाऱ्या 'मस्तानीं'नी वेढलेल्या शनिवारवाड्याकडे नजर टाकली. तो दु:खाचे नि:श्वास टाकत असावा असे वाटले.

'काका, तो दगडूशेठ, दगडूशेठ म्हणतात तो गणपती कुठाय हो ?' मी कुतूहल म्हणनू विचारले.

'हातेच्या, दगडूशेठ इथंच की. जरा ह्या उत्तरेकडं गेलं की दगडूशेठ. आज काय संकष्टी काय ?'

'अगंबाई, माझी संकष्टी आणि मी भजी खाल्ली' - काकू कळवळून म्हणाल्या. त्यावर काका खो खो हसले.

'काका, तुम्ही नाही करत संकष्टी ?'

'तो आर्मस्ट्राँग चंद्रावर गेला ना तेव्हापासून मी सोडून दिली. अगं विज्ञान केवढं गती घेतंय जगात. आणि आम्ही आपले अजून संकष्ट्यां आणि उपवास करीत बसलोय वेड्यासारखे.

बोलत बोलत रस्ता पार करून आम्ही मुंग्यासारखी गर्दी दाटलेल्या ठिकाणी आलो. रस्ता तसा छोटाच. म्युनिसिपल कार्पोरेशनच्या अडचणी रस्ता मोठा करण्यात काय असतील ते कळत होतं. म्हणून तर 'शहर संस्कृती' शंभरहून अधिक वर्षांची झाली तरी शहरांचे चेहरे खेडवळच आहेत. महानगरपालिका आणि ग्रामपालिका यात फरक काय, तर एक मोठी पाल दुसरी छोटी पाल ! बाकी सर्व आनंदाचे डोही आनंदाचे तरंगच ! आमची शहरे म्हणजे मोठी खेडीच !

रस्त्याच्या दोन्ही बाजूस वाहने. मोडक्या मोटारी आणि नव्या सेंट्रो, हुंडाई वगैरे. माणसे तर पॉश. संकष्टी 'सेलेब्रेशन' म्हणावे असे मेकअप. नव्या गाडीतून सळसळणाऱ्या साड्या, दागिने, बॉबकट किंवा बॉयकटवाल्या स्थूल बायका. जिन्स गॉगलवाल्या पोरी, मंदिरापुढे रांगेत हलक्या, मळकट, जीर्ण मॅनिला पँटातले वृद्ध, पेन्शनर, मधून मधून 'उजाला व्हाईट' कडक स्टार्च नेहरूशर्ट आणि इरापी विजार, कापशी-कोल्हापुरी चपला, हातात हिऱ्याच्या अंगठ्या वापरणारे नगरसेवक, आमदार, क्वचित खासदार, भरलेली दाढीवाली थोबाडं, वर अष्टगंधाचा ठळक ट्रेडमार्क. ह्या गर्दीपुढं हीन, दीन, अनाथ, लहान भिकारी मुलं, लेकुरवाळ्या भिकारणी. दुर्लक्षित, उपेक्षित, हात पसरलेले.

काका, हे सगळं पहात होते म्हणूनच मी म्हटले, 'काका, मला वाटतं इथं सगळे भिकारीच आहेत.'

काकू आश्चर्याने तर काका संमतीपूर्ण हसले.

'बबडे, तू हुशार आहेस. पण मला तर भिकारी शहाणे आणि भक्त निर्बुद्ध वाटतात. कारण हे सत्यनिष्ठ तर ते कल्पनानिष्ठ आहेत. व्हेरी गुड. तू मला चिंतनाला मुद्दे दिलेस.'

मी दगडूशेठ हलवाई गणपतीकडे पाहिले. गणपती हा मला पिकोसोच्या चित्राइतकाच दुर्बोध वाटतो. शहाणी म्हणवणारी ही तमाम भक्तमंडळी मला अक्कलशून्य वाटू लागली.

अहो हा नवसाला पावतो म्हणे.' काकू.

'हो, किती पावतो ते कोल्हापूरच्या 'त्या' गृहस्थांना विचार. बिचाऱ्यानं आपली सोन्यासारखी चाल मुलं, बायको ह्या गणपतीपायी गमावली. गणेशविसर्जनाच्याच



दिवशी त्यांचं रक्षाविसर्जन झालं. एवढा पावतो.'

मी त्या भयानक रोड ॲक्सिडेंटचा विचार करीत घरी आले.

एका संध्याकाळी 'पर्वती' दर्शन झाले. व्यायामप्रेमी पुणेकरांसाठी पर्वती हे एक छान साधन आहे. पायऱ्या मात्र उतरत्या दगडांच्या असल्याने माझा खाली उतरताना बुटांचा पाय घसरला. माझ्या अंगावर काटा आला. कुणी बिचारे अपंगही व्हायचे. खरं तर पायऱ्यांची पातळी व्यवस्थित केली पाहिजे. कोण करणार ? म्युनिसिपालिटी तरी किती गोष्टींकडे लक्ष देणार ?

पर्वतीवर मला पेशवे घराण्यातील ठळक व्यक्तींच्या समाध्या दिसल्या. अत्यंत घरगुती स्वरूपाच्या. खरं म्हणजे आता पेशव्यांचा अंमल नाही. पुणे ही काही पेशव्यांची खासगी इस्टेट नव्हे. त्या समाध्या त्यांच्या नातेवाईकांच्या निवासस्थानी हव्यात. पर्वती टेकडीचा विकास एक करमणुकीचे स्थान म्हणून केला पाहिजे पण लक्षात कोण घेतो ?

'येथे व्यायाम करण्यास मनाई आहे'. असा एक फलक मला तेथे दिसला. मला फार वाईट वाटले. वास्तविक पुणेकर शहराच्या प्रदूषणातून मुक्त हवेत जर व्यायाम करत असेल तर त्यांचे स्वागत केले पाहिजे. त्यासाठी क्लब स्थापन केला पाहिजे. नियमित व्यायामपटूंना पुरस्कार दिले पाहिजेत. ते राहिले एका बाजूस. उलट फलक काय तर येथे व्यायाम करू नका. छान, किती भारतीय व्यायामप्रेमी आहेत ? अर्धा टक्का. अशा फलकांनी ती संख्या आणखी घटेल.

पुण्यात फिरताना एका ठिकाणी 'भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंडळ' असा बोर्ड वाचला. मी काकांना माहिती विचारल्यावर ते म्हणाले, 'तुझ्या वडिलांनाच विचार.'

'का हो काका ?' मी.

'म्हणजे तुझा बाप तुला लोकहितवादींची शतपत्रे वाचायला देईल. खरं तर मी ब्राह्मण, संस्कृतविरुद्ध न बोलणं हा धर्म असे आम्ही म्हणावे. पण मी तुझ्या बापासारखाच. लोकहितवादी, संस्कृत ही मृतभाषा मानणारा. लोकहितवादी पुरोगामी विचारवंत. त्यांना संस्कृत साहित्य हे सहित - हितवर्धक वाटलं नाही ते बरोबरच. संस्कृत म्हणजे वठलेलं झाड. त्याला पाणी घालून उपयोग काय ?'

'पण काका, ही संस्था फार प्रसिद्ध आहे ना ?' मी.

'हो, आहे ना. कारण काही हट्टी लोक तिला प्रसिद्धी देण्यासाठी झटत असतात. भाषेचे जतन करणे आपले काम आहे. पण आता आपण सर्व शक्ती मातृभाषेसाठीच सर्व केली पाहिजे. मराठीची उपेक्षा एका बाजूस आणि संस्कृतविषयी निष्ठा दुसरीकडे हे चित्र उदास करणारं आहे.' काका व्यथित झाले होते.

लकडी पुलावरून मुळामुठा नद्यांचे दर्शनही असेच व्यथित करणारे होते. शहरांमुळे प्रदूषण होणे स्वाभाविक होते पण पुणे महानगरपालिकेला पुण्याचे सौंदर्य वाढविण्यासाठी जर प्रारंभच करायचा असेल तर इथूनच करायला हरकत नाही. आपण इतिहासावर म्हणजे भूतकाळावर प्रेम करणारी माणसे आहोत. वर्तमानकाळावर आमचं प्रेम फारंच कमी आहे. पुणे फेस्टिव्हल करून करोडो रुपयांचा चुराडा केवळ आपल्या प्रसिद्धीसाठी करणाऱ्या नेतृत्वाला अशावेळी साहजिकच दोष देण्याची इच्छा होते. सार्वजनिक उत्सवांना फाटा दिला तर शहराच्या सौंदर्यात भर टाकणारे स्थायी कार्य सार्वजनिक पैशातून नक्की आपणाला करता येईल. पण ती दृष्टी आणि ते राबविणारे यांचाच अभाव आहे.

पुणे-बेंगलोर रोडवर कात्रज घाटाच्या पुढे शहराच्या प्रारंभी विवेकानंदांचा पुतळा दिसला. पहाटे लाईटस् टाकलेला, पायाजवळून पाणी वाहणारा पुतळा किती छान दिसतो. अर्थात् तेव्हा त्या महापुरुषाबद्दल सहानुभूतीची भावना दाटून आली. एका बुध्दिमान माणसाचा केवळ धर्माकडून धर्मासाठी कसा बळी घेतला जातो याचे स्वामी विवेकानंद हे ठळक उदाहरण आहे. एका निरुपयोगी गोष्टीने एका उपयुक्त व्यक्तीचा बळी घेतला एवढेच जाणवत राहिले.

मला आवडले ते पुणे विद्यापीठापुढचे कारंजे. पंचवीस फूट उडणारे. जवळून जाणाऱ्यावर तुषार उडविणारे. पहात



बसावे असे. मात्र ते पहाताना पुणे विद्यापीठ जेव्हा त्या आनंदात मिसळते तेव्हा मात्र विद्यापीठात जातीयतेचे कारंजे त्याहून उंच उडतात असे वाटून खेद होतो. मन उदास होते. काका म्हणत होते आपण देहू-आळंदीला जाऊया म्हणून. पण मी म्हटले तिथे जाऊन तुकाराम-ज्ञानेश्वर कळतील का ? तसे पाहिले तर ज्ञानेश्वर कळणे सोपे, पण तुकोबांचे जगणे, त्यांचा जीवनसंघर्ष कळणे अवघड. म्हणून देहू-आळंदी कॅन्सलच केले. कर्व्यांचा आश्रम हिंगण्याला. पण हिंगण्याहून कर्मवीर विठ्ठल रामजी एकदा निराश होऊन परतलेत. आपण कशाला त्या कटू आठवणीला उजाळा द्यायचा म्हणून मी म्हटले नको.

आमच्या परतीच्या प्रवासात मात्र महात्मा फुले यांचे घर, त्यांचा अस्पृश्यांसाठी खुला केलेला हौद पाहण्याची इच्छा तशीच मनात राहिली.

मात्र पाहिले ते पुणे आणि 'पुणे तेथे काय उणे' या उक्तीचा मेळ फारसा बसत नव्हता हेच खरे. ◆◆◆


हार्दिक शुभेच्छा !



# मे. सुमित नर्सरी

मु. पो. हेर्ले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर
(कोल्हापूर-सांगली मेन रोडवरच)

**आमच्याकडे खात्रीशीर फळझाडे, फुलझाडे, गुलाब कलमे, शोभेची फुलझाडे इ. मिळण्याचे विश्वसनीय ठिकाण. तसेच लॉन मिळेल. तरु मिळतील.**

हार्दिक शुभेच्छा !

# दीप्ती ब्युटी पार्लर

ॲडव्हान्स ट्रीटमेंट
सर्व प्रकारचे हेअर कट, कलरिंग,
गनच्या सहाय्याने कान, नाक टोचले जातील.
पिंपल ट्रीटमेंट, डँड्रफ ट्रीटमेंट इ.

*राजारामपुरी ७ वी गल्ली, मेनरोड,*
*मुक्ताश्रम अपार्टमेंट, ब्लॉक नं. २०३,*
*कोल्हापूर. फोन : ६२२६३१*

हार्दिक शुभेच्छा !

# विजय ट्रेडिंग कार्पोरेशन

*सर्व प्रकारच्या प्रयोगशाळा साहित्यांचे विक्रेते.*
*केमिकल्स, ग्लासवेरर्अ, इन्स्टुमेंटस्, ॲपरेटस् इत्यादि*

**रुक्मिणीनगर, कोल्हापूर.**
**फोन : (ऑ) ६५४५११, (नि) ६५२०६३**
**फॅक्स : ०२३१-६५२०६३**



(विज्ञानेतर लेख)

# शेतकऱ्यांच्या आत्महत्या – चिंता व चिंतन

कु. मनिषा विवेक गुरव, बी. ए. भाग २

*अन्नाद्भन्ति भूतानि पर्जन्यादन्नसंभव: ।*

*यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञ: कर्मसमुद्भव: ॥*

प्रस्तुत श्लोक आहे श्रीमद्भगवद् गीतेमधील तिसऱ्या अध्यायातला. याचा अर्थ असा होतो की, अन्नामुळे प्राणी जगतात, पर्जन्यामुळे अन्न निर्माण होते, यज्ञापासून पर्जन्य उत्पन्न होते, तर कर्मातून यज्ञाची उत्पत्ती होते. विपुल अन्नधान्य उत्पादन व्हायचे असेल तर पडणारा पाऊस हा शेतकऱ्याला गरज असेल तेव्हा आणि गरज असेल तेवढाच पडायला हवा. आणि पर्जन्याला तर आपण देव मानतो. म्हणून आपली आणखी एक वैदिक प्रार्थना आहे, ''निकामे निकामे न पर्जन्यो वर्षतु'' अवेळी पाऊस पडू नये म्हणून ही आराधना.

पण सध्या पर्यावरणातील असमतोलामुळे शेतकऱ्यांना प्रत्येक वेळी दुष्काळ, अतिवृष्टी किंवा मग गारपीट यासारख्या नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे आधीच कर्जबाजारी असणारे शेतकरी आणखीनच हवालदिल झाले . कुटुंबाची गुजराण कशी करायची या विवंचनेत देशभरात कित्येक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. 'आमचा देश कृषिप्रधान देश आहे' असे आपण मोठ्या अभिमानाने म्हणतो. 'जय जवान, जय किसान, जय विज्ञान' म्हणत शेतकऱ्याला गौरवतो. पण नुसतंच तोंडाने बोलून काय होते ? वास्तवात या शेतकऱ्यांच्या जीवनाचा, त्यांच्या अडीअडचणींचा आपण कधीतरी विचार केला आहे का ? त्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले आहेत का ?

### शेतकरी सुखी तर जग सुखी

भारत स्वतंत्र झाला तेव्हा भारतात पुरेसे अन्नधान्य पिकत नव्हते. स्वाभाविकच अन्नधान्य आयातीचा आपल्या अर्थव्यवस्थेवर ताण पडत होता. स्वातंत्र्योत्तर काळात विविध योजनांमधून आपण अन्नधान्य उत्पादनाच्या बाबतीत स्वावलंबी झालो आहोत. पण याचे सारे श्रेय शेतकऱ्यांकडेच जात नाही का ? म्हणूनच शेतकरी सुखी तर देश सुखी हे आपल्या नियोजनकारांनी जाणले. आणि स्वातंत्र्योत्तर काळात अनेक सोयीसवलती देऊ केल्या. आयकरातून शेती उत्पादनाला सूट दिली. ठिकठिकाणी सहकारी संस्था स्थापन करून शेतकऱ्यांना आवश्यक वस्तू, यंत्रे, खते योग्य दरात पुरवण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर शेतीतील उत्पादन योग्य किमतीत विकत घेतले जाऊ लागले. याशिवाय वेळोवेळी विविध कारणांनी तगाई कर्जे दिली. प्रसंगी ती माफही केली असतील. पण असे असूनही शेतकऱ्याचे जीवनमान, त्याची आर्थिक स्थिती यात काडीमात्रही बदल झाला नाही.

### शेतकरी : अर्थव्यवस्थेचा कणा

शेतकरी हा आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा. पण आज हाच कणा मोडून पडलाय. याच शेतकऱ्यांवर



आत्महत्या करायची वेळ येते हे किती लज्जास्पद आहे. आणि हा काही आज उपस्थित झालेला प्रश्न नाही, तर यापूर्वीही कित्येक वर्षांपासून या छळाला कंटाळून कित्येक शेतकऱ्यांना आत्महत्येचा मार्ग पत्करावा लागला आहे. फक्त आजच्या घडीला हे प्रकरण आपल्याला वर्तमानपत्रातून जाहीरपणे कळलं एवढंच. पण हे कुठंतरी थांबलं पाहिजे. त्यासाठी यापाठीमागची कारणं शोधून त्यांचा विचार झाला पाहिजे. त्यावर उपाय शोधले पाहिजेत. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे हे उपाय अंमलात आणले पाहिजेत.

**शेतकरी : अज्ञानाचा बळी**

शेतकऱ्याच्या आजच्या हलाखीच्या आर्थिक स्थितीचा जेव्हा आपण विचार करतो, तेव्हा यापाठीमागची अनेकविध कारणं आपल्या लक्षात येतात. आणि सर्वात महत्त्वाचं जर काही कारण असेल तर ते आहे निरक्षरता. शेतकरी अडाणी, अशिक्षित असल्याने त्यांना लोकसंख्या वाढीच्या समस्येचे गांभीर्य समजत नाही. त्यामुळे त्यांच्या दारिद्र्यात तर भर पडतेच, पण देशासमोरही गंभीर स्वरूपाच्या समस्या उभ्या राहतात. अज्ञानामुळे सुधारित यंत्रतंत्राची माहिती त्यांना मिळत नाही. त्यामुळे अजूनही अनेक ठिकाणी परंपरागत यंत्रतंत्राचा वापर केला जातो. परिणामी शेतीची मशागत योग्य प्रकारे होत नाही. सुधारित तंत्रज्ञान, शेती संशोधनासंबंधी अधिक माहिती शेतकऱ्यांना सहज मिळावी यासाठी फारसे प्रयत्नही झालेले दिसत नाहीत. बऱ्याचदा आर्थिक कुवत नसल्यामुळे सुधारित बी-बियाणे, खते, कीटकनाशके वापरणे शेतकऱ्यांना परवडत नाही. त्यामुळे ते पारंपारिक पद्धतीने तयार केलेले बियाणे वापरणेच अधिक पसंत करतात. या बियाणांची उगवणक्षमता कमी असते. तयार झालेले पीक लवकर रोगास बळी पडते आणि उत्पादन घटते. जरी काही शेतकऱ्यांनी खते, कीटकनाशके वापरली तरी अज्ञानामुळे त्यांना या गोष्टी कशा व किती प्रमाणात वापराव्यात याचे ज्ञान नसते. प्रमाणापेक्षा जास्त खते, कीटकनाशके वापरून हे लोक स्वत:च स्वत:च्या पायावर कुऱ्हाड मारून घेतात. याचं मुख्य कारण असतं अज्ञान.

**आर्थिक अडचणी व आत्महत्या**

बऱ्याचदा आर्थिक अडचणींमुळे शेतीत गुंतवणूक करणे शेतकऱ्यांना परवडत नाही. बँकेकडून कर्ज घ्यावे तर तारण, जामीनदार, साक्षीदार या सर्वच अटींची पूर्तता करणे शेतकऱ्याला जमत नाही. सावकाराकडून कर्ज घेतल्यास भरमसाठ व्याजाचीच परतफेड करता करता त्याच्या नाकी नऊ येतात. यातच भरीस भर म्हणून नैसर्गिक आपत्तींनी तो हैराण होऊन जातो. पावसाच्या लहरीपणावर अवलंबून असणारी शेती तो रात्रंदिवस काबाडकष्ट करून पिकवतो. आणि 'पदरी पडलं पवित्र झालं' असं म्हणून मिळेल तेवढ्यात समाधान मानतो. पण इथे तरी दुर्दैव त्याची पाठ कुठे सोडते ? आलेले धान्य योग्य किंमत येईपर्यंत साठवून ठेवणे जागेअभावी त्याला शक्य होत नाही. शिवाय त्याची अनेक कामे, कर्जाचे हप्ते पैशाअभावी अडलेले असतात. बऱ्याचदा आपण पाहतो कि खेडेगावात लग्न-सण समारंभ ऐपत नसतानाही खूप खर्च करून साजरे केले जातात. त्यामुळे आलेले धान्य लगेच विकण्याची शेतकऱ्यांची प्रवृत्ती असते आणि अशावेळी मध्यस्थ, दलाल लोक त्यांच्या अज्ञानाचा, गरिबीचा, गरजेचा गैरफायदा घेतात आणि कमी किमतीत धान्य विकत घेऊन त्यांना फसवतात. सावकाराकडून घेतलेले कर्ज वेळेत फेडता येत नाही. जास्त व्याजदर, वाढता कर्जबाजारीपणा यामुळे शेवटी जगणे असह्य होणारच. हातातोंडाची गाठ मुश्किलीने पडताना बायका-मुलांचे हाल पाहण्यापेक्षा मरण बरे असा विचार करून निराशेने खचून जाऊनच काहींनी आत्महत्या केली असेल. शिवाय शेतकरी लोक दैववादी, भाग्यवादी आहेत. जे माझ्या नशिबात असेल ते घडणारच अशी दृढ समजूत असते. आणि त्यामुळेच ते अन्यायाचा प्रतिकार करू शकत नाहीत. म्हणूनच एके काळी सुखी समृद्ध स्वयंपूर्ण असणारे ग्रामीण जीवन आज मात्र मरगळलेले, काळवंडलेले व परावलंबी झालेले दिसते. कदाचित याच प्रतिकूल परिस्थितीला कंटाळून या शेतकऱ्यांनी इतक्या टोकाचा निर्णय घेतला असेल.

या विचारांचं थैमान जेव्हा डोक्यात सुरू होते तेव्हा एक प्रश्न नक्कीच उभा राहतो कि भारत हा कृषिप्रधान देश,



शेतकरी देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा, जय जवान जय किसान हे जे आपण शेतीचं, शेतकऱ्याचं गुणगान गातो, पण या शेतकऱ्यांच्या विकासासाठी काही प्रयत्न झाले की नाही ? झाले. यासाठी याआधीही खूप प्रयत्न झाले. अनेक योजना राबवल्या. पण तरीसुद्धा यातून शेतकऱ्यांच्या प्रगतीचा आलेख कितपत चढता राहिला ? मूठभर सधन शेतकरी आणखी श्रीमंत झाले आणि गरीब आणखीनच गरीब झाले. हीच का ती प्रगती ? कारण या योजनांमधून किती खरोखर गरजू शेतकऱ्यांना लाभ मिळाला ही एक शंकास्पदच बाब आहे. काही योजनांच्या कार्यक्रमांची अंमलबजावणी करताना झालेली दिरंगाई, लाचलुचपत यामुळे या योजना व्यर्थ गेल्या.

**उपाय योजना**

शेतकऱ्यांचा जर विकास साधायचा असेल तर पहिल्यांदा त्यांना सुशिक्षित करायला हवे. असे काहींचे मत आहे. हे बरोबरही आहे. पण ज्याला पोटभर खायला मिळत नाही तो काय शिक्षणात लक्ष घालणार ? दिवसभर शेतात राबणारे शेतकरी, त्यांच्या बायका रात्रशाळेत किंवा प्रौढ शिक्षण वर्गाला येण्यास तयार होतील का ? म्हणून या शेतकऱ्यांना आधी पोटभर अन्न मिळाले पाहिजे. त्यासाठी त्यांची आर्थिक स्थिती सुधारली पाहिजे. सुधारित बी-बियाणे खते-कीटकनाशके यावरील अनुदान वाढवून शेतकऱ्याला परवडेल अशा किमतीत त्याची विक्री झाली पाहिजे आणि ते कर्ज इतर कारणासाठी न वापरता केवळ शेतीसाठीच वापरले जावे याची दक्षता घेतली पाहिजे. आणि ते कर्ज इतर कारणासाठी न वापरता केवळ शेतीसाठीच वापरले जावे याची दक्षता घेतली पाहिजे. शेतकऱ्यांना खते-कीटकनाशके योग्य तऱ्हेने वापरता यावीत, तसेच शेती संशोधनासंबंधी, नवीन तंत्रासंबंधीचे ज्ञान शेतकऱ्यांना मिळावे यासाठी प्रदर्शने, शिबिरे, व्याख्याने आयोजित केली पाहिजेत. त्यांचे स्थानही शेतकऱ्यांना सोयीस्कर असावे. महाराष्ट्र शासनातर्फे यावर्षी मुंबईत शेतकऱ्यांसाठी 'ॲग्रो ॲड्व्हान्टेज' हे प्रदर्शन भरवण्यात आले. ते बघायला जाणाऱ्या शेतकऱ्यांना अर्धं तिकीट माफ होतं. पण या प्रदर्शनाचा काही लाभ झाला का ? किती शेतकरी हे प्रदर्शन पाहू शकले ? किती जणांना त्यातून मार्गदर्शन मिळाले ? त्यापेक्षा इतर काही निवडक शहरांमध्ये जिथे जाणे शेतकऱ्याला शक्य होईल अशा ठिकाणी यात्रांच्या वेळी प्रदर्शने भरवली तर नक्कीच लाभदायक ठरतील.

याशिवाय शेतकऱ्यांनी श्रमाने मिळवलेले उत्पादन योग्य किमतीने विकले गेले पाहिजे. त्यांना त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळावा याची खबरदारी घेतली पाहिजे. आज या उत्पादनाच्या किमती स्थिर नाहीत. कधी कधी या किमती एकदम वाढतात, तर कधी कधी एकदमच खाली घसरतात. त्यामुळे शेतकऱ्यांचे जीवन अस्थिर बनते. आज शेती उत्पादन घटले की अन्नधान्य, साखर यावर लेव्ही घेतली जाते आणि त्यातून मिळणारी रक्कम उत्पादन खर्चाएवढीही नसते. एरव्ही बाजारपेठेतही मध्यस्थांकडून शेतकरी फसवले जातात. तेव्हा शेतमाल किंमत निश्चित करून त्याची हमी सरकारने शेतकऱ्यांना दिली पाहिजे. यातून जेव्हा शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारेल तेव्हा ते शिक्षणाचा विचार करण्यास प्रवृत्त होतील पण शिक्षणाच्या बाबतीत शेतकऱ्यांमध्ये गैरसमज आहेत. त्यांना वाटते की शहरात नोकरी करायची असेल तरच शिक्षण आवश्यक आहे. शिकून काही नोकरी मिळत नाही. त्यापेक्षा अडाणी राहून शेती केलेली बरी असे त्यांना वाटते पण शिकून साक्षर, सुशिक्षित झाल्यामुळे शेतीचे नवीन ज्ञान मिळते. आधुनिक पद्धतीने शेती करून जास्त उत्पादन मिळवता येते, नफा मिळवता येतो. म्हणजेच फक्त नोकरीच नाही तर शेतीसाठीही शिक्षण तितकेच आवश्यक आहे. हे शेतकऱ्यांना पटवून दिले पाहिजे. शिक्षणासंबंधी त्यांच्यात जागृती केली पाहिजे. यासाठी सरकारने प्रौढ साक्षरता वर्ग सुरू केले. पण त्याचा म्हणावा तितका फायदा झाला नाही. आज शेतकऱ्यांना शिक्षणाची आवश्यकता आहे. पण ते नुसते पुस्तकी शिक्षण किंवा अक्षर ओळख यापुरते मर्यादित नसावे, तर त्यांच्यासाठी व्यावहारिक शिक्षण हवे. त्यांना किमान त्यांचे बँकेचे पासबुक वाचता आले पाहिजे. ते समजले पाहिजे.



सावकाराकडून कर्ज काढले तर सरळव्याज, चक्रवाढव्याज काढता आले पाहिजे. आपण किती कर्ज काढले, त्यातील किती फेडले, किती शिल्लक आहे याची नोंद ठेवता आली पाहिजे. हेच शिक्षण त्यांच्यासाठी जास्त महत्त्वाचे आहे. याबरोबरीने अर्थातच अक्षर ओळख हवीच, जेणेकरून त्यांना खते-कीटकनाशके वापरणे सोपे जावे, तसेच आज जे ग्रामीण तरुण शिक्षण घेतात त्यांना शहरातील झगमगाट, तिथले पांढरपेशे जीवन आकृष्ट करते. ते तिकडे खेचले जातात. शेती करणं त्यांना कमीपणाचे वाटते. त्यांना समजावले पाहिजे की, शेती नोकरीइतकीच किंबहुना जास्तच फायदेशीर ठरू शकते. या तरुणांची सुद्धा जबाबदारी आहे की, त्यांनी त्यांच्या शिक्षणाचा उपयोग आधुनिक पद्धतीने शेती करून जास्तीत जास्त उत्पादन मिळविण्यासाठी केला पाहिजे. सरकारही शेतीसंदर्भात अनेक योजना राबवीत आहे त्याचा पुरेपूर वापर फायदा करून घेतला पाहिजे. सध्या सरकारने सुरू केलेली एक खिडकी योजना ही कदाचित शेतकऱ्यांना दिलासा देणारी ठरेल.

**शेतकरी संघटित झाला पाहिजे**

या बरोबरच शेवटचा एक मुद्दा मला मांडावासा वाटतो की, सुरुवातीला मी यज्ञाचा उल्लेख केला. पण यज्ञ म्हणजे होमहवन नव्हे, तर यज्ञ म्हणजे संगतीकरण, मैत्रीकरण, संघटकीकरण. ज्याचा शेतकऱ्यांमध्ये अभाव आहे. त्यांच्या एकतेचा लोकप्रतिनिधींवर प्रभाव आहे पण शेतकरी मात्र असंघटित आहेत. त्यांनी संघटित होण्याची गरज आहे. आणि ठिकठिकाणी शेतकऱ्यांच्या संघटना स्थापन होण्यास सरकारने मदत करण्यास काहीच हरकत नाही. या संघटनांमधून शेतकऱ्यांना त्यांच्या व्यथा मांडण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळाले पाहिजे. या व्यथा जेव्हा उघडपणे मांडल्या जातील तेव्हाच तर त्यावर योग्यवेळी उपाययोजना करणे समाजाला, सरकारला शक्य होईल आणि मग कोणावर आत्महत्या करण्याची वेळ येण्यापूर्वीच त्याला मदत करता येईल. आणि या ज्या व्यथा मांडल्या जातील त्यातूनही समाजाच्या प्रगतीस एक नवी दिशा मिळेल. ◆◆◆


हार्दिक शुभेच्छा !

आपले व आपल्या कुटुंबाचे चोर, दरोडेखोर इ. पासून रक्षण करण्यासाठी व चोरांचा शोध लावणेसाठी आपल्या संरक्षक व लाडक्या कुत्र्याला ट्रेन्ड करणेसाठी त्वरा करा...

**श्वान व अश्व अध्यापक**

**A. R. A. C. कामटी, नागपूर**

अधिक माहितीसाठी भेटा

**अभिजीत विजय धनवडे**

एस्. टी. हौसिंग सोसायटी, प्लॉट नंबर ४७, राजारामपुरी, कोल्हापूर.

**सूचना : सोमवार व गुरुवार सोडून कोणत्याही दिवशी भेटा**

*With Best Compliments from*

**Om Sai**

**Earth Movers**

**Diamond Drilling Boar,**
**Cement Bentonite Grounting &**
**All Type Earth Movers.**

14 D Guruprasad Complex E Ward,
Nagala Park, Kolhapur. Ph. (0231) 652429, 660642

At Post Charan, Dist. Kolhapur.
Phone : (02329) 41146

Hatkanangale Workshop
Phone : (0230) 483357



# जिद्द

(लघुकथा)

**कु. शैलजा कृष्णाजी जाधव**, १२वी कला (अ)

रात्रीच्या नीरव शांततेत झोपेच्या अधीन झालेले गाव. सगळीकडेच शुकशुकाट. अंधाराच्या साम्राज्यात केवळ एकाच घरात एक मिणमिणता दिवा लागलेला होता. अशा या रात्रीच्या समयी कडक थंडीच्या वेळी गुलाबी झोपेत असणारे गाव अन् एकीकडे मिणमिणता दिवा; तो नक्कीच घरातील लोक जागे असल्याची जाणीव करून देत होता. ते घर होते, रामराव पाटलाचे. एवढ्या कडक थंडीच्या, रात्रीच्या वेळी त्यांची मुलगी नंदा अभ्यास करत बसली होती. थोड्याच वेळाने अरुणोदय होऊन सूर्याच्या सोनेरी प्रकाशाच्या साम्राज्याने अंधारावर मात केली अन् गावात पक्ष्यांच्या चिवचिवाटात प्रत्येक घरातून आपापल्या कामांवर जाण्याची लोकांची घाई सुरू झाली. गावातील बहुतेक लोकांची शेती असल्याने घरातील पुरुष मंडळी आपापले आवरून शेतावर निघून गेली, व्यावसायिक मंडळीही आपापल्या व्यवसायासाठी निघून गेली. घरातील स्त्रिया स्वयंपाक करण्यात गुंतून गेल्या. पाणवठ्यावर स्त्रियांची पाणी भरण्यासाठी गर्दी होऊ लागली. नंदानेही आपला अभ्यास उरकून स्वयंपाकाची तयारी सुरू केली.

नंदा, ही रामराव पाटलाची एकुलती एक मुलगी. रामराव पाटील हा गावातील एक गरीब शेतकरी. त्याचा शेताचा एक तुकडा होता. त्याच्या घरी त्याचे आई-वडील, बायको-मुलं अशी सात माणसं. त्याला सुरेश रमेश ही दोघं मुलं. तेव्हा साहजिकच एवढ्या मोठ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह छोट्याशा शेतीवर होत नसे. त्यात रामरावही दारूच्या व्यसनात सदा न् कदा बुडून गेलेला. त्यामुळे नंदाला व तिच्या आईला चार पैसे कमावण्यासाठी, घर चालवण्यासाठी दुसरीकडे कामाला जावे लागे. सुरेश व रमेश मात्र शाळेला जात असत. अशा या हलाखीच्या परिस्थितीत नंदानं आपल्याबरोबर काम करून आपल्याला मदत करावी म्हणून नंदाला शाळेत पाठवलं नव्हतं. शिवाय त्या गावात मुलींना शिकवले जात नव्हते. मात्र सुरेश व रमेश हे आपले भाऊ शाळेला जात असलेले पाहून नंदाला आपणही शाळेत जावे असे वाटत असे. आपली ही इच्छा तिने आपल्या आईजवळ बोलून दाखवली. तेव्हा आई म्हणाली, ''अगं नंदे, काय करायचंय शिकून आपल्यास्नी. पोरीची जात तू. उद्या जाशील न्हवऱ्याच्या घरला. तिथं काय तुला तुजं शिकशान् इचारनार न्हाईत. अन् शिकून तुला काय बॅरिस्टर व्हायचंय होय. त्यापेक्षा घरातली चार कामं शीक. धुणीभांडी, शेतातली काम शीक. उद्या सासरला गेल्यावर निदान सासू-सासरा कवतिक तरी करतील तुजं.'' यावर बिचारी ८-९ वर्षाची नंदा काय बोलणार ? मात्र तरीही नंदाची शाळेबद्दलची ओढ काही कमी झाली नाही.

एक दिवस नंदा तिच्या भावाच्या सुरेशच्या पाठोपाठ शाळेत गेली. अन् शाळेत जाऊन दिवसभर वर्गाच्या बाहेर उभी राहून मोठ्या उत्सुकतेनं वर्गात गुरुजींनी शिकवलेले



पाढे नीट ऐकून ते स्वत: म्हणू लागली. बराच वेळ एक मुलगी आपल्या वर्गाच्या बाहेर उभी राहिलेली गुरुजींच्या लक्षात आले. तेव्हा त्यांनी बाहेर येऊन तिची विचारपूस केली. त्यावर नंदा म्हणाली, ''गुरुजी, मला शिकायचंय ओ, लई शिकायचंय. शिकून मोठ्ठ व्हायचंय पर माजी आई म्हणते की, पोरीच्या जातीला शिकून करायचं काय ? पर गुरुजी काय बी करून मला शिकायचंय, मला शिकायचंय.'' त्या मुलीची शिक्षणाबद्दलची ओढ अन् तो तिचा केविलवाणा आवाज ऐकून गुरुजी तिला म्हणाले, ''तू रामराव पाटलाची मुलगी ना ? सुरेशची बहीण ना ? मी तुझ्या आई-बापांना सांगतो तुला शाळेत पाठवायला.'' गुरुजींचे ते शब्द ऐकून नंदा खुश झाली. अन् आनंदाच्या भरात उड्या मारत ती घरी निघून गेली.

नंदाच्या शिक्षणाच्या ओढीने गुरुजी भारावून गेले. अन् त्यांना रामरावचा अन् गावातल्या लोकांचा खूप राग आला. गुरुजी मनात म्हणाले, काय ती पोर शिक्षणासाठी तळमळतेय अन् ती केवळ मुलगी आहे म्हणून रामराव तिला शाळेत पाठवत नाही. अशा कित्येक मुली या समाजात आहेत की ज्या शिक्षण घेण्यासाठी तळमळतात. मात्र कधी परिस्थिती, कधी समाज त्यांना शिक्षण घेऊ देत नाही. गुरुजींनी ठाम निश्चय केला काहीही करून नंदाला शिक्षणाची सुवर्णसंधी मिळवून द्यायचीच. गुरुजींनी नंदाच्या आई-वडिलांना भेटायचे ठरवले. अन् गुरुजीं नंदाच्या आई-वडिलांना भेटले. त्यांनी नंदाच्या शिक्षणाबद्दल त्यांना विचारले असता रामराव म्हणाला, ''आवं गुरुजी, काय करायचंय पोरीच्या जातीनं शिकून ...'' त्यांच्या बोलण्याला जोड देत नंदाची आई म्हणाली, ''अन् शिकलेल्या पोरीबरोबर लगीन कराया बी कुणी धजत न्हाई. पोरीचं आयुष्य नुसतं चूल अन् मूल यातच असतं. अन् चार कामं केली तर पैकं तरी मिळतील.'' त्यावर गुरुजी म्हणाले, ''पैसे मिळवायचे असतील तर ते फक्त नंदानेच का मिळवावे ? सुरेश अन् रमेशलाही ते काम जमेल ना. पण तुम्ही ती मुलगी आहे म्हणून तिला शिकवत नाही. सुरेश आणि रमेश हे वंशाचे दिवे ना ? मग त्यांना तुम्ही का कामं लावणार ? पण मी सांगतो ही पोरगी नक्कीच तुमचं नाव मोठं करील. तुम्ही तिला शिकायची संधी द्या. आपल्या देशाच्या पंतप्रधान इंदिरा गांधी या देखील एक स्त्रीच होत्या ना. त्यांनी नाही का शिकून आपलं नाव मोठं केलं. तुम्हीही तुमच्या नंदाला शिकवून अशीच इंदिरा गांधी बनवा.'' अन् अखेर गुरुजींनी नंदाच्या आई-वडिलांचं मन वळवून नंदाला शाळेत जायची सुवर्णसंधी मिळवून दिली. नंदा गुरुजींची मुलगी सुमनबरोबर शाळेला जाऊ लागली. गावात आजपर्यंत कुणी मुलगी शिकली नव्हती. एक सुमन - ती गुरुजींची मुलगी असल्यानं कुणी तिच्या शिक्षणावर आक्षेप घेतला नाही. परंतु नंदा जेव्हापासून शाळेत जाऊ लागली तेव्हापासून गावातले सर्व लोक, आया-बाया तिला वाट्टेल ते बोलू लागले. गावातील कुणीही मुलगी तिच्याबरोबर खेळायला येत नसे. रामराव रस्त्याने चालला की, गावच्या पारावर बसलेली आळशी, रिकामटेकडी चांडाळचौकडी मात्र म्हणायची, ''आरं रामा, म्हनं पोरीला बुकं शिकिवतोय. शिकवून काय लेकीला मास्तरीण करणार हाय व्हय. आमच्या अख्ख्या गावात कोण पोरगी न्हाय शिकलेली अन् ही नंदी साळा शिकतीय.'' असं बोलून जोरजोरात हसायची. रामरावने नंदाला शिकायला वरवर परवानगी दिली तरी अजून त्याच्या मनात तिच्या शिक्षणाबद्दल चीडच होती. अन् त्यात त्या चांडाळचौकडीचं बोलणं ऐकून तर रामराव चिडून घरी येऊन नंदाला म्हणाला, ''हे बग नंदे, मला तुला साळा न्हाई शिकवायची, काय करनार हाईस साळा शिकून.'' त्यावर नंदा म्हणाली, ''हे बगा बाबा, मी तुमची समदी कामं करीन पर म्या साळा नाय सोडनार.'' शेवटी रामरावने नंदापुढे हार मानली. अन् शाळा शिकायला परवानगी दिली. नंदाची जन्मजात कुशाग्र बुद्धिमत्ता, तिची जिद्द, अभ्यासाची आवड यामुळे ती प्रत्येक वर्षी वर्गात पहिली येऊ लागली.

पाच-सहा वर्षे उलटून गेल्यानंतर नंदाचं शिक्षण बंद करायचा विचार तिचे आई-वडील करू लागले. तिची



आजी तर नेहमी म्हणायची, ''पोरीची जात ती, तिला शिकवून काय करत्यात देव जानं.''नंदा तर रोजरोजचे हे टोमणे ऐकून हताश व्हायची अन् शेवटी म्हणायची, ''मी मुलगी आहे म्हणून माझ्या शिक्षणावर असा आक्षेप घेतात. पण मी माझा धीर सोडणार नाही. मी जिद्दीनं शिक्षण घेऊन काहीतरी बनून दाखवणारंच.'' तिला शिक्षणासाठी गुरुजी सतत मार्गदर्शन करीत असत. नेहमी प्रोत्साहन द्यायचे. रामराव नेहमी दारू पिऊन घरी यायचा. घरात सर्वांना शिव्या द्यायचा. नंदाच्या आईला मारहाण करायचा. नंदाची पुस्तकं भिरकावून द्यायचा. घरात असतील नसतील तेवढे पैसे मागून घेऊन त्या पैशातून दारू आणायचा. सुरेश अन् रमेशला मात्र म्हणायचा, ''पोरांनो, तुमीच माज्या म्हातारपनीचा आदार हाईसा. तवा चांगलं शिका. शिकून मोट्ठं सायेब व्हा.'' नंदा मात्र या बोलण्यानं नाराज व्हायची. कारण रामरावन असं नंदाशी केव्हाही बोलले नव्हते.

रामरावच्या दारूने घराची अगदी दुर्दशा झाली होती. खायला धड अन्न नव्हते. मिळेल तेवढे पैसे पाण्यासारखे दारूत वाहून जात होते. या सर्व परिस्थितीला कंटाळून नंदाची आई नंदाला म्हणाली, ''नंदे, आता तरी पुरी जाली तुजी साळा, येवढं शिकिवलं पुरं झालं. आता कायतरी कामधंद्याचं बगा. चार पैकं मिळिव.'' नंदाला माहीत होतं की आपल्या परिस्थितीला कंटाळून आई असं बोलतेय म्हणून ती म्हणाली, ''आई, मी पाहिजे तर कामधंदा करीन पण शिक्षण सोडणार नाही.'' तेव्हापासून नंदा सकाळी-संध्याकाळी दुसऱ्यांच्या घरची धुणीभांडी करायची. घरातली धुणीभांडी आवरून स्वयंपाक करायची अन् रात्रीच्या वेळी दिव्याच्या प्रकाशात अभ्यास करायची. तिच्या या मेहनतीचे चीज व्हायचे. ती दरवर्षी शाळेत पहिली यायची. शाळेची सर्व बक्षिसे तिलाच मिळायची. मात्र तिच्या या बक्षिसाचे कौतुक घरातील कुणालाच वाटत नव्हते. ''पोरीची जात ती, तिला काय करायचं बक्षीस मिळून. शेवटी दुसऱ्यांच्या घरची धन'' असा वडिलांचा शेरा ऐकायला मिळायचा. सुरेशची मात्र आपुलकीनं चौकशी करून त्याला बक्षीस का मिळालं नाही हे विचारल्यावर सुरेश म्हणायचा, ''बाबा, त्याचं काय आहे, नंदा ही मुलगी हाय, अन् म्हणून, गुरुजी तिला जास्त मार्क देतात.'' या बोलण्यानं नंदाच्या आनंदावर विरजण येई. सुरेशचे हे बोलणे गुरुजींनी एकदा ऐकले. मात्र, त्याबद्दल त्याला काहीच बोलले नाहीत. गुरुजी प्रत्येक वेळी नंदाचे अभिनंदन करत असत. एक गुरुजींचा तेवढा सहारा तिच्या शैक्षणिक जीवनाला होता.

अशीच नऊ-दहा वर्षे उलटून गेली. नंदा दहावीत होती. दहावीची परीक्षा कठीण म्हणून नंदा अधिक मेहनत घेऊन अभ्यास करू लागली. वर्गातील तासाबरोबरच रिकामा वेळ मिळाल्यास यावेळीही ती नुसता अभ्यासच करायची. घरातील कामं, चार घरची धुणीभांडी हे सर्व आवरून रात्रीच्या वेळी ती अभ्यास करायची. सुरेश मात्र उनाडकी, टवाळकी, वाईट मित्रांच्या संगतीत. यामुळे अगदी वाया गेलेला होता. रमेशचेही तसेच. हे दोघेजण नंदाला अजिबात अभ्यास करू देत नव्हते. एवढा हा त्रास सहन करून तिने गुरुजींच्या व आई-वडिलांच्या आशीर्वादाने बोर्डाची परीक्षा दिली. तिला सर्व पेपरं चांगले गेले. निकालाची हुरहूर लागून राहिली होती. तिच्या वर्षभराच्या मेहनतीची, तिच्या जिद्दीची ती परीक्षा होती.

निकालाचा दिवस आला. अन् त्यादिवशी नंदाच्या आनंदाला पारावारच राहिला नाही. ती जिल्ह्यात पहिली व गुणवत्ता यादीत सहावी आली. त्यामुळे तिचे अभिनंदन करण्यासाठी बोर्डाचे लोक नंदाच्या घरी आले. त्यांनी नंदाचे कौतुक केले. तिला शाबासकी दिली तेव्हा नंदाचे मन भरून आले. तिचा आनंद गगनात मावेनासा झाला. तिला त्याक्षणी गुरुजींची आठवण झाली. गुरुजीही तिचे अभिनंदन करण्यासाठी घरी आले. रामरावला तर त्याच्या कानावर विश्वासच बसेना. आपली मुलगी नंदा बोर्डात आली, जिला शिक्षण घेताना आपण खूप त्रास दिला. तिच्या रस्त्यावर काटेच पेरले. ती नंदा बोर्डात आली. आपली मुलगी बोर्डात आली हे ऐकून त्याला आनंद



झाला मात्र आपण तिला त्रास दिला म्हणून त्याला स्वत:चा राग येऊ लागला. नंदाच्या आईला, तसेच आजी-आजोबांनाही तिच्या यशाचे कौतुक वाटले.

दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात नंदाचा फोटो छापून आला. तिचे नाव सगळ्या जिल्ह्यात गाजले. तिचे अभिनंदन करण्यासाठी अनेक मान्यवर व्यक्ती, प्रतिष्ठित व्यक्ती घरी येऊ लागल्या. पत्रकार लोक, तिचे नातेवाईक यांची तर गर्दीच होऊ लागली. ज्या लोकांनी नंदाच्या शिक्षणावर आक्षेप घेतला होता, ते गावातील लोकही, चांडाळचौकडी हे सर्व नंदाच्या यशाने भारावून गेले व तिचे अभिनंदन करण्यासाठी तिच्या घरी येऊ लागले. सरपंचांनी रामरावचे अभिनंदन करून म्हटले, ''रामराव, तुज्या लेकीनं कमालच केली. सगळ्या पंचक्रोशीत आपलं नाव गाजतंय बग.'' नंदाचा अनेक ठिकाणी सत्कार करण्यात आला. यावेळी नंदाचे केलेले कौतुक, सत्कार, तिला मिळालेली बक्षिसं यांचा द्वेष न करता रामराव त्याबद्दल नंदाचं कौतुक करू लागला. तिने पत्रकारांना आपल्या मुलाखतीत सांगितले की, ''तिचं यश तिला गुरुजींच्यामुळे आणि आई-वडिलांच्यामुळे मिळाले.'' नंदानं आपल्या यशाचं गमक आपल्याला ठरवलं, म्हणून रामरावला नंदाच्या शिक्षणात आपण निर्माण केलेल्या अडचणींचा पश्चात्ताप झाला व तो नंदाला म्हणाला, ''पोरी, मी तुला धड कदी शिकू दिलं न्हाई. तुझ्या बक्षिसाबद्दल आजपर्यंत तुजं कदी कवतिक केलं न्हाई. अन् तू मातुर मोठ्या मनानं तुज्या यशात मला भागीदार केलंस. पोरी, मला माफ कर.''

सुरेशलाही चांगले मार्क पडले होते. गुरुजी सुरेशला म्हणाले, ''काय रे सुरेश, आता बरं म्हटलं नाहीस की ती मुलगी आहे म्हणून तिला एवढे मार्क मिळाले. बोर्डाचे पेपर तपासताना परीक्षार्थी मुलगी का मुलगा हे पाहिले जात नाही. बोर्डाने मुलगा-मुलगी यात भेद केला नाही. सर्वांना समानतेने वागवले, अन् तुझ्या घरातील सर्व, अगदी तू सुद्धा मुलगा-मुलगी भेद का करता ? तू तर शिकलेला आहेस, तुला ते कळायला पाहिजे होतं. तुझ्या बहिणीने शिक्षणासाठी केवढे कष्ट घेतले अन् तू मुलगा म्हणून उनाडपणा करून शिक्षणात मागे पडलास.'' गुरुजींच्या या बोलण्यानं सुरेशला त्याची चूक समजली. अन् त्याने शरमेने मान खाली घातली. रमेशलाही त्याची चूक समजली. दोघांनी गुरुजींची, तसेच नंदाची क्षमा मागितली. व परत तसे न वागण्याची शपथ घेतली. गुरुजींच्या या बोलण्यानंतर रामराव म्हणाला, ''गुरुजी, मला बी माफ करा. मी नंदीला लई तरास दिला. मी आज शपत घेऊन सांगतो परत मी नंदीला कधी तरास देणार न्हाई. दारू कवा पिनार न्हाई. दारूला हात बी लावनार न्हाई. काम करून घर सांभाळीन.''

पुढे नंदाला स्कॉलरशिप मिळणे सुरू झाले. या स्कॉलरशिपमधून तिने आपले शिक्षण पुढे चालू ठेवले. विज्ञान शाखा घेऊन बारावीच्या बोर्डाच्या परीक्षेत परत जिद्दीने अभ्यास करून गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त केले. गुरुजींचा व आई-वडिलांचा आशीर्वाद पाठीशी होताच. यावेळी तिला सुरेश, तसेच रमेशने अभ्यासात त्रास न देता उलट, मदतच केली होती. मेडिकलला प्रवेश घेतला अन् खडतर परिश्रम घेऊन मेडिकलचे शिक्षण पूर्ण करून ती डॉक्टर बनली. तेव्हा रामरावला अन् नंदाच्या आईला खूप आनंद झाला. 'शिकलेल्या मुलींची लग्नं होत नाहीत' हे आपले उद्‌गार खोटे ठरलेत असे नंदाच्या आईला वाटले; कारण नंदाला एकापेक्षा एक चांगली स्थळं येत होती अन् तीही हुंड्याशिवाय लग्नास तयार. मात्र नंदानं लवकर लग्न न करता आई-वडिलांची सेवा केली. सुरेशला अन् रमेशला पुढे शिकवले. पुढे तिने लग्न केले मात्र आयुष्यभर ती गुरुजींना विसरली नाही कारण हे सर्व ती गुरुजींच्यामुळेच करू शकली होती. गुरुजींच्यामुळेच ती जिद्दीनं डॉक्टर बनली होती.

नंदानं आणि गुरुजींनी गावात मुलींच्या शिक्षणाचं बीज रोवलं. गावातील मुलींच्यासाठी नंदा एक आदर्शच ठरली. नंदाचा आदर्श घेऊन गावातील लोकांनी आपापल्या मुलींना शाळेत पाठवले. नंदा गावकऱ्यांच्या मनात कायमची ठसली. ◆◆◆



# दुर्दैवी बाप, दुर्दैवी मुलगा

**(नशाबंदीवरील एकांकिका)**

**कु. वर्षा शिवाजी जाधव**, बी. ए. भाग १

पात्रपरिचय - आबा - वय अंदाजे ६५, बाब्या (दारूडा), पारू (बाब्याची पत्नी), वकील, न्यायाधीश

**बाब्या :** पारे, अगं ये पारे, कुटं उलातलीयास ! आयकू येत न्हाई व्हंय तुला. का कान फुटलं तुजं. येक थोबाडीत दिल्याव हुशील का नाय जागी. भव्वानी कुटली ?

**पारू :** आलास का ढुसून ? वनावना करून दिसभर यावं. दुसऱ्याच्या रानातनं तर घरात आल्याव ह्येची बोंबच. काय मेलं नशीब फाटक हाय गं बाई. ह्या जगन्या परास मेल्यालं बरं !

**बाब्या :** का उगाच शीमगा कराया लागलीयास ? फुढं बुललीस तर कंबारडं मोडीन. लय बोलाया लागलीस. कुनी सांगितलं व्हतं लगीन कराया ? केलंस तसं निसतर. म्या पिनारच. अगं ही दारू म्हंजी मधाच पेला हाय. कोण पील त्यो ग्वॉड हून जाईल. मग तू का ठोकतियास ?

**पारू :** आरं, व्हंय रं तुला त्यो पेला मधाचा दिसतुया. आरं विषाला मध समजून का उगीच जलम जाळतुयास. माज्याकडं न्हवं तर त्या दोन पोरांच्याकडं बगून सुधर.

**बाब्या :** मला शानपन शिकवतीस व्हंय. इस म्हन इस ! पुन्हयांदा आसं बुललीस तर दाडवाण निकळीन. कुनाची पोरं ? बगतील त्येंची ती न्हाईतर बसतील बोंबलत. उद्यापासनं त्येसनी मजुरीला पाटलांच्या मळ्यात ठेव. मी पैकं काडणार हाय त्येंच्या नावाव.

**पारू :** लय बगितलाय पोरांच्या जीवाव बसून खानारा. माजा पराण गेला तरी म्या न्हाय काडायची साळतनं. न्हाय ठेवणार पाटलाच्या मळ्यात. वसाड पडू दे त्यो मळा. पैकं काडतुया ! मिळव जा की तू अन् पी जा. का मागतुयास आमच्याकडं. देवानं चांगलं हातपाय दिल्याती ते झिजव रं. का दरूज भांडतुयास. मिळवलेली भाकर तर खाऊ दे पोटाला. बगंल तवा उटतुस माज्या पोरांच्या जीवाव.

**बाब्या :** उगीच वटवटू नगस. लय आयकून गेतलंया मगाच्यान. मला पैकं पायजेत पैकं. काय बी कर अन् पैकं दे.

**पारू :** तुज्या बानं काय साटवून ठेवल्याती व्हंय द्याला. उटतूस पैकं दे म्हनतुस ते. जा त्या भट्टीवाल्याच्यात चाकरी न्हा. जा आन् पी की. का मागतुस रं माज्याकडं ?

**बाब्या :** (दारूच्या नशेत पारूला मारू लागतो) मगाच्यान बगतुया जिब लय फडफडाय लागलीया. बुलशील का ?

**पारू :** अगं आई गं मेलो, आई, अगं ह्याचं वसाड पडलं ताँड. मारतुया मला. आई गं आई.

**बाब्या :** लई चुरुचुरु बोलत हुतीस मगाच्यान. का रडतियास बोल की, चाकरीला न्हा म्हणतीया. तुला



केलिया कशाला ? मला चाकरीला ठेवाय व्हय. पुना जर असला सबुद काडलास तर ठार मारीन. (पारू ओरडते, ''वाचवा, माजं कंबारडं मोडलं गं आई.'')

**मुले** : आई, आई, मारू नगंस की माज्या आईला तात्या. तुज्या पाया पडतु. आईला मारू नगं. तू सांगशील तसं वागतु. तसं करतु. पर आईला मारू नगं.

**बाब्या** : (उन्मादाने) आता कशी आलासा वटणीवर. साळा शिकिवतीया. तुजा बा यायचा हाय व्हय हीतं कामं कराया.

**पारू** : का उगाच माज्या बाच्या नावानं हाका मारतुयास. आरं म्या शिकिवणार हाय माज्या पोरासनी. न्हाय जाऊ देणार त्या पाटलाच्या मळ्यात.

**बाब्या** : आनी, बुलतीस व्हंय परतून. बास न्हाय वाटतं ठोका. कशी साळा शिकिवतीस बगतु. उद्यापासनं दोगांनी बी मळ्यात जायाचं रं.

**पारू** : न्हाय म्या जाऊ देणार. न्हाय रं जायाचं बंड्या. काय ऐकतुस ह्या मुडद्याचं. मारू दे मला, ठार मारू दे पण साळा सोडाची न्हाय.

**बाब्या** : लय शानपन दाखवाय लागलीस. बुलशील फुडं ! बुलशील ! डोचकं फुडीन साळंचं नाव काडलंस तर. (बाब्या पारूला मारू लागतो)

**पारू** : देवा वाचव रं, मेलो गं आई आई ...
(आबा आरडाओरडा ऐकून पळत येतात)

**आबा** : बाब्या, मागं सर म्हणतुया बग तुला. काय धाड भरलीया व्हंय सोन्यासारक्या बायकुला ढोरागत मारतुयास ते. आरं जरा शानपन घे की. जगात कोन दारू पित न्हाय व्हंय. का तूच पिनारा झालास. तवा दंगा करतुस घरात.

**बाब्या** : तू कोन मधी बोलणारा. माज्या बायकुला मारतुया म्या. तुजं काय जातंया. गपगुमान बस तितं नायतर बग.

**आबा** : काय करशील रं, मारशील व्हंय. लय बापय हु नगंस. आरं समद्यांच्या अंगात ताकद हाय. तुज्याच माकडा न्हाय. येक थोबाडित दिन तर पानी मागशील.

**बाब्या** : तु मला मारनारा कोन रं. नुसता अंगाला हात तर लावून बग. तु का मधी पडतुस. माजा म्या बगुन घीन.

**आबा** : तुज्या संग कोन नातं जोडतुया. त्या पारूसाठी, पोरांसाठी जीव तडफडतोय रं. लोकाची पोर मी आणली या घरात. तुज्या गळ्यात बांधली. त्येचं वाईट वाटतया.असी पोर मिळाली नसती साऱ्या दूनियेत. दिसभर ढोरासारखी राबतीया. मिळंल ती भाजी-भाकरी खाऊन त्या पोरासनी सांभाळतीया. आण तू दिसभर हाणत फिरून इतुस. संध्याकाळच्याला दंगा घालतुस काय. पोरासनी, बायकुला मारतोस काय. माणूस हैस का कोण.

**बाब्या** : तू जा गपगुमान. तुला काय करायचं ?

**आबा** : लय त्वांड सोडलयास. लई शाना जालायस व्हंय लेकाच्या. थांब तुला दावतु बोलायचं.

(आबा कोपऱ्यातील काठी घेऊन बाब्याला मारण्यास सुरुवात करतात. एवढ्यात शेजारचे दामुकाका आडवे येतात व बाब्याला सोडवून घेतात. दारूने अशक्त झालेला बाब्या कोलमडून पडतो. बाब्या कण्हत कोपऱ्यात पडतो. नंतर आबा बाहेर जातात.)

(दुसऱ्या दिवशी)

सगळ्या अंगात ठणका मारत होत्या तरी उद्याची आशा व आजचे पोट व मुलांची काळजी या विचाराने पारू उठली व घरातील कामं आवरून कामासाठी तयार झाली. जणू कालच्या रात्री काही घडलेच नाही असे वाटून तिने मुलांना तयार करून शाळेत पाठवले व आपण शेतात निघून गेली. बाब्या पुन्हा आपल्या गुत्यावर निघून गेला. संध्याकाळ होताच बाब्या नेहमीप्रमाणे पण जरा जास्तच पिऊन येतो. आत येताच तोल जाऊन धपकन् पडतो. तरीही पारूला तो शिव्या देत असतो. त्याला उठविण्यासाठी कोणीही पुढे जात नाही. तोच उठतो व कालच्या विषयाला हात घालतो आणि भांडण्यास सुरुवात करतो.



**बाब्या :** पा ....अं....अं.... अं .....रे, कुटं उलतलीस ? पडलो तरी तुला दिसंना व्हय ? बायको हैस का वैरीन ?

**पारू :** (अबोल ... काहीही न बोलता आपल्या कामात व्यस्त)

**बाब्या :** काय तोंडाला मुसकी घातली व्हंय. बोलंनास ती. का वाचा बसली तुजी ?

**पारू :** काय, तुजं डोंबाल बुलु व्हंय. काय राखलयंस बोलाया तवा सारकं बुलु. पड न्हाईतर मर मला काय तुजं ?

**बाब्या :** लई कट्टाळा आलाया वाटतं माजा तवा त्वांड कराया लागलीयास. कालचं ध्यानात न्हाय वाटतं तवा पुना चालू केलयास.

**पारू :** इसरून कसं चालंल रं. सायब नायिस का तू. तवा तुजा हुकूम पाळाया कालची आटवान करून दितुया वस्साड तोंडाचा.

**बाब्या :** पारे, लई बुलु नगंस बग नायतर आज नरडीचा घोट घेतल्याबिगार गप ऱ्हानार नाय. मग जा मसणवाटात पोरासनी साळा शिकवित बस जा.

**पारू :** नरडीचा घोट घ्याला काय तू कमावल्यालं खाईत न्हाय. म्या सवता राबतिया अन् खातिया. तुज्यासारकं न्हाय भिकारड्या.

**बाब्या :** पारे, कुनाला भिकारड्या म्हनतियास ? मला ? थांब तुला आज सपविल्याबिगार ऱ्हानार न्हाय. (असं म्हणून बाब्या पारूचा गळा दाबण्यास सुरुवात करतो. मुले आडवी जातात. पण चिमुकल्या मुलाचे काय ते बळ ? घरातील दंगा ऐकून शेजारी बसलेले आबा धावतच आत येतात व पारूला सोडविण्याचा प्रयत्न करतात; पण बाब्याच्या हाताची पकड सुटत नाही. तेव्हा कोपऱ्यातील फावडे घेऊन आहे तेवढ्या ताकतीने आबा बाब्याच्या डोक्यात घालतात. व तेथेच बाब्याची प्राणज्योत मालवते. आबा व त्यांचे कुटुंब बाब्याच्या मृत्युचे दुःख न मानता शांत रहातात. बेशुद्ध झालेल्या माणसासारखे आबा वागतात व स्वतःच काही वेगवेगळ्या हालचाली करतात तेवढ्यात पारू आबांना बोलावते)

**पारू :** आबा, आता काय करायचं वं ? तुमी माज्या खातर तुमच्या पोरग्याचा परान घेतला. याला कुटली माया म्हनायची वं आबा. (पारूला रडूच कोसळते)

**आबा :** पारू, लय आशंनं वाडवलं हुतं बग बाब्याला म्या. त्येची आई मेली तवा ह्यो अवघा वरसाचा हुता. तिच्या मागारी दोन वरसं तळहाताचा फोडापरमानं सांभाळीत हुतो. ह्यो सात वरसाचा झाला. माज्या कामाचा व्याप वाडत हुता म्हनून म्या ह्याला मामाकड धाडला. का, तर साळंला जाईल. शिकंल, सवरंल, मोठा हुईल. बिनआईचं म्हनून माज्यातली बाची जागा आईन घेतली. आईपरास म्या याला जीव लावला हुता. चार दिसातनं एकदा त्येच्याकडं जाऊन काय पायजे नगं बगत हुतो. समदं हाट पुरवित हुतो. पर ...

**बाब्या :** व्हंय आबा, तुमच्या जीवापरास त्येला जपलंसा. का, तर ह्योच घरचा दिवा म्हनून त्येची देकभाल किलीस पर ह्यो गेला दुसऱ्याच वळनावर ...

**आबा :** पोरी ह्यात त्येचा दोस न्हाई. दोस माजाच हाय. म्या दिसभर कामाला जात हुतु. घरात ह्याच्याकड लक्ष कोन द्याचं म्हनून म्या ह्याला मामाकड धाडला. मामा दिसभर रानात राबवायचा, कामं करून घ्याचा. कवा कवा बाब्याला गुत्यावर दारू आनाया धाडायचा पर ह्या बाब्यानं मला कवा एका सब्दानं सांगिटलं न्हाय. समदं चांगलं हाय म्हनायचा. मग हळूहळू ह्याला बी त्येची सव लागली. ह्यो चौदा वरसाचा असल्यापासनं वाईट वळनात घुसला. मला हे समाजलं तवा लई उशीर जाला व्हता. त्यो सुदरंल म्हनून म्या त्येचं लगीन करायचं ठरिवलं आन् घडलं येगळंच पोरी.

(आबांच्या डोळ्यात पाणी उभं राहिलं)

**पारू :** आबा, माज्या परास तुमासनी लय दुःख. ल्हानाचं मोट्ठ करायचं आन् येवड्याश्या चुकीपायी काय तर घडून बसायचं. आबा जे झालं ते सोडा आन् पुलिसात



हजर व्हा.

**आबा** : व्हंय पारू, तू म्हनतीस तसं करतु. रागापायी म्या माज्या बाब्याचा परान घेतला. केवढा लाडानं वाढविला हुता बाब्या तुला. हे माज्या हातनं घडायचं हुतं म्हनून का बाब्या.

(असं म्हणून आबा व त्यांचं कुटुंब मोठ्यानं रडतात. थोड्या वेळाने आबा स्वत:हून तालुक्यात जाऊन पोलिस स्टेशनला हजर होऊन जबाब देतात व केलेल्या गुन्ह्याची कबुली देतात. आबांची केस उभी रहाते. जबाबासाठी आबांना पिंजऱ्यात उभा करतात. खुनाची साक्ष देण्यासाठी पारू दोन मुलांसह उपस्थित असते. जबाब चालू होतो.)

**आबा** : देवाशपथ खरं सांगीन, खोटं सांगनार नाय.

**वकील**: आपण आपला मुलगा बाबू याचा खून केलात ?

**आबा** : व्हय सायेब !

**वकील**: या खुनापाठिमागचं कारण काय ?

**आबा** : सायेब, माजा पोरगा बाब्या ह्यो "असून तापत्रा व नसून खोळांबा" आसा हुता. त्यो लगीन व्हायच्या आदिपासनं पित हुता. पर लगीन जाल्याव सुदरंल म्हटलं तर जास्तीच बिगडला ! त्येची बायको पारू दूसऱ्याच्या कामावर जाऊन चार पैकं मिळवून आनत व्हती. तवापासनं बाब्या काम करंना. त्यो रात ध्याड दारू पित हुता व घरात युन पोराबाळास्नी बायकुला मारीत व्हता. चांगुलपनानं सांगितलं, वाईटपनानं सांगितलं तरी त्यो ऐकाया तयार हुईना. दिस न् दिस त्यो जास्तीच प्युन भांडू लागला. (मध्येच)

**वकील**: पण दारू पिणारी सर्वच भांडतात. तुम्हाला राग येण्याइतपत त्याने काय केलं होतं.

There is also an urgent need to select and grade the teaching items properly. At present many of the teaching items such as tenses, active-passive, narrations, articles, prepositions and transaformation of words and sentences continue to be included in English syllabus at all levels, i. e. from lower to higher classes. There is much scope to teach many different things at the higher level i. e. writing scientific reports, English for business correspondence and communication. These are some of the areas which can be included inthe syallbus of English at the higher levels according to the needs of the learners.

The controversy between language and literature must also come to an end. Literature is the collection of the finest pieces of spoken and witten from of the language. Therefore, teaching language through literature is a good approach to follow. Finally, a test of spoken English should be included in examinations at all levels which should aim at testing proficiency in English or the language skills acquired by the learners.

●●●

*हार्दिक शुभेच्छा !*

**शेतकरी तालुका सह. खरेदी विक्री संस्था मर्या., हसूर दु ॥**

ता. करवीर, जि. कोल्हापूर

● खेळते भांडवल : ५७,८१,४३२-०० ● वसूल भाग भांडवल : ११,७८,२५० ● उलाढाल : ५३,६२,११,५८ ● फंडस् : ६,८७,४६८ ● सभासद संख्या : ४५६

**चिल्लाप्पा बाबाजी पाटील (सी. बी.)**
संस्थापक चेअरमन

**यशवंत नारायण भोईटे** — व्हा. चेअरमन

**श्रीपती राऊसो खराडे** — चेअरमन

**बाळासो बापूसो पाटील**
मॅनेजर



# Keep me alone

"O heaven,
Keep me alone from this world
In your deep and dark depth
where is no terror and torture
and absence of voice of sorrow."

"O Star,
give me a small place
from where no one can deprive me
where is no shadow of grief
and absence of rush-time"

... Life is valley of trouble
Life is money and moeny is life
And greed is its depraved knife...

"O Nature,
Keep me alone from this world
keep me alone... !

O Lord,
teach me your scripture
not to mock in smiling
not to talk in helping
not to expect in giving
not to suspect in loving !

Miss. Maya S. Patil T. Y. B. A.

*If music be the food of love play on.*
*Give me excess of it, that surfeiting.*
*The appetite may sticken and so die.*

# Waiting

Standing on the college ground
Waiting am I only for you.
My heart is beating only for you.
Though I know the time of meeting !
While I study in my vision,
I see you,
And while burning midnight candle

I study for you
Standing on the college ground
I am waiting for you
My future depends upon you
And when I remember you
I forget myself too.
I can't forget you
The architect of my life
The shaper of my life
O ! when come will you
my dear dear Examination !

Miss. Swati R. Kulkarni S. Y. B. A.

# Mutability

The crescent moon of development
Enlarging itself in the sky of my country
The man who is originated from monkey
Is challenging the God's supremacy.
Every house a parliament
Every Office a restaurant
The 'jong' is more intelligent
Than the 'bass' corrupt
In this age of Fury and dowry
Marriage a material agreement
Forgetting the pomp and glory
of tender passioned heart
The honest is suspended
The humbug is rewarded

Miss. Chougule U. G. B. A. III



**हार्दिक शुभेच्छा !**

पुस्तकांसाठी जावं तिथं... सर्वांमुखी एकच नाव...

# अजब पुस्तकालय

## आमचेकडे मिळणारी पुस्तके

• सर्व शैक्षणिक पुस्तके • शब्दकोश (मराठी, हिंदी, इंग्रजी) •
• कथा, कादंबऱ्या, नाटके इ. • स्पर्धात्मक परीक्षा पुस्तके •
• मेडिकल, इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर इ. •
• धार्मिक अध्यात्मिक आरोग्य, लघुउद्योग, शेती इ. •
• पाककला, शिवणकाम, विणकाम इ. •

**आवड 'ग्रंथाची' निवड 'अजब'ची**

## अजब पुस्तकालय

**प्रकाशक व पुस्तक विक्रेते**

भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर - ४१६ ०१२.

फोन : ५२६७१०



# दि प्रेस ॲण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स ॲक्ट

नियम ८, फॉर्म नं. ४ प्रमाणे आवश्यक असलेली माहिती

| | | |
|---|---|---|
| प्रकाशन स्थळ | : | ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर |
| प्रकाशन स्थळ | : | वार्षिक |
| मुद्रकाचे नांव | : | श्री. सी. गोसावी<br>राजहंस प्रिंटिंग प्रेस |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | २५० / ब २७, नागाळा पार्क, कोल्हापूर.<br>फोन : ६५३९०६, ६६६३६० |
| प्रकाशकाचे नांव | : | प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार रं. पाटील |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | कमला महाविद्यालय<br>ताराराणी विद्यापीठ, राजारामपुरी, कोल्हापूर |
| संपादकाचे नांव | : | सौ. डॉ सुमित्रा बा. पोवार |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | कमला महाविद्यालय<br>ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर |
| मालकी | : | कमला महाविद्यालय<br>ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर |

मी. डॉ. क्रांतिकुमार रं. पाटील असे जाहीर करतो की, वरील माहिती माझ्या समजुतीप्रमाणे बरोबर आहे.

**प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार रं. पाटील**

# ।। अहवाल विभाग ।।

- जिमखाना विभाग
- राष्ट्रीय छात्रसेना
- व्यवसायाभिमुख शिक्षण
- प्रौढ व निरंतर शिक्षण विभाग
- राष्ट्रीय सेवा योजना
- स्पर्धात्मक परीक्षा मार्गदर्शन विभाग
- लोकसंख्या शिक्षण मंडळ
- वक्तृत्व व लेखन समिती
- भित्तीपत्रक समिती
- विविध कलागुण विकास मंडळ
- वार्षिक दिन अहवाल
- सहल विभाग
- ग्रंथालय अहवाल
- राष्ट्रीय सेवा योजना
- प्राध्यापक प्रबोधिनी समिती
- कमला कॉलेजच्या माजी विद्यार्थिनीचा अभिनंदनीय गौरव

# 'जिमखाना विभाग'

## क्रीडा विभाग १९९८-९९



**कु. वैशाली शिंदे**
आंतरविद्यापीठ व्हॉलीबॉल स्पर्धा व
अश्वमेध स्पर्धेत सहभाग



**कु. माधवी चोरगे**
आंतरविद्यापीठ बास्केटबॉल
स्पर्धेत सहभाग



**कु. अश्विनी पाटील**
आंतरविद्यापीठ हॅन्डबॉल
स्पर्धेत सहभाग



**प्राचार्यांसमवेत शिवाजी विद्यापीठ विभागीय स्पर्धेत उपविजेतेपद प्राप्त केलेला व्हॉलीबॉल संघ**



**कु. कविता पाटील**
महाराष्ट्र राज्य विद्यापीठ
अश्वमेध व्हॉलीबॉल
स्पर्धेत सहभाग



**कु. रुपा पवार**
बास्केट बॉल युनिव्हर्सिटी
कँपकरिता निवड



**कु. वैशाली कोपार्डे**
शिवाजी विद्यापीठ झोन
गोळाफेक व थाळी फेक
मध्ये द्वितीय क्रमांक



**कु. सीमा गावडे**
शिवाजी विद्यापीठ आंतरविभाग
शूटींग स्पर्धेत व ५० कि.गट
ज्युदो स्पर्धेत तृतीय क्र.



प्राचार्यांसमवेत शासकीय उच्च माध्य., जिल्हा स्तर
उपविजेतेपद प्राप्त केलेला खो-खो संघ



**कु. सुरेखा चौगुले**
शासकीय उच्च माध्य. राज्यस्तरीय
खो-खो निवड चाचणीसाठी निवड



**कु. पूनम कोळी**
खुल्या राज्यस्तरीय ॲथलेटिक्स
२०० मी. धावणे मध्ये सहभाग



प्राचार्यांसमवेत शासकीय उच्च माध्य., जिल्हा स्तर
उपविजेतेपद प्राप्त केलेला बास्केटबॉल संघ



प्राचार्यांसमवेत शिवाजी विद्यापीठ विभागीय
प्रथम क्रमाकांचे पारितोषिक प्राप्त केलेला बास्केटबॉल संघ



**कु. विपुल कोले**
जिल्हास्तरीय ॲथलेटिक्स
मध्ये लांब उडीत सहभाग



**कु. क्षमा पाटील**
खुल्या राज्यस्तरीय ॲथलेटिक्स
१०० मी.धावणेमध्ये सहभाग



**कु. अर्चना कांबळे**
राज्यस्तरीय ॲथलेटिक्स
गोळाफेक मध्ये सहभाग



**कु. प्रफुल्ला सुर्वे**
खुल्या राज्यस्तरीय
ॲथलेटिक्स उंचडीत सहभाग



**प्राचार्यांसमवेत शिवाजी विद्यापीठ आंतर विभागीय स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त केलेला हॅन्डबॉल संघ**

सिनियर महाविद्यालयाच्या संघाने शिवाजी विद्यापीठ झोनल स्पोर्टस् स्पर्धेमध्ये बास्केट बॉल, व्हॉली बॉल, खो-खो, योगा व ॲथलेटिक्समध्ये भाग घेतला. त्यापैकी बास्केटबॉल संघास अजिंक्यपद मिळाले व व्हॉलीबॉल संघास उपविजेतेपद मिळाले. ॲथलेटिक्समध्ये कु. वैशाली कोपार्डेने गोळाफेक व थाळीफेकमध्ये द्वितीय क्रमांक मिळविला. आंतरविभागीय स्पर्धेमध्ये बास्केटबॉल संघाने भाग घेतला. झोनल स्पोर्टस् कौन्सिलने प्रथमच ठेवलेले पारितोषिक या संघाने कौशल्यपूर्णरीतीने प्राप्त केले. तसेच कु. वैशाली कोपार्डेने आंतरविभागीय ॲथलेटिक्स मीटमध्ये गोळाफेक व थाळीफेक मध्ये भाग घेतला. आंतरविभागीय स्पर्धेमध्ये प्रथमच यावर्षी हँडबॉल, ज्युदो व शूटींग यामध्ये संघ सहभागी झाले व त्यात सुयश प्राप्त केले. हँडबॉलमध्ये तृतीय क्रमांक व शूटींगमध्ये द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच ज्युदोमध्ये कु. सीमा गावडेने ५० किलो गटात, कु. गीता पाटीलने ४५ किलो गटात, तर कु. पंचगंगा मडीवालने ५२ किलो गटात तृतीय क्रमांक मिळविला. शूटींग संघात कु. सीमा गावडे, कु. तेजस्विनी पोवाा, कु. तेजस्विनी सावंत, कु. अमृता पाटील व कु. रूपा मगर यांचा समावेश होता. कु. सीमा गावडेची शूटींग संघात तृतीय क्रमांकावर निवड झाली. बास्केटबॉल संघात कु. माधवी चोरगे, कु. रूपा पवार, कु. तृप्ती जाधव, कु. अर्चना बेनाडे, कु. तेजस्विनी सावंत, कु. गीता पाटील, कु. तेजस्विनी पवार, कु. अश्विनी पाटील, कु. अमृता पाटील, कु. प्राची चांदेकर, कु. साधना दलाल व कु. मनिषा गुरव यांचा समावेश होता. हँडबॉल संघात कु. रूपा पवार, कु. सीमा गावडे, कु. अश्विनी पाटील, कु. तेजस्विनी पवार, कु. मनिषा गुरव, कु. तेजस्विनी सावंत, कु. गीता पाटील, कु. अमृता पाटील, कु. रूपा मगर, कु. वैशाली कोपार्डे, कु. पंचगंगा मडीवाल, कु. साधना दलाल यांचा समावेश होता. तसेच व्हॉलीबॉल संघात कु. वैशाली शिंदे, कु. कविता पाटील, कु. कल्पना बागणे, कु. वैशाली देसाई, कु. तबस्सुम बारगीर, कु. शबाना पटवेगार, कु. अश्विनी पाटील, कु. सौजन्या राव, कु. शिल्पा चौगुले, कु. पद्मा कागलकर व कु. साधना दलाल यांचा समावेश होता.

शिवाजी विद्यापीठ बास्केटबॉल संघात कु. माधवी चोरगे, हँडबॉल संघात कु. अश्विनी पाटील व व्हॉलीबॉल संघात कु. वैशाली शिंदे यांची निवड आंतरविद्यापीठ स्पर्धेकरिता झाली. बास्केटबॉल स्पर्धा बडोदा येथे, हँडबॉल स्पर्धा गुजरात येथे व व्हॉलीबॉल स्पर्धा केरळ याठिकाणी झाल्या. कु. वैशाली शिंदे व कु. कविता पाटील यांची निवड औरंगाबाद येथे झालेल्या स्पर्धेसाठी व्हॉलीबॉल संघांत झाली. कनिष्ठ महाविद्यालयाच्या संघाने शासकीय उच्च माध्यमिक स्पर्धेत बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, खो-खो, बॅडमिंटन व अॅथलेटिक्समध्ये भाग घेतला. जिल्हा स्तरावर बास्केटबॉल संघास उपविजेतेपद मिळाले. खो-खो संघाने शहरस्तरावर विजय प्राप्त करून जिल्हास्तरावर उपविजेतेपद मिळविले व व्हॉलीबॉल संघाने शहरस्तरावर उपविजेतेपद प्राप्त केले.

बास्केटबॉल संघात कु. क्षमा पाटील, कु. गौरी पोळ, कु. रोहिणी कार्वेकर, कु. प्राजक्ता हराळे, कु. दीपा शेवाळे, कु. प्रफुल्ला सुर्वे, कु. अर्चना शिंदे, कु. लीना पाटील, कु. भारती चौगुले, कु. अर्चना कांबळे, कु. वृषाली मगदूम व कु. शीतल पाटील यांचा समावेश होता. तसेच खो-खो संघात कु. सुरेखा चौगुले, कु. विपुल कोले, कु. शीतल पाटील, कु. सुजाता मगदूम, कु. नीनाताई मगदूम, कु. सविता रेवडे, कु. उज्ज्वला गोटणे, कु. पूनम कोळी, कु. क्षमा पाटील, कु. वंदना लोखंडे व कु. वृषाली मगदूम यांचा समावेश होता. व्हॉलीबॉल संघात कु. पुष्पा कुंभार, कु. सुरेखा चौगुले, कु. पूनम करवडे, कु. तेजस्विनी सुतार, कु. सुनंदा दावणे, कु. वर्षा यादव, कु. स्वाती जाधव, कु. दीपाली चौगुले, कु. उज्ज्वल मिठारी, कु. रिना सुतार, कु. निलोफर शेख व कु. आदर्शा चौगुले यांचा समावेश होता. अॅथलेटिक्समध्ये जिल्हास्तरावर कु. पूनम कोळीने ८०० मी. धावणेमध्ये द्वितीय क्रमांक व कु. विपुल कोलेने लांब उडीमध्ये द्वितीय क्रमांक मिळविला. या विभागीय स्तरावरील अॅथलेटिक्स मीटमध्ये सहभागी झाल्या होत्या. ४ x ४०० मी. रिले संघाने जिल्हास्तरावर तृतीय क्रमांक मिळविला. या संघात कु. विपुल कोले, कु. क्षमा पाटील, कु. रोहिणी कार्वेकर, कु. पूनम कोळी व कु. वृषाली मगदूम यांचा समावेश होता. शहरस्तरावर कु. पूनम कोळी व कु. क्षमा पाटील यांनी ८०० मी. धावणेमध्ये अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविला. कु. वृषाली मगदूम, कु. प्रफुल्ला सुर्वे व कु. अर्चना कांबळे यांनी उंचउडीत अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविले. कु. रोहिणी कार्वेकरने २०० मी. धावणेमध्ये तृतीय क्रमांक मिळविला. रिले संघाने ४ x ४०० मी. रिलेमध्ये द्वितीय क्रमांक मिळविला. या संघात कु. पूनम कोळी, कु. विपुल कोले, कु. क्षमा पाटील, कु. रोहिणी कार्वेकर व कु. प्राजक्ता हराळे यांचा समावेश होता. कु. सुरेखा चौगुले हिची खो-खो साठी राज्यस्तरीय निवड चाचणीसाठी निवड झाली.

आमच्या सिनियर व ज्युनियर विभागाच्या विद्यार्थिनींनी 'शासकीय महिला क्रीडास्पर्धेमध्ये बास्केटबॉल, व्हॉलीबॉल व अॅथलेटिक्समध्ये भाग घेतला. त्यापैकी बास्केटबॉल संघाने जिल्हास्तरावर अजिंक्यपद मिळविले व संघ विभागीय स्तरावरील स्पर्धेत सहभागी झाला. अॅथलेटिक्समध्ये कु. वैशाली कोपार्डेने गोळाफेक व थाळीफेकमध्ये द्वितीय क्रमांक, कु. वृषाली मगदूमने उंच उडीत द्वितीय क्रमांक मिळविला. आमचा बास्केटबॉल संघ निमंत्रित राज्यस्तरीय स्पर्धा सातारा येथे व महापौर चषक सोलापूर येथे सहभागी झाला. महाराष्ट्र राज्य कामगार मंडळामार्फत घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय अॅथलेटिक्स मीटमध्ये कु. वैशाली कोपार्डे, कु. अर्चना कांबळे, कु. प्रफुल्ला सुर्वे, कु. सीमा गावडे, कु. तेजस्विनी पोवार, कु. पूनम कोळी, कु. क्षमा पाटील यांचा समावेश होता. कु. वैशाली कोपार्डेने विविध स्तरांवरील अॅथलेटिक्स मीटमध्ये भाग घेऊन आघाडी राखली व कॉलेजची 'बेस्ट अॅथलिट' म्हणून मान मिळविला. तसेच बास्केटबॉल संघाने विविध स्तरावरील स्पर्धा खेळून कोल्हापूर जिल्ह्याचा विजयी संघ म्हणून नावलौकिक मिळविला.

वरील सर्व विद्यार्थिनींना प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांचे बहुमोलाचे प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले.

**श्रीमती सुनिता मा. काळे**
जिमखाना विभाग प्रमुख

**श्रीमती साधना पाटील**
कनिष्ठ विभाग

# पाऊल पडते पुढे....

## राष्ट्रीय छात्रसेना



सार्जंट सीमा गावडे
मावलनकर शूटींग स्पर्धा मुंबई येथे ग्रुप मधून निवड
स्पोर्टस कॅम्प - कोल्हापूर, पुणे
बी. एल. सी. - कोल्हापूर, कल्याण
सी. ए. टी. सी. - कोल्हापूर, कऱ्हाड, अहमदनगर
ए. टी. सी. - पलूस, तारदाळ



सार्जंट तेजस्विनी सावंत
एन.सी.सी. बेस्ट कॅडेट
बी.एल.सी.-कोल्हापूर, अंबरनाथ
ए.टी.सी.-सोनतळी
फायरींग तृतीय क्रमांक



सी.पी.एल.तेजस्विनी पोवार
एन.सी.सी. बेस्ट कॅडेट
स्पोर्टस कॅम्प-कोल्हापूर, पुणे
एन.आय.सी.-म्हैसूर
बी.एल.सी.-कोल्हापूर, कल्याण,
ए.टी.सी.-पलूस



सी.पी.एल.प्रिया चव्हाण
बी.एल.सी. कोल्हापूर
ए.टी.सी. तारदाळ



एल.सी.पी.एल.गीता पाटील
एन.आय.सी.अमरावती
ए.टी.सी. तारदाळ



कॅडेट वैशाली कोपार्डे
ए.टी.सी. तारदाळ



एल.सी.पी.एल.रुपाली मगर
एन.आय.सी. म्हैसूर
ए.टी.सी. तारदाळ



कॅडेट स्मिता पडवळे
एन.आय.सी.-अमरावती
ए.टी.सी.-तारदाळ



कॅडेट सुखदा बनसोडे
ए.टी.सी.-तारदाळ



कॅडेट नूतन वायंगणकर
ए.टी.सी.-तारदाळ



गार्ड ऑफ ऑनर - ए. टी. सी. तारदाळ

आमच्या महाविद्यालयातील वीर छात्रांनी सेवाशुश्रुषेपासून शिस्त, नेतृत्व आणि नेमबाजी या सर्व क्षेत्रात नेत्रदीपक यश संपादन केले आहे. यावर्षी ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन मार्फत सार्जंट सीमा गावडेची पाच जिल्ह्यातून 'फायरिंग'साठी निवड झाली. ही आमच्या विभागाची उल्लेखनीय बाब आहे. तसेच 'कोल्हापूर' येथे संपन्न झालेल्या बी. एल. सी. कॅम्पमध्ये सार्जंट सीमा गावडेने 'स्पॅनिंग'मध्ये द्वितीय क्रमांक पटकाविला. तसेच 'स्पोर्टस् कॅम्पसाठी' (व्हॉलीबॉल) द्वितीय क्रमांक पटकाविला. तसेच 'स्पोर्टस् कॅम्पसाठी' (व्हॉलीबॉल) कॅडेट वैशाली शिंदे, वैशाली जाधव, सविता शिंदे व उज्ज्वला पाटील यांची निवड झाली. विशेष प्रशंसनीय बाब म्हणजे 'दिल्ली' येथे अंतिम फेरीमध्ये 'महाराष्ट्र टीम'मध्ये कॅडेट वैशाली शिंदेची निवड झाली. 'अंबरनाथ' येथे झालेल्या बी. एल. सी. कँपमध्ये 'स्पॅनिंग' कॉम्पिटिशनमध्ये सार्जंट सीमा गावडेने द्वितीय क्रमांक मिळविला.

'अमरावती' येथे झालेल्या 'राष्ट्रीय एकात्मता' शिबिरामध्ये कॅडेट गीता पाटील, सीमा चोपडे, स्मिता पडवळे यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली. आमच्या कॅडेटस्नी डी. जी. ब्रिगेडियर एच्. एस्.इसरानी यांच्याबरोबर जोतिबा स्थानकास 'प्रायमिनिस्टर बॅनरसह' भेट दिली. 'तारदाळ' येथे संपन्न झालेल्या ए. टी. सी. कँपमध्ये आमच्या १२ कॅडेटस्नी भाग घेतला. या कँपमध्ये 'गार्ड ऑफ ऑनर'चा बहुमान सार्जंट सीमा गावडे, कॅडेट गीता पाटील यांना मिळाला. याशिवाय आमच्या छात्रांनी सद्भावना दिवस, राष्ट्रीय सेवा दिवस, पल्स-पोलिओ मोहीम, एडस् सायकल रॅली आदि विभिन्न उपक्रमांमध्ये यशस्वी सहभाग घेतला. विभागाच्या या यशात प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांचे बहुमोल मार्गदर्शन मिळाले.

**लेफ्टनंट डॉ. सौ.सुमित्रा बाबासाहेब पोवार**
एन्. सी. सी. विभाग प्रमुख

# व्यवसायाभिमुख शिक्षण




मेनन बेअरिंग्ज, गोकुळ शिरगाव येथे शैक्षणिक भेटीसाठी गेलेल्या विद्यार्थिनी व प्राध्यापक

या उपक्रमांतर्गत विद्यापीठ अनुदान आयोगाने सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षापासून प्रथम पदवी स्तरावर 'ऑफिस मॅनेज्मेंट अँड सेक्रेटरीयल प्रॅक्टिस' हा व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम सुरू करण्यास आमच्या महाविद्यालयास परवानगी देण्यात आली आहे.

हा अभ्यासक्रम वाणिज्य शाखेकडे सुरू करण्यात आला असून, यामध्ये प्रथम वर्ष वाणिज्य या वर्गाच्या २८ विद्यार्थिनींना गुणानुक्रमे प्रवेश देण्यात आला आहे. तसेच

द्वितीय वर्ष वाणिज्य या वर्गातील १४ विद्यार्थिनींना, तृतीय वर्ष वाणिज्य या वर्गातील १५ विद्यार्थिनींना व तृतीय वर्ष वाणिज्य या वर्गातील १५ विद्यार्थिनींना प्रवेश देण्यात आला आहे. सदर कोर्स तीन वर्षांचा असून, बी. कॉम. पदवीबरोबरच त्यांना हा कोर्स पूर्ण करता येणार आहे.

बी. कॉम. भाग-२ विद्यार्थिनींसाठी अभ्यासक्रमाबरोबरच प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळशवा या उद्देशाने मे. घाटगे-पाटील ट्रान्स्पोर्ट कंपनी लि. याठिकाणी एप्रिल महिन्यात २१ दिवसाचे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

तसेच दि. २४ डिसेंबर १९९८ या दिवशी या विभागातील सर्व विद्यार्थिनींची मेनन बेअरिंग्ज लि., गोकुळ शिरगाव या ठिकाणी शैक्षणिक भेट आयोजित करण्यात आली होती. या उपक्रमात ३० विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. सदर भेटीत व्यवस्थापकीय संचालक श्री. आर. डी. दीक्षितसो व कंपनीचे सेक्रेटरी श्री. व्ही. जी. कुलकर्णीसो यांनी विद्यार्थिनींना बहुमोल मार्गदर्शन केले.

सदर उपक्रम राबविण्यासाठी श्री. एम्. ए. लोहार, श्री. व्ही. जी कुलकर्णी, श्री. ए. जी. गोसावी, श्री. यादव-पाटील व श्रीमती सौ. एस्. एस्. साटम यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. सदर कोर्सची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्राचार्य मा. डॉ. क्रांतिकुमार पाटील यांचे बहुमोल सहकार्य व उत्तेजन मिळत आहे.

**श्री. एस्. व्ही. बागल**, विभाग प्रमुख

# प्रौढ व निरंतर शिक्षण विभाग


ज्युदो-कराटे कोर्समधील विद्यार्थिनी वन अँड इप्पेन करताना

काही कारणास्तव शिक्षणापासून वंचित राहिलेल्या व स्वयंनिर्भरतेसाठी विशिष्ट प्रकारचे शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या मुली व स्त्रियांकरिता दरवर्षी या विभागांतर्गत ''ज्युदो-कराटे'' व ''ड्रेस-डिझायनिंग''च्या कोर्सचे आयोजन केले जाते.

यावर्षीही १५ डिसेंबर १९९८ ते १५ जानेवारी १९९९ या कालावधीत जिमखाना विभागामार्फत ''ज्युदो कराटे''चा कोर्स घेण्यात आला. ४० विद्यार्थिनींनी यशस्वीरीत्या कोर्स पूर्ण केला. कोर्समधील विद्यार्थिनी श्रीमती काळे व श्रीमती धुमाळ यांच्या नेतृत्वाखाली रामलिंग येथे ट्रेकिंगकरिता जाऊन आल्या. कोर्सचा सांगता समारंभ प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या उपस्थितीत, विद्यार्थिनींच्या प्रात्यक्षिकासह संपन्न झाला. या समारंभाचे निवेदन व आभार प्रदर्शनकु. मनिषा गुरव (बी. ए. भाग-२) या विद्यार्थिनीने केले. कोर्स श्रीमती काळे व श्रीमती साधना पाटील यांच्या मार्गदर्शनाने यशस्वी ठरला. तसेच दि. १५ डिसेंबर ९८ ते दि. ३१ जानेवारी १९९९ या कालावधीत गृहशास्त्र विभागामार्फत ''ड्रेस डिझायनिंग''च्या कोर्सचे आयोजन करण्यात आले. १९ विद्यार्थिनींनी कोर्स यशस्वीरीत्या पूर्ण केला. कोर्सला श्रीमती एस्. एस्. शिंदे यांचे मार्गदर्शन व श्रीमती आर. डी. पंडित, श्रीमती व्ही. पी. साठे, श्रीमती के. के. बागवे यांचे सहकार्य लाभले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या बहुमूल्य प्रोत्साहनाने वरील दोन्ही कोर्स यशस्वी झाले.

**श्रीमती आर. डी. पंडित**, विभाग प्रमुख

# राष्ट्रीय सेवा योजना सिनियर विभाग

आमच्या महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना ही समाजोपयोगी योजना राबविली जात आहे. या योजनेत १५० विद्यार्थिनींनी आणि ४ प्राध्यापक कार्यरत आहेत. या योजनेतर्फे आम्ही पुढील उपक्रम राबविले.

- दि. ८-१०-९८ रोजी शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक मा.सुधीर इंगळे यांचे 'व्यसन मुक्तीकडून अंधश्रद्धा निर्मुलनाकडे' या विषयावर चिंतनात्मक अनुभवात्मक व्याख्यान झाले.
- पल्स पोलिओ मोहितेतंर्गत आम्ही दत्तक खेडे मौजे संभापूर येथील ०-५ वर्षाच्या मुलांचे सर्वेक्षण करून त्यांना पोलिओ डोस देण्यापर्यंत मदत केली. तसेच येथील स्वच्छता व प्रबोधनात्मक कार्यक्रम केले.
- दि. ११ जानेवारी ते दि. २५ जानेवारी या दरम्यान एडस् जनजागृती अभियान आयोजित केले तेव्हा आपल्या विद्यार्थिनींनी सायकल रॅलीमध्ये भाग घेतला. तसेच दि. २५-१-९९ रोजी संपूर्ण कोल्हापूरमध्ये एक मानवी साखळी तयार केली. त्यामध्ये आमच्या विद्यार्थिनी सहभागी होत्या.
- तसेच महाविद्यालयाच्या परिसरातील तणाचे निर्मुलन केले. याठिकाणी असलेल्या सागाच्या झाडाजवळील तण काढून टाकण्यात आले.
- राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने सामाजिक व सांस्कृतिक कलाकारांचा मंच नागपूर येथे पाठविण्यात आला. त्यामध्ये आमची विद्यार्थिनी कु. सीमा ताडे हिची शास्त्रीय गायनासाठी निवड झाली. तेथे तिने उत्तम गायन करून प्रशस्तीपत्र संपादित केले.

वर्षभरामध्ये जे आम्ही उपक्रम राबविले त्याला आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांचे उत्स्फूर्त मार्गदर्शन लाभत आहे.

**श्री. एन्. एस्. शिरोळकर**
प्रकल्प अधिकारी

**श्री. ए. एस्. घस्ते**
प्रकल्प अधिकारी

# स्पर्धात्मक परीक्षा मार्गदर्शन विभाग

विद्यार्थिनींचा व्यक्तिमत्व विकास व्हावा, त्यांना विविध स्पर्धात्मक परीक्षांबाबत मार्गदर्शन व्हावे, विविध रोजगार विषयक संधी याबाबत माहिती मिळावी या हेतूने या विभागांमार्फत विद्यार्थिनींना वैयक्तिक पातळीवर आणि व्याख्याने आयोजित करून मार्गदर्शन करण्यात आले. रोजगारविषयक संधी व स्पर्धा परीक्षा याबाबतची माहिती काच फलकात वेळोवेळी विद्यार्थिनींच्या निर्दशनास आणून देण्यात आली. याकामी मा. प्राचार्य व या विभागातील प्राध्यापकांचे सहकार्य मोलाचे ठरले.

**श्रीमती मैंदर्गी व्ही. व्ही.**

# लोकसंख्या शिक्षण मंडळ

शिवाजी विद्यापीठाच्या प्रौढ व निरंतर शिक्षण विभागामार्फत हे लोकसंख्या शिक्षण मंडळ आमच्या महाविद्यालयात सुरु असून १९९८-९९ या शैक्षणिक वर्षात मंडळामार्फत विविध उपक्रमात स्पर्धात विद्यार्थिनींना सहभागी करून उल्लेखनीय कार्य केले असून अपेक्षेइतके यश मिळाले त्याचा अहवाल पुढीलप्रमाणे देत आहे.

- **लोकसंख्या शिक्षण मंडळाची कार्यकारिणी :** महाविद्यालयात लोकसंख्या शिक्षण मंडळाचे कार्य सुरु ठेवण्यासाठी मा. प्राचार्यांनी पुढील कार्यकारिणी नियुक्त केली.

| | | | |
|---|---|---|---|
| मा. प्राचार्य के. आर. पाटील | अध्यक्ष | सौ. टी. पी. पाटील | सदस्या |
| श्री. एन्. व्ही. पोवार | प्रकल्प अधिकारी व सचिव | सौ. ए. व्ही. पाठक | सदस्या |
| डॉ. जे. बी. शिंदे | सदस्य | सौ. बी. व्ही. शेळके | सदस्या |
| श्री. ए. एस. घस्ते | सदस्य | सौ. एन्. एस्. धुमाळ | सदस्या |

वरील कार्यकारिणीच्या निरीक्षणाखाली १९९८-९९ यावर्षी लोकसंख्या शिक्षण मंडळाचे कार्य यशस्वीपणे पार पडले. आमच्या मंडळाच्या विद्यार्थिनींनी महाविद्यालयाबाहेरील स्पर्धेत स्पृहनीय यश मिळविले. त्या स्पर्धा व यशाचा तपशील असा-

- **वक्तृत्व स्पर्धा -** १) सुरेश संकपाळ मित्र मंडळाने दि. १२-१-९८ रोजी आयोजित केलेल्या वक्तृत्व स्पर्धेत आमच्या महाविद्यालयाच्या कु. सरिता महादेव वाळके, कु. स्वप्ना चंद्रकांत डोईजड, कु. सुनिता विलास पाटील या विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. २) जिल्हा सहकार मंडळ लि., कोल्हापूर यांचेद्वारा दि. २३-१२-९८ रोजी घेतलेल्या वक्तृत्व स्पर्धेत आमच्या महाविद्यालयाच्या विविध वर्गातील अकरा विद्यार्थिनींनी वेगवेगळ्या विषयावर वक्तृत्व केले. त्यामध्ये कु. सरिता महादेव वाळके या विद्यार्थिनीने तिसऱ्या क्रमांकाचे रोख पारितोषिक मिळविले.
- **कार्यशाळेतील सहभाग -** मैत्रिण विद्यापीठ द्वारा दि. १७-१२-९८ रोजी आयोजित केलेल्या 'विवाहाचा उंबरठा' या विषयावरील कार्यशाळेत कु. सरिता महादेव वाळके या विद्यार्थिनीने सहभाग घेतला.
- **काव्य वाचनातील सहभाग -** विद्यांजली प्रकाशनद्वारा दि. १०-१-९९ रोजी आयोजित केलेल्या काव्यवाचन स्पर्धेत आमच्या महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी कु. सरिता महादेव वाळके, कु. सुनिता विलास पाटील यांनी सहभाग घेतला.
- **निबंध स्पर्धेतील सहभाग -** १) शिवाजी विद्यापीठ प्रौढ व निरंतर शिक्षण विभाग यांच्याद्वारा साक्षरता अभियान अंतर्गत घेतलेल्या निबंध स्पर्धेत आमच्या महाविद्यालयाच्या कु. स्वप्ना चंद्रकांत डोईजड या विद्यार्थिनीने तिसरा क्रमांक मिळविला. २) खादी ग्रामोद्योग महामंडळाद्वारा घेतलेल्या निबंध स्पर्धेत आमची विद्यार्थिनी कु. स्वप्ना चंद्रकांत डोईजड हिने आपला निबंध पाठविला असून पाठविलेला निबंध निकालाच्या प्रतिक्षेत आहे. मंडळाच्या या यशासाठी मंडळाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. के. आर. पाटीलसाहेब यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. तसेच मंडळाच्या कार्यकारिणी सदस्यांचे आणि सभासद विद्यार्थिनींचे बहुमोल सहकार्य मिळाले.

**श्री. नेताजी वि. पोवार**
प्रकल्पाधिकारी आणि सचिव

# वक्तृत्व व लेखन समिती

महाविद्यालयीन जीवन हे जीवनाच्या पूर्व तयारीच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. ही पूर्वतयारी ज्या अनेक संस्कारातून घडत जाते त्या संस्कारांपैकी भाषण कला व लेखन कला हे अधिक महत्त्वाचे आहेत. महाविद्यालयात हे संस्कार देण्याची व घेण्याची प्रक्रिया अधिक जाणीवपूर्वक होत असते. म्हणूनच कमला कॉलेज ह्या संस्काराबाबत अधिक दक्षतेने काम करते.

आमच्या विद्यार्थिनी कॉलेजांतर्गत व बाह्य स्पर्धांमध्ये भाग घेतात. अहवाल सालात खालील विद्यार्थिनींनी वक्तृत्व व निबंध लेखनात भाग घेतला व आपली गुणवत्ता प्रकट केली.

| | | |
|---|---|---|
| **प्रथम क्रमांक विभागून** | (१) कु. वर्षा शिवाजीराव जाधव | बी. ए. भाग १ |
| | (२) कु. शुभा भालचंद्र वग्यानी | बी. ए. भाग २ |

| | | |
|---|---|---|
| **द्वितीय क्रमांक विभागून** | (१) कु. सुषमा अशोक गुलगौड | बी. कॉम. भाग ३ |
| | (२) कु. मनीषा विवेक गुरव | बी. ए. भाग २ |
| **तृतीय क्रमांक विभागून** | (१) कु. के. सौजन्या राव | बी. ए. भाग १ |
| | (२) कु. रंजना कल्लाप्पा चौगुले | बी. ए. भाग २ |

महाविद्यालयाबाहेरील निबंध-लेखन स्पर्धामध्ये आमच्या विद्यार्थिनींनी भाग घेऊन आपली उपक्रमशीलता प्रकट केली.

**डॉ. जे. बी. शिंदे**
प्रमुख, वक्तृत्व व निबंध लेखन समिती

# भित्तीपत्रक समिती

भित्तीपत्रक हा महाविद्यालयीन जीवनातील एक महत्त्वाचा उपक्रम आहे. महाविद्यालयातील जीवनातच विद्यार्थ्यांना साहित्य लेखनात गुंतविले गेले पाहिजे. काव्यलेखन, कथालेखन हे आता दैवी वरदान मानले जात नाही, तर त्या कला मानून त्यांच्या कार्यशाळा आयोजित केल्या जातात. भित्तीपत्रक ही सुद्धा एक प्रकारची कार्यशाळा असते.

कमला कॉलेजचे भित्तीपत्रक स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताकदिन, कै. काकीजींची जयंती व पुण्यतिथी, कै. काकाजी तथा मा. व्ही. टी. पाटील यांचे स्मृतिदिन व जयंतीदिन, हिंदी दिन, बालदिन अशा प्रसंगाविशेषी प्रसिद्धी केले जाते. त्यामुळे नवागत विद्यार्थिनींना महाविद्यालयासंबंधी आवश्यक ती माहिती व ज्ञान प्राप्त होते. अहवाल साली असाच उपक्रम राबवून विद्यार्थिनींच्या लेखन गुणास चालना दिली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांचे याबाबतीत मोलाचे मार्गदर्शन प्राप्त झाले.

**डॉ. जे. बी. शिंदे**
प्रमुख, भित्तीपत्रक समिती

# विविध कलागुण विकास मंडळ


फूड फेस्टिवलचे उद्घाटन करताना वार्षिक दिन कार्याध्यक्ष प्रा.डॉ.जे.बी.शिंदे सोबत कॉलेजचे प्राचार्य मा. डॉ. क्रांतिकुमार पाटील व इतर समिती प्रमुख

विद्यार्थिनींच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना संधी देणे, व्यक्तिमत्त्व विकास साध्य करणे, स्पर्धेच्या युगात त्यांना मार्गदर्शन करणे, त्यांच्या सर्वांगीण गुणांचा विकास साधणे हे या मंडळाचे उद्दिष्ट आहे.

प्रथम सत्रात संस्थेच्या माजी उपाध्यक्षा आणि स्फूर्तिदेवता कै. पूज्य सौ. सरोजिनीदेवी वि. पाटील तथा काकीजी यांची २९ वी पुण्यतिथी शनिवार दि. १८-०७-९८ या दिवशी संपन्न झाली. मा. प्राचार्यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर शारदा




वार्षिक पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना मा.आमदार श्री. बाबा कुपेकर

मंदिरामध्ये प्रमुख पाहुणे व संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांच्या हस्ते गरीब विद्यार्थिनींना गणवेष वाटप करण्यात आले. ''स्त्री शिक्षित व सुसंस्कारित झाली तर कुटुंब व समाजा सुसंस्कारित होतो व खऱ्या ज्ञानाची ओळख होऊन समाजाची प्रगती होते'' - असे मत प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शनपर भाषणात व्यक्त केले.

जम्मू-काश्मिरहून नागपूर येथे तात्पुरते स्थायीक झालेल्या भारतीय पंडितांना महाविद्यालयातर्फे आर्थिक मदत रु. २१०० चा धनादेश त्यांचे प्रतिनिधी श्री. विजय भट्ट (कुलगाव, जि. अनंतनाग, जम्मू-काश्मिर) यांचेकडे प्राचार्य मा. डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी दि. ११-०९-९८ या दिवशी सुपुर्द केला. दि. १९-०९-९८ या दिवशी ''संगणक क्षेत्रातील विद्यार्थिनीची भूमिका'' या विषयावर ई. सी. एस्. कॉम्प्युटर ट्रेनिंगचे संचालक प्रा. टी. एम्. गरुड यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याचवेळी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ कोल्हापूरचे विभागीय संचालक प्रा. डी. यू. पवार यांचे ''मुक्त विद्यापीठाचे संगणक प्रशिक्षण कोर्सेस'' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. ते म्हणाले, ''जगात संगणक क्षेत्रात होणारी क्रांती ही विद्यार्थिनींना एक प्रकारचे आव्हान आहे, ते पेलण्यासाठीच मुक्त विद्यापीठाने प्रशिक्षण कोर्सेस सुरू केले आहेत. याचा लाभ विद्यार्थिनींनी घ्यावा.'' प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक



स्नेहसंमेलनात कथाकथन करताना
कु.अनुराधा सरनाईक
विषय-पाहुण्यांना कसे पळवून लावावे

केले. प्रास्ताविकात ते म्हणाले, ''संगणक शिक्षण किंवा प्रशिक्षण ही आज काळाची गरज आहे. स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी विद्यार्थिनींचा सर्वांगीण विकास होणे अत्यावश्यक आहे.''

● ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांची ९८ वी जयंती मंगळवार दि. २८-०७-९८ या दिवशी संपन्न झाली. मा. प्राचार्यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.



''ओंकारस्वरूपा'' या शास्त्रीय नृत्यातील सहभागी कलाकार




समूहनृत्य - "छैय्या, छैय्या...."



वैयक्तिक गीत-भावगीत
"एकाच या जन्मी जणु" सौ. उर्मिला सुतार




वैयक्तिक शास्त्रीय नृत्यात
कु. पद्मश्री बागडेकर




फॅशन शोमधील सहभागी कलाकार

- दि. २७-११-९८ "मार्गशीर्ष शुद्ध अष्टमी" या दिवशी करवीर राज्य संस्थापिका, संवर्धिका, शिवस्नुषा, महाराष्ट्र भूषण छत्रपती महाराणी ताराराणी यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्राचार्यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.
- महाराष्ट्राचे आद्य क्रांतिकारक, थोर शिक्षणप्रेमी, दलितांचे कैवारी, बहुजन समाज हिततत्पर (मार्गदर्शक) व स्त्रियांचे उद्धारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १०६ व्या पुण्यतिथी निमित्त मा. प्राचार्यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.
- द्वितीय सत्रात साने गुरुजींच्या जन्मशताब्दि वर्षानिमित्त "साने गुरुजी साहित्य आणि जीवन कार्य" या विषयावर प्रा. चंद्रकांत पाटगावकर यांचे व्याख्यान दि. १५-०१-९९ या दिवशी आयोजित करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी मा. प्राचार्य होते.
- रविवार दि. १७-०१-९९ या दिवशी कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांच्या चतुर्थ स्मृतिदिनानिमित्त कॉलेजच्या वतीने मा. प्राचार्यांनी प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला. शारदा मंदिरात संपन्न झालेल्या समारंभाचे प्रमुख पाहुणे गोवा विद्यापीठाचे इंग्रजी विभाग प्रमुख, प्रसिद्ध विचारवंत व लेखक, तुलनाकार डॉ. आनंद पाटील यांचे "स्त्री वाद आणि

मराठी साहित्य'' या विषयावर व्याख्यान झाले. ते म्हणाले, ''प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेला स्त्रीवाद साहित्यातून दुर्लक्षित राहिला. समाजात जातीभेद आहेत. या भेदामुळेच आजही ब्राह्मणवाद्यांचे वर्चस्व दिसून येते. साहित्याची चोरी करून नाव कमावणाऱ्यांना आजही मिरवले जाते परंतु समाजाशी बांधिलकी मानून उत्तम साहित्य निर्माण करणाऱ्या इतर समाजातील अनेक साहित्यिकांना दुर्लक्षित ठेवले जाते. याबाबतीत लिखाण करून ठेवले मात्र ते प्रसिद्धीस आले नाही त्यामुळे स्त्री वादाचा मुद्दा मागे राहिला.''

- शनिवार दि. २०-०२-९९ या दिवशी अंधश्रद्धा निर्मूलन समितीतर्फे मा. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या हस्ते सत्यशोध प्रबोध परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थिनींना प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.
- शुक्रवार दि. ५ मार्च १९९९ या दिवशी शारदा मंदिरामध्ये तुकाराम बीज समारंभ आयोजित करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख वक्त्या श्रीमती डॉ. सुमन पाटील (कऱ्हाड) यांचे ''संत तुकारामांचा अंत:स्फोट'' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.
- गुरुवार दि. १८ मार्च १९९९ या दिवशी गुढी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर ''श्रीमती शकुंतलादेवी हिंदुराव घाटगे'' अभ्यासिकेचा शुभारंभ समारंभ आयोजित करण्यात आला. याप्रसंगी देणगीदार श्रीमती शकुंतलादेवी घाटगे यांच्या हस्ते अभ्यासिकेचे उद्घाटन झाले. तद्नंतर माजी कुलगुरु श्री. रा. कृ. कणबरकर यांच्या हस्ते ''श्रीमती शकुंतलादेवी घाटगे'' यांच्या फोटोचे अनावरण झाले. श्रीमती शकुंतलादेवी घाटगे यांनी उदारपणे दिलेल्या देणगीबद्दल प्राचार्य मा. डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी कृतज्ञता व्यक्त केली. मा. श्री. कणबरकर यांनी श्रीमती शकुंतलादेवी यांचा गौरव आपल्या भाषणातून व्यक्त केला. यावेळी श्रीमती घाटगे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

शेवटी डॉ. जे. बी. शिंदे यांनी आभारप्रदर्शन केल्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.
वरील सर्व कार्यक्रमासाठी मा. प्राचार्यांचे व समितीमधील सदस्यांचे मार्गदर्शन लाभले.

**श्री. ए. एम्. साळोखे**, विभाग प्रमुख

# वार्षिक दिन अहवाल

स्नेह संमेलन ही महाविद्यालयीन जीवनातील आनंदाची, हर्षोल्लासाची महापर्वणीच. आमच्या महाविद्यालयाच्या स्नेह संमेलनाचा शुभारंभ शनिवार दि. ३० जानेवारी ९९ या दिवशी सकाळी ०९-०० वाजता मा. प्राचार्यांच्या उपस्थितीत फूड फेस्टिव्हलच्या उद्घाटनाने झाला. वार्षिक दिनानिमित्त मराठी वक्तृत्व, हिंदी निबंध स्पर्धा, मेहंदी स्पर्धा, कुकरी स्पर्धा व फ्लॉवर ॲरेंज्मेंट स्पर्धा इ. विविध प्रकारच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. विद्यार्थिनींनी वरील सर्व स्पर्धांमध्ये मोठ्या संख्येने, उत्साहाने भाग घेऊन त्या यशस्वी केल्या. वरील सर्व उपक्रमांचे नियोजन करण्यामध्ये मा. प्राचार्यांनी मार्गदर्शन केले.

सोमवार दि. ०८-०२-९९ रोजी वार्षिक दिनानिमित्त पारितोषिक वितरण समारंभ सकाळी १०-०० वाजता संस्थेच्या शारदा मंदिरात पार पडला. अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष मा. रा. कृ. कणबरकर होते. पारितोषिक वितरण प्रमुख पाहुणे आमदार. बाबासाहेब कुपेकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय संस्थेचे सेक्रेटरी व कमला कॉलेजचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी करून दिला. त्यानंतर वार्षिक दिन कार्याध्यक्ष डॉ. जे. बी. शिंदे यांनी जिमखाना व इतर समित्यांच्या कार्याचे अहवाल वाचन केले. पारितोषिक वितरणानंतर प्रमुख पाहुणे आमदार बाबासाहेब कुपेकर यांचे विद्यार्थिनींना संदेश देणारे व्याख्यान झाले. सौ. यु. डी. इंदुलकर यांनी आभार प्रदर्शन केल्यानंतर समारंभाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सौ. टी. पी. पाटील यांनी केले.

**डॉ. जे. बी. शिंदे**, वार्षिक दिन अध्यक्ष

# सहल विभाग



''मार्लेश्वरातील या जलधारा,
मोहित करती आमुच्या नजरा''



''गणपतीपुळे समुद्रकिनारी
लाटा लोळती पायावरी''

वर्गातील शिक्षणाबरोबरच वेगवेगळ्या भौगोलिक स्थळांची, तेथील समाजाची व संस्कृतीची माहिती व्हावी व निसर्ग सौंदर्य पाहता यावे, विद्यार्थिनींच्या मनाला आनंद वाटावा या हेतूनेच सहल विभाग कार्यरत असतो.

यावर्षी महाविद्यालयाची शैक्षणिक सहल शनिवार दि. १३-०२-९९ या दिवशी श्री मार्लेश्वर व गणपतीपुळे याठिकाणी आयोजित करण्यात आली होती.वरील सहलीसाठी मा. प्राचार्यांचे मार्गदर्शन लाभले.

**श्री. ए. एम्. साळोखे**
सहल विभाग प्रमुख व सहल समिती


**दिग्विजय एन्टरप्राईजेस, येवती**

अंड्यांचे घाऊक व्यापारी, आमच्याकडे घाऊक स्वरुपात अंडी खरेदी व विक्री केली जाते.

**प्रोप्रा. - रा. रा. रामकृष्ण बापूसो आळवेकर,** प्रगतीशील शेतकरी

सदस्य, केदारलिंग दूध व्यावसायिक संस्था मर्यादित, येवती

# ग्रंथालय अहवाल

ग्रंथालय हा महाविद्यालयाचा महत्त्वाचा विभाग असून, प्राध्यापक व विद्यार्थिनींसाठी लागणारी सर्व योग्य पुस्तके, संदर्भ पुस्तके, मासिके, अभ्यासिके विभाग इत्यादि सर्व सोयी असल्याने निकाल चांगले लागतात. फेब्रुवारी ९९ पासून स्वतंत्र नवीन श्रीमती शकुंतलादेवी हिंदुराव घाटगे अद्ययावत अभ्यासिका दुसऱ्या मजल्यावर सुरू केली आहे. त्यासाठी अद्ययावत टेबल, खुर्च्यांची सोय केली असून, एकावेळी १२५ मुली बसू शकतील.

एस्. जे. जिंदाल ट्रस्ट, बेंगलोर यांच्याकडून यापूर्वी रु. ३१ हजारांची ३०५ पुस्तके ग्रंथालयासाठी देणगी म्हणून मिळाली आहेत. परत यावर्षी रु. ३५ हजारांची पुस्तके मंजूर झाली आहेत. ही बाब या वर्षात उल्लेखनीय म्हणावी लागेल. आज अखेर महाविद्यालयाची ग्रंथसंख्या २६,१५४ इतकी झाली असून, त्याची किंमत रु. १० लाख ४० हजार इतकी आहे. यु. जी. सी. अनुदानातून २५० पुस्तके घेतली असून, त्यासाठी २२ हजार रुपये खर्च केले आहेत. बुक बँक ज्युनियर व सिनियर कॉलेजसाठी ९६२ पुस्तके घेतली असून, त्यासाठी चालू वर्षी रु. ८८ हजार खर्च केले आहेत. असे एकूण १,१०,०००/- खर्च केले आहेत. ग्रंथालयात एकूण ४६ मासिके, ९ दैनिके आहेत.

चालू वर्षी बुक बँकेतून ७२१८ पुस्तके दिली असून, त्याचा लाभ १००२ विद्यार्थिनींनी घेतला आहे. खेळाडू व हुशार अशा एकूण५८ विद्यार्थिनींना मोफत पुस्तके दिली. ग्रंथालय समृद्ध करण्याकरिता प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील प्रयत्नशील आहेत.

**श्री. जे. पी. जाधव,** ग्रंथपाल

# राष्ट्रीय सेवा योजना

विद्यार्थी दशेमध्ये औपचारिक शिक्षणाबरोबरच समाज शिक्षणाची जाणीव व्हावी व सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेतून विद्यार्थ्यांनी समाजापर्यंत जाऊन वास्तव जीवनाची अनुभूती घ्यावी या हेतूने महाराष्ट्र शासन पुरस्कृत ''राष्ट्रीय सेवा योजना'' हा उपक्रम आमच्या ज्युनियर महाविद्यालयात कार्यरत आहे. या उपक्रमात प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या एकूण १०० विद्यार्थिनी सहभागी झाल्या आहेत.

या वर्षीच्या उपक्रमांची सुरुवात मा. प्रा. सुधीर इंगळे, समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना, शिवाजी विद्यापीठ यांच्या ''अंधश्रद्धा'' या विषयावरील व्याख्यानाने झाली. या योजनेच्या नियमित उपक्रमांसाठी मौजे हणमंतवाडी, ता. करवीर हे दत्तकखेडे घेतले आहे. या योजनेच्या उपक्रमांचा भाग म्हणून श्रमदान, एडस्‌विरोधी जागृती, व्यसनाधीनता, अंधश्रद्धा निर्मूलन, आरोग्य व पर्यावरण आदि विषयांवरील व्याख्याने, पल्स पोलिओ प्रचार मोहीम इ. कार्यक्रम राबविले गेले. त्यासाठी प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, श्री. ए. एल. नरके आणि मौजे हणमंतवाडीचे सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांचे मार्गदर्शन लाभले.

**श्री. एस्. एन्. कोळेकर,** प्रकल्पाधिकारी

हार्दिक शुभेच्छा

**नॅशनल एज्युकेशन अँड सायंटिफिक वर्क्स**

**★ शास्त्रीय उपकरणे ★ रसायने ★ नकाशे विक्री आणि दुरुस्ती ★**

२३२१, ए वॉर्ड, तटाकडील तालमीसमोर, लक्ष्मी टॉकीजजवळ, कोल्हापूर-४१६ ०१२. फोन : (ऑ) ५२५९०४ (नि) ६३८२६८

**प्रोप्रायटर - उमेश विश्वनाथ कुलकर्णी**

# प्राध्यापक प्रबोधिनी समिती

विविध विषयातील पारंगत प्राध्यापक वर्गास जागतिक पातळीवरील व दैनंदिन जीवनातील महत्त्वाच्या विषयांवर विचारांचे आदान-प्रदान करून मनन, चिंतन, लेखन करण्यास प्रोत्साहित, सतर्क व क्रियाशील करण्याच्या दृष्टीने प्राध्यापक प्रबोधिनी समिती कार्य करीत असते. अहवाल वर्षात या समितीतर्फे महाविद्यालयातील ज्येष्ठ प्राध्यापक सहकारी डॉ. जे. बी. शिंदे यांचे 'होमिओपॅथी - एक उपयुक्त शास्त्र' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. डॉ. जे. बी. शिंदे सरांच्या साध्या, सरळ व ओघवत्या भाषेतील अभ्यासपूर्ण व्याख्यानाने प्राध्यापक बंधू-भगिनींना प्रभावित केले.

व्याख्यानानंतर होमिओपॅथी औषधाच्या उपयोगाबाबत शंकांचे समाधान त्यांनी केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या मार्गदर्शन व प्रोत्साहनाने समितीचे कार्य सुरळीतपणे पार पडले.

**श्रीमती रेखा पंडित**
प्राध्यापक प्रबोधिनी प्रमुख



## कमला कॉलेजच्या माजी विद्यार्थिनींचा अभिनंदनीय गौरव

**शैक्षणिक, क्रीडा, बौद्धिक, कला क्षेत्रात**

**विशेष नैपुण्याबद्दल शंकरदयाळ शर्मा सुवर्णपदकाने**

**कु. दीपाली आनंदराव भोसले सन्मानित**

शिवाजी विद्यापीठाच्या १९९७-९८ वर्षाकरिता ठेवलेले आदर्श विद्यार्थ्यांचे, माजी राष्ट्रपती डॉ. शंकरदयाळ शर्मा सुवर्णपदक मिळविण्याचा मान कु.दीपाली आ. भोसले हिने पटकावला आहे. तिने सन १९९७-९८ या शैक्षणिक वर्षामध्ये शैक्षणिक, क्रीडा, बौद्धिक व कला क्षेत्र व एन्.सी.सी.,एन्.एस्.एस्. यामधील गुणवत्ता तसेच व्यक्तिमत्व, शारीरिक आरोग्य, भाषा शुद्धता, जनरल नॉलेज, वागणूक व नेतृत्व गुण यामध्ये आदर्श ठरण्याबद्दल तिला हे सुवर्णपदक देण्यात आले.

हार्दिक शुभेच्छा

**मयूर टूरिझमच्या कोल्हापूर-मुंबई-कोल्हापूर**
**लक्झरी प्रवासात तुमच्यासाठी ''मोबाईल फोन'' ची सुविधा**

◆ आरामदायी सीटस् ◆ स्वच्छता व टापटाप् ◆ अनलिमिटेड इन्शुरन्सची व्यवस्था ◆
◆ काटेकोर अभ्यासाने ठरलेली आदर्श स्पीड लिमिट (वेगमर्यादा) ◆

मयूर टुरिझमने तुम्हाला आजही आणि उद्याही प्रवास करावासा नक्कीच वाटेल.

**मयूर टूरिझम**

मयूर को-ऑप. टूरिझम लि., कोल्हापूर

८५२, बी वॉर्ड, वालधाम बिल्डिंग, सुभाष रोड, कोल्हापूर. फोन व फॅक्स : (०२३१) ६४०९८८, ६४०२३१

ताराराणी विद्यापीठाचे

# कमला कॉलेज, कोल्हापूर

◀ प्राचार्य : **डॉ. क्रांतिकुमार रं. पाटील** एम्. ए., पीएच्.डी. ▶

## • कला शाखा •

### ◆ मराठी विभाग

| | |
|---|---|
| ◇ डॉ. श्री. जे. बी. शिंदे | एम. ए. एम्. एड. पीएच. डी. |
| ◇ श्री. एच. व्ही. पुजारी | एम. ए. बी. एड. |
| ◇ श्रीमती एस्. एल. देसाई | एम. ए. एम. फिल. बी. एड. |

### ◆ हिंदी विभाग

| | |
|---|---|
| ◇ श्रीमती डॉ. सुमित्रा पोवार | एम. ए. बी. एड. पीएच. डी. |
| ◇ श्रीमती बी. व्ही. शेळके | एम. ए. एम्. फिल. डी. एच. ई. |
| ◇ श्रीमती के. एस. पाटील | एम. ए. बी. एड. |

### ◆ इंग्रजी विभाग

| | |
|---|---|
| ◇ श्री. जे. बी. पाटील | एम. ए. एम्. फिल. |
| ◇ श्री. श्रीमती एस्. आर. साळुंखे | एम. ए. एम्. फिल. |
| ◇ श्री. श्रीमती एन. एस्. धुमाळ | एम. ए. एम. फिल |
| ◇ श्री. एस. एन. कोळेकर | एम. ए. बी. एड. |
| ◇ श्री. श्रीमती एम. एस्. पोवार | एम. ए. एम. फिल. बी. एड. |

### ◆ समाजशास्त्र विभाग

| | |
|---|---|
| ◇ श्री. टी. एस्. थोरात | एम. ए. एम. फिल. |
| ◇ श्री. ए. एम. साळोखे | एम. ए. |
| ◇ श्रीमती एम. व्ही. घोटणे | एम. ए. डी. एच. ई. |

### ◆ अर्थशास्त्र विभाग

| | |
|---|---|
| ◇ श्रीमती टी. पी. पाटील | एम. ए. |
| ◇ श्रीमती ए. व्ही. पाठक | एम. ए. एम. फिल. |
| ◇ श्री. एन. व्ही. पोवार | एम. ए. एम. फिल., बी. एड. |
| ◇ श्रीमती आर. व्ही. आंबवडे | एम. ए. एम. फिल., बी. एड. |
| ◇ श्रीमती आर. पी. प्रधान | एम. ए. बी. एड. |

### ◆ गृहशास्त्र विभाग

| | |
|---|---|
| ◇ श्रीमती आर. डी. पंडित | एम. एस्सी. एम. फिल. |
| ◇ श्रीमती व्ही. पी. साठे | एम. एस्सी., एम. फिल. |
| ◇ श्रीमती के. के. बागवे | एम. ए. बी. एड. |

◆ **मानसशास्त्र विभाग**

| | |
|---|---|
| ◇ श्री. ए. एस्. घस्ते | एम. ए. बी. एड. |
| ◇ श्रीमती एल. टी. मगदूम | एम. ए. बी. एड. |

◆ **इतिहास विभाग**

| | |
|---|---|
| ◇ श्री. एन. एस. शिरोळकर | एम. ए. एम. फिल. |
| ◇ श्रीमती एस. एस्. पाटील | एम. ए. एम. पी. एड्. |

◆ **राज्यशास्त्र विभाग**

| | |
|---|---|
| ◇ श्री. डी. ए. पाटील | एम. ए. बी. एड. |

◆ **शारीरिक शिक्षण संचालिका**

| | |
|---|---|
| ◇ श्रीमती एस्. एम. काळे | एम. ए. एम. पी. एड. |
| ◇ श्रीमती एस. एस्. पाटील | एम. ए. एम. पी. एड. |

## • वाणिज्य विभाग •

| | |
|---|---|
| ◇ श्री. एस्. व्ही. बागल | एम. कॉम. डी. एच. ई. |
| ◇ श्रीमती व्ही. व्ही. मैंदर्गी | एम. कॉम., एम. फिल. |
| ◇ श्री. ए. एल. नरके | एम. कॉम., एम. फिल., डी. एच. ई. |
| ◇ श्रीमती एम. आर. शिंदे | एम. कॉम. (कॉस्टिंग) |
| | एम. कॉम. (इंडस्ट्रियल अॅड बिझिनेस अॅड.) |
| | एम. फिल., बी. एड. |
| ◇ श्रीमती यु. डी. इंदुलकर | एम. कॉम., डी. एच. ई. |
| ◇ श्री. पी. ए. गोखले | एम. कॉम., सी. ए. |
| ◇ श्रीमती एम्. एस्. पाटील | एल. एल. एम. |
| ◇ श्री. ए. एन. वसुगडे | एम. एस्सी. |
| ◇ श्री. एम. ए. लोहार | एम. कॉम. एम. फिल. |

## • व्यवसायाभिमुख विभाग •

| | |
|---|---|
| ◇ श्री. ए. जी. गोसावी लघुलेखन निर्देशक | बी. ए., जी. सी. सी. |
| ◇ श्रीमती सुहासिनी साटम, टंकलेखन निर्देशक | बी. ए. जी. सी. सी. |
| ◇ श्री. व्ही. जी. कुलकर्णी, अधिव्याख्याता | आय. सी. डब्ल्यु. ए. |

## • विज्ञान विभाग •

| | |
|---|---|
| ◇ श्री. ए. एस. जाधव | एम. एस्सी., डी. एच. ई. |
| ◇ श्रीमती एस. ए. पाटील | एम. एस्सी., डी.एच्.ई.बी.एड्. |

| | |
|---|---|
| ◇ **श्रीमती ए. ए. रांगणेकर** | एम. एस्सी., डी. एच. ई. |
| ◇ **श्री. पी. एस. जाधव** | एम. एस्सी. बी. एड. |
| ◇ **श्रीमती एस्. डी. नांद्रेकर** | एम. एस्सी., बी. एड्. |
| ◇ **श्री. व्ही. जी. पाटील** | एम. एस्सी. एम. एड्. एम.सी.एम. |
| ◇ **श्रीमती आर. एन. मोटे** | एम. एस्सी., बी. एड्. |
| ◇ **श्रीमती वाय. आर. माने** | एम. एस्सी., बी. एड. |

## • शिक्षकेतर कर्मचारी •

| | | |
|---|---|---|
| ◇ **श्री. जे. पी. जाधव** | ग्रंथापल | एम. ए. एम. लिब्. एल.एल.बी. |
| ◇ **श्री. एम. व्ही. शिंदे** | अधीक्षक | बी. ए. |
| ◇ **श्री. बी. डी. सुतार** | मुख्य लिपिक | एल. डी. सी. |
| ◇ **श्री. पी. आर. पाटील** | वरिष्ठ लिपिक | बी. कॉम. |
| ◇ **श्री. व्ही. डी. निचिते** | वरिष्ठ लिपिक | बी. एस्सी. |
| ◇ **श्रीमती यू. पी. शिराळकर** | कनिष्ठ लिपिक | |
| ◇ **श्री. एस. बी. शिंदे (भोई)** | कनिष्ठ लिपिक | बी. ए. |
| ◇ **श्री. आर. व्ही. इंगवले** | कनिष्ठ लिपिक | बी. कॉम. |
| ◇ **श्री. टी. एल. कांबळे** | कनिष्ठ लिपिक | बी. कॉम. |
| ◇ **श्री. सी. बी. ठाकुर** | प्रयोगशाळा सहाय्यक | बी. ए. |
| ◇ **श्री. व्ही. एम. चिमणे** | ग्रंथालय परिचर | बी. ए. |
| ◇ **श्री. व्ही. एस. मोटे** | ग्रंथालय परिचर | |
| ◇ **श्री. सी. एम. स्वामी** | ग्रंथालय परिचर | |
| ◇ **श्री. एम. एच. संकपाळ** | ग्रंथालय परिचर | |
| ◇ **श्री. ए. जी. शिगावे** | प्रयोगशाळा परिचर | |
| ◇ **श्री. डी. जी. काटकर** | प्रयोगशाळा परिचर | |
| ◇ **श्री. जी. एन. बेटक्याळे** | प्रयोगशाळा परिचर | |
| ◇ **श्री. वाय. बी. निवळे** | प्रयोगशाळा परिचर | |
| ◇ **श्री. एम. जी. मोरे** | सेवक | |
| ◇ **श्री. एस. एस्. शेळके** | सेवक | |
| ◇ **श्री. डी. बी. कोले** | सेवक | |
| ◇ **श्री. जी. एम. मेथे** | सेवक | |
| ◇ **श्री. एस्. एस्. सनगर** | सेवक | |

हार्दिक शुभेच्छा !

अॅलोपॅथिक आणि आयुर्वेदिक
औषधे मिळण्याचे एकमेव ठिकाण

# गणेश मेडिकल्स

१२२, बी, यशवंत चेंबर्स, रविवार पेठ, कोल्हापूर - ४१६ ०१२.
फोन : ६४१५२१

● प्रोप्रा. श्री. सुधीर खराडे, डी फार्म ●

*होलसेल औषधे मिळण्याचे मध्यवर्ती ठिकाण*

# ओंकार फार्मा

८८८ बी वॉर्ड, रविवार पेठ, कोल्हापूर.
फोन : ६४१५२१

● प्रोप्रा. सर्वश्री खराडे आणि साळोखे ●

## 'कमलाचे संपादक मंडळ'



डावीकडून प्रमुख संपादिका डॉ. सौ. सुमित्रा पोवार, मा. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील,
डॉ. जे. बी. शिंदे, श्री. जे. बी. पाटील

## संत तुकोबांना अभिवादन



संत तुकाराम बीज समारंभ प्रसंगी 'संत तुकारामांचा अंतःस्फोट' या विषयावर
आपले मौलिक विचार व्यक्त करताना श्रीमती डॉ. सुमन पाटील

कोणतीही गोष्ट '**स्पेशल**' असेल
तर त्यासाठी जास्त किंमत
मोजावी लागतेच

मग ते चार्टर्ड विमान असो,
हॉस्पीटल मध्ये स्पेशल रुम असो,
बस ऐवजी स्पेशल टॅक्सी असो,
किंवा स्पेशल चहा असो . . .
पण . . .

**ECS** मध्ये
तसे नाही !

**ECS** मध्ये आपल्याला मिळेल स्पेशल कॉम्प्युटर ट्रेनिंग जास्त किंमत मोजल्याविना !

**संस्थेची खास वैशिष्ठ्ये**

* उच्च विद्याविभूषित, अनुभवी प्रशिक्षक आहेत.
* प्रात्यक्षिकासाठी मल्टीमिडीयासह कलर पेंटीयम कॉम्प्युटर्स आहेत.
* आपले प्रशिक्षण परीपूर्ण व्हावे यासाठी उत्कृष्ठ कोर्सेस आहेत.
* प्रत्येक विद्यार्थ्यासाठी स्वतंत्र कॉम्प्युटर आहे.
* प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिक मार्गदर्शन दिले जाते.
* फी ची मूळ रक्कम वाढवून स्कॉलरशीप / डिस्काऊंट दिला जात नाही.
* सर्वार्थाने परीपूर्ण एक प्रामाणिक सर्वमान्य व नावाजलेली संस्था.

# ECS COMPUTER TRAINING

कोल्हापूर : माणिक चेंबर्स, राजारामपूरी जनता बझार चौक , कोल्हापूर. फोन : (०२३१) ५२९८५९.
सातारा : यशोधन कॉम्पलेक्स, सायन्स कॉलेजसमोर, सातारा. फोन : (०२१६२) ३०२९५.
कराड : २ रा मजला, पटेल मार्केट, शनिवार पेठ, कराड. फोन : (०२१६४) २२६२६.
गारगोटी : आनंदी निवास, मौनी विद्यापीठ रोड, गारगोटी. फोन : (०२३२४) २०९२४.

www.adfine.com


राजहंस / कोल्हापूर.